केरळ निवडणूक

केरळ निवडणूक जनतेसाठी

तत्त्वनिष्ठेच्या पोकळ गप्पा !

केरळ निवडणूक


आतून सत्तेसाठी

केरळ निवडणूक किळसवाणी, फसवी, लाचार तडजोड !

केरळ निवडणूक

# माणूस

बुधवार । १६ सप्टेंबर १९७० । ४० पैसे



बुधवार, १६ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : अठरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |

## सप्रेम नमस्कार....

¤ रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता ही लेखमाला आवडली. या लेखमालेमुळे माणसमध्ये शान आली आहे असे वाटते. मध्यंतरी जरा मरगळ आली होती. पराजित अपराजित जरा कंटाळवाणी वाटते. कात्रणे आवडली. कात्रणामधील नक्षलवादी प्रमाणे असे नक्षलवादी सर्व गल्लीबोळात सापडतील. त्यांचा बंदोबस्त करणे कठीण नाही. पण सुदेवप्रमाणे नक्षलवादीचा आवाज दाबणे कठीण. नक्षलबारीत पडलेल्या क्रांतीच्या ठिणग्यांतून उद्या वणवा पण पेटेल. कारण शेतकरी किती दबलेला आहे व पिचतो आहे हे उठलेली जनता दाखवते आहे व 'पुणे ते पूर्णिया 'ने ते एकवार दाखवले आहे.

आता द्विसाप्ताहिकात क्रीडाक्षेत्राचा अंतर्भाव करावा. इतके दिवस त्याकडे लक्ष दिलेले नाही. एक सूचना : जरा किमत कमी करावी असे वाटते.

६ सप्टेंबर, १९७० — अनिल वाकणकर, शीव, मुंबई

Sir,

¤ I am not a regular reader of the Marathi Press. I am a Goan Catholic. Few days back, a Maharashtrian friend of mine, in-



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

sisted that I must read Manoos issue o. 15th August 1970. I went through the issue, particularly the article on Goa by Mr. .S L. Soman.

Here I must mention that, though I can read and understand and talk Marathi very well, I cannot express my views in Marathi. And hence the letter in English.

I must first of all congratualate Mr. Soman. His pen is very powerfull and also wonderfull. His dignosis of the present crisis is very correct and so is the remedy suggested by him. But while doing so good a job, in his " Mandvi Wahun De..." Mr. Soman has done unjustice to Goan Catholics. Catholics in Goa though oppose mereger of Goa with Maharashtra, definitetely do not favour Salazar rule once again. In his own article Mr. Soman mentions names like Maskarnhas, Toni Fernandis, Anthony D'soza and so on. And still, at the same time he hurts Catholics saying that they praise Portugese rule. I, on behalf of all Goan Catholics can confidently says that Catholics are as Patriots as Hindus or any other community in India. Their demand for seperate Goa state should not be mistaken.

But for this lapse, Mr. Soman's article is really very good. The remedy suggested by him should receive hearty wel–come from all corners.

21 August, 1970. **T. Crasto, Bombay.**

□ 'वात्रणे 'मधील 'कात्रज घाटातील नक्षलवादी बैल' हा सेना महाराज यांचा लेख आवडला. त्यामुळे नक्षलवादो शब्दाचे दोन अर्थ समजले. तसेच पहिल्या पानावरील माणूस अक्षरातील विविध चिन्हांचा अर्थ काय ? कृपया खुलासा व्हावा.

५ सप्टेंबर, १९७० **प्रकाश केशव डोंगरे, चिकुर्डे**

ॐ, श = मप्र², डोळा ही सर्व ज्ञान, विज्ञान, अध्यात्म, संशोधन याची प्रतिके या अर्थाने वापरली आहेत. — संपादक

□ □ □

दिल्ली दरबार

# संस्थानिक गेले म्हणून चुकल्याचुकल्यासारखे वाटण्याचे कारण नाही !

सदाशिव पेठकर

संसदीय राजकारणाच्या डावपेचांमध्ये प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी पुन: एकदा आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आहे. देशातील चौदा प्रमुख बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या वेळी त्यांनी जसा राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीचा आधार घेतला त्याचप्रमाणे यावेळेलाही राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने, देशातल्या तीनशेवीस संस्थानिकांचे तनखे आणि विशेषाधिकार रद्द करून जुन्या सरंजामधारी समाजव्यवस्थेचे हे शेवटचे अवशेष निकालात काढले आहेत.

अर्थात बँक-राष्ट्रीयीकरणाच्या वेळच्याप्रमाणे यावेळेही नाव समाजवादाचे आणि डाव सत्तास्पर्धेचा असाच हा प्रकार होता. त्यावेळी जशी प्रधानमंत्र्यांना आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करण्याची गरज वाटली नाही त्याचप्रमाणे यावेळीही लुसाका येथल्या अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेला जाण्यासाठी दिल्लीहून निघण्यापूर्वी या प्रश्नाची तड लागलीच पाहिजे असे त्यांनी ठरविले होते आणि त्यामुळे राज्यसभेमध्ये अनपेक्षित रीतीने अवघ्या एका मताने तनखे आणि विशेषाधिकार रद्द करण्यासंबंधीचे घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झालेले असतानाही त्यांनी त्यादिवशी रात्री साडेदहा वाजता मंत्रिमंडळाची बैठक घेऊन, याप्रकरणी राष्ट्रपतींचा खास अधिकार वापरण्याचे ठरविले.

वस्तुतः या तीनशेवीस भूतपूर्व संस्थानिकांना दिल्या जाणाऱ्या तनख्याची रक्कम तशी काही फार

नव्हती. या तनख्यापायी केंद्र सरकारच्या तिजोरीतून दरवर्षी चार कोटी एक्या-ऐंशी लाख रुपये खर्च होत होते आणि कालांतराने ही रक्कम कमी कमी होत जाणार होती. केंद्र सरकारच्या मालकीच्या एकेका कारखान्यातील उधळ-पट्टीची रक्कमही याहून कितीतरी अधिक असते हे सार्वजनिक हिशेब समितीचे अहवाल चाळले की सहज दिसून येते. त्यामुळे समाजवादाच्या दृष्टीने श्रीमती इंदिरा गांधी यांनी फार काही साधले आहे असे मुळीच नाही.

राहता राहिला प्रश्न या भूतपूर्व संस्थानिकांच्या रूपाने शिल्लक राहिलेल्या सरंजामशाही अवशेषाचा. परंतु बड्या बागाईतदारांची नवी सरंजामशाही निर्माण करणाऱ्या आणि या नव्या सरंजामशाहीच्या कलाने आपले धोरण आखणाऱ्या सत्ताधारी पक्षाला या जुन्या तीनशेवीस घराण्यांची सरंजामशाही खुपावी हे फारसे खरे मानता येत नाही. परंतु पुरोगामित्वाच्या पुस्तकी कल्पनांमध्येच आपण अजून घुटमळत आहोत हेच खरे. नाही तर इंदिरा गांधी यांनी तनखे रद्द करण्याचे विधेयक मांडताच साम्यवाद्यांना आणि समाजवाद्यांना एवढा हर्षवायू व्हायचे कारण नव्हते. इंदिरा गांधी यांचा समाजवाद, समाजवादी पक्षांचा समाजवाद आणि साम्यवाद्यांचा समाजवाद यात जर फारसा फरक नसता तर इंदिरा गांधी समाजवादी आहेत असा साक्षात्कार घडल्यानंतर हे सर्व पक्ष इंडिकेट काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले असते. परंतु या प्रत्येक पक्षाची समाजवादासंबंधीची कल्पना वेगळी आहे. पुरोगामित्वाची झूल पांघरण्याच्या बाबतीत मात्र या सर्वांची एकवाक्यता आहे. त्यामुळेच स्वतंत्र भारताच्या पहिल्या उपप्रधानमंत्र्याने भारत सरकारच्या नावाने संस्थानिकांशी करार केलेले आहेत आणि ते एकतर्फी मोडणे म्हणजे आपण आपल्या शब्दाला जागत नाही असा याचा अर्थ होतो एवढा विवेक, एरवी साधनशुचितेची महती गाणाऱ्या समाजवाद्यांनी दाखविला असता.

कराराचे म्हणून काही पावित्र्य असते आणि बदललेल्या परिस्थितीत त्या करा-रात बदल घडविणे आवश्यक असले तरी त्यासाठी केवळ बहुमताचा बडगा वापरणे अनुचित असते ही साधी गोष्टही तनखे आणि विशेषाधिकार रद्द करण्याच्या गदा-रोळात विसरली जाण्यामागे सत्तेच्या सोयीस्कर राजकारणाशिवाय वेगळा अर्थ संभवत नाही

अर्थात् संस्थानिकांनीही काळाची पावले ओळखून, आपल्या विशेषाधिकारांवर पाणी सोडण्याची तयारी दर्शविली असती तर त्यांना मिळणारे तनखे फारसे कोणाला बोचले नसते. एक तर या संस्थानिकांचा स्वातंत्र्य-पूर्व काळातला इतिहास फारसा स्पृहणीय नाही. हाताच्या बोटावर मोजणारे चार दोन संस्थानिक सोडले तर बाकीच्यांची सारी हयात ब्रिटिश रेसिडेंटची मर्जी राखण्यातच खर्ची पडली आहे. परक्यांच्या गुलामगिरीतून देश मुक्त करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यवीर आपल्या प्राणांची आहुती देत असताना, या आंदोलनाशी एक भारतीय म्हणून

आपलेही काही नाते आहे, या आंदोलनाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव बहुसंख्य संस्थानिकांनी कधीच बाळगली नाही. स्वातंत्र्यलढ्याचा विचार बाजूला ठेवला तरी निदान आपल्या प्रजेच्या सुख-दुःखांशी हे राजे-महाराजे समरस झाले होते असेही दिसत नाही. मदिरा आणि मदिराक्षी यांच्या कैफात आकंठ बुडून गेलेल्या संस्थानिकांचे बेताल वर्तन कोणत्या सीमेपर्यंत गेले होते याच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक गोष्टी दिवाण जरमानी-दास यांनी आपल्या 'महाराज' या ग्रंथात कथन केलेल्या आहेत. भारताचे स्वातंत्र्य दृष्टिपथात आले त्यावेळी देखील या 'महाराजां'नी भारतात समाविष्ट होण्यापूर्वी काही कमी खळखळ केलेली नाही. आपण आपले संस्थान पाकिस्तानात विलीन केले तर आपला अधिक फायदा होईल या विचाराने पंजाब आणि राज-स्थान भागातील काही संस्थानिकांनी जीनांशीही बोलणी केली होती. शेवटी सर्वच बाजूंनी कोंडी झाल्यामुळे, या संस्थानिकांनी सरदार वल्लभभाई पटेल यांनी पुढे केलेल्या सामीलनाम्यावर मुकाट्याने स्वाक्षरी केली. हे सारे परिस्थितीच्या रेट्याने घडले, संस्थानिकांच्या स्वेच्छेने नव्हे हें वल्लभभाईंना माहीत होते आणि तरीही त्यांनी संस्थानिकांच्या या तथाकथित 'औदार्या'बद्दल त्यांच्याशी तनख्यांबाबत आणि विशेषाधिकारांबाबत करार केला.

स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात आल्यालाही आता वीस वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. परंतु आपण हें कालविसंगत विशेषाधिकार सोडून द्यावेत असें संस्थानिकांना वाटले नाही यावरून त्यांची मनोवृत्ती स्पष्ट होते. हे विशेषाधिकार कोणते हे जाणून घेणेही मनोरंजक ठरते. आयातकर न भरता परदेशातून मद्य आणि सिगारेटी मागविण्याचा अधिकार यांना सोडवत नव्हता. दरमहा पाचशे रुपये उत्पन्न असणाऱ्या नागरिकाला प्राप्तीकर भरावा लागतो. आपल्याला मिळणाऱ्या तनख्यातून एक पैसाही प्राप्तीकराच्या वा अन्य कराच्या रूपाने सरकारी तिजोरीत जाता कामा नये यासाठी या संस्थानिकांची धडपड सुरु होती. मन मानेल तेव्हा परदेशात जायला मिळावे आणि पाहिजे तितके दिवस तेथे वास्तव्य करता यावे यासाठी खास पासपोर्ट आणि चलनविषयक तरतुदी यापुढेही कायम रहाव्यात यासाठी या संस्थानिकांचा अट्टाहास सुरू होता.


संस्थानिकांसंबंधी सर्वसाधारण जनमानसामध्ये अप्रीती वसत आहे ती त्यांच्या बेमुर्वतखोर वर्तनामुळे. या देशाच्या जीवनप्रवाहाशी आपण समरस झाले पाहिजे, इतर देशबांधवांहून आपण वेगळे नाही असे आपण आपल्या वर्तनाने दाखविले पाहिजे एवढे भान त्यांना कधी उरलेच नव्हते. भारत सरकारशी वाटाघाटींचा घोळ घातला जात असताना 'आम्ही आणि आमची रयत' अशाच भाषेत ही मंडळी बोलत होती. 'आम्ही आणि आपला भारत' अशी भाषा त्यांच्या तोंडून कधी निघालीच नाही. त्यामुळेच, संस्थानिकांचे तनखे आणि विशेषाधिकार रद्द

करताना, इंदिरा गांधी यांनी जुन्या करारांचे पावित्र्य राखले नाही हें जाणवंत असतानाही, जे झाले ते एका दृष्टीने योग्य होते असे वाटू लागते.

सात सप्टेंबरला हे जुने महाराज गेले. परंतु त्यामुळे लोकांना चुकल्याचुकल्यासारखे मुळीच वाटणार नाही. दिल्लीतल्या पंचावन्न आणि सतरा राज्यातल्या व चार केंद्रशासित प्रदेशातल्या चारशे मंत्र्यांचा थाटमाट शाही स्वरूपाचाच असतो. या मंत्र्यांची प्रशस्त अन् ऐषारामी निवासस्थाने, लहानसहान कारणाकरिता (किंवा कोणतेही कारण नसतानादेखील) हवाई प्रवासाची खास सोय आणि त्यांना मुजरे करण्यासाठी ठिकठिकाणच्या सर्किट हाऊसवर होणारी गर्दी हा सारा आपल्या समाजवादी लोकशाहीला मान्य असणारा संस्थानी मामला आहे. या नव्या संस्थानिकांचे वैभव नातेवाईकांच्या नावांवर चारी अंगानी फुलत असते. एखादा केंद्रिय मंत्री प्राप्तीकर भरण्याचे आठ आठ वर्षे सहज विसरू शकतो आणि तरीही तो लोकांना चारित्र्याची आणि त्यागाची महती सांगणारी प्रवचने झोडू शकतो.

जुन्या आणि नव्या संस्थानिकांमध्ये फरक काही असेल तर तो हाच. जुने संस्थानिक निदान लोकांना उपदेशाचे डोस तरी पाजत नसत. आपण स्खलनशील आहोत याची बोचणी त्यांच्या अंतर्मनाला जाणवत असायची. मनमोकळ्या बैठकीमध्ये तिचा उच्चारही व्हायचा. पण आपल्या या नव्या संस्थानिकांना आपल्या आचारात आणि उच्चारात विसंगती आहे याची बिलकुल खंत वाटत नाही.

खंत वाटण्याची गरजही नाही. दहा कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी व्याकूळ झालेल्या या मंडळींना इतक्या क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष द्यायला फुरसत तरी कुठे आहे !



# तडजोड ! किळसवाणी, फसवी

मध्यावधी निवडणुका होतील असं आता कोणी ' सिरीअसली ' म्हणत नाही. त्यामुळे येत्या १७ तारखेस होणाऱ्या केरळमधील निवडणुका म्हणजे सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीची रंगीत तालीम आहे असे म्हणावे लागेल. केरळमधील जनतेला तसे वाटत नसले, तरी राजकीय पक्षांचा या निवडणुकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निर्विवादपणे वर सांगितल्याप्रमाणे आहे.

देशातील अस्थिर राज्यांमध्ये केरळ आघाडीवर आहे. १९५७ मध्ये केरळची निर्मिती झाल्यापासून आतापर्यंत पाच निवडणुका झाल्या असून येत्या १७ तारखेस तेथील जनता सहाव्यांदा मतदान करेल.

या निवडणुकांमध्ये २१ लहानमोठे पक्ष उतरले असून त्यापैकी चौदा पक्षांना विसर्जित विधान सभेमध्ये लहानमोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले होते.

डाव्या कम्युनिस्टांचे नेते आणि माजी मुख्यमंत्री श्री. नंबुद्रिपाद यांच्या मते निवडणुकांमध्ये २१ पक्ष असले, तरी प्रामुख्याने त्यांची विभागणी तीन गटांमध्ये झाली आहे. ते म्हणतात, इंदिरा काँग्रेस फ्रंट, अप्पा काँग्रेस फ्रंट, आणि त्यांची स्वतःची आघाडी अशी ही तिहेरी लढत आहे.

यापैकी उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडीमध्ये मुस्लिम लीग, आर. एस्. पी., सत्ताधारी काँग्रेस, यांचा समावेश आहे. या सर्व मंडळींनी उघड उघड एकत्र येऊन ही आघाडी स्थापन केली आहे. जातीयतेविरुद्ध मोहीम उघडण्याची, आणि कम्युनिझमपासून देशाचा बचाव करण्याच्या वल्गना करणारी सत्ताधारी काँग्रेस, मुस्लीम लीग आणि दिल्लीत त्यांची सत्ता कायम ठेवण्यास मदत करणारे उजवे कम्युनिस्ट, यांच्या गळ्यात गळा घालून मतांची भीक मागत आहे.

अप्पा काँग्रेसच्या कम्युनिस्टविरोधी आघाडीमध्ये केरळ काँग्रेस, आणि केरळमध्ये मुळीच स्थान नसलेले जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष हे त्यांचे बारगळलेल्या ' भव्य आघाडी ' योजनेतील मित्र आहेत. तथापि सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे संघटना काँग्रेसशी केरळच्या निवडणुकीबाबत कोणतीही तडजोड करू नये, अथवा त्यांच्या सहकार्याने किंवा पुढाकाराने नियंत्रित होणाऱ्या कोणत्याही आघाडीमध्ये डाव्या कम्युनिस्टांनी सहभागी होऊ नये, असा पक्षाच्या पॉलीटब्युरोचा सुस्पष्ट आदेश असताना नंबुद्रिपादांनी संघटना काँग्रेस आघाडीशी जमवलेले सूत म्हणजे निवडणुका जिंकण्यासाठी कोणते राजकारण खेळले जात आहे यावर प्रकाश टाकणारे आहे.

पृष्ठ ६२ वर

# राज्ये...राज्ये...आणि राज्ये

भारताच्या पूर्व सीमेवरील मणिपूर आणि त्रिपुरा या छोटया केंद्रशासित प्रदेशांना स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याचे सरकारने ठरविले आहे. परवाच तशी घोषणा प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी लोकसभेत केली. नेफा आणि पूर्व सीमा या भागांची अविकसित परिस्थिती आणि सुरक्षाविषयक प्रश्न लक्षात घेऊन या प्रदेशांना राज्याचा दर्जा देण्याचे तपशील ठरविण्यात येतील असे त्यांनी सांगितले.

मणिपूर-त्रिपुराला एकदा स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला की इतर केंद्रशासित प्रदेशांच्या मागण्यांकडे केंद्रसरकारला दुर्लक्ष करता येणार नाही. स्वतंत्र राज्याची गोव्याची मागणी जुनीच आहे. दरम्यान जनसंघाच्या लोकांनी दिल्लीच्या केंद्रशासित प्रदेशालाही राज्याचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली आहे. आणि त्यासाठी चळवळ करण्याचे ठरविले आहे. दिल्ली कौन्सिल आणि आजूबाजूचा भाग यावर जनसंघाची चांगलीच पकड आहे. म्हणून जनसंघाचे हे प्रयत्न. शिवाय परवाच पाँडेचेरीच्या केंद्रशासित प्रदेशाचे मुख्यमंत्री श्री. फरुक मरीकार यांनीही पाँडेचेरीला राज्याचा दर्जा मिळावा अशी मागणी केली आहेच. अंदमान, निकोबार आणि लखदीव, मालदीवचे लोकही याबाबतीत मागे राहणार नाहीत. तेही ही मागणी पुढे रेटतील असे दिसते.

मणिपूर त्रिपुराची मागणी मान्य केल्यामुळे ही एक प्रकारची साखळीची प्रतिक्रिया निर्माण होणार आहे याला काही कारणे आहेत. एक म्हणजे या प्रदेशांचा छोटा आकार. आणि दुसरे म्हणजे या प्रदेशांना राज्याचा दर्जा देताना आर्थिक स्वायत्तता हा निकष लावला जाणार नाही. सरकारतर्फे असे सांगण्यात आलेले नसले तरी तसा निष्कर्ष निघतो. लोकसभेत श्री महावीर त्यागी आणि डाह्याभाई पटेल यांनी या बाबतीत आपली नाखुषीही व्यक्त केली आहे.

कारण हा जर निकष नसेल तर मग गोव्याचे काय बिघडले? पाँडेचेरी का नाही? दिल्लीचीही मागणी मग मान्य करायला हरकत नाही. एकदा हे झाले की महाराष्ट्रातील विदर्भ, आंध्रमधील तेलंगण यांचे प्रश्न पुन्हा उभे राहतील. ही तर सरळ आर्थिक दृष्टया स्वायत्त राज्ये होऊ शकतात. प्रत्येक राज्यात, विशेषत: उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात असे काही भाग आहेत की जिथले लोक स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहेत. या मागण्यांचा जोर वाढेल.

या केंद्रशासित प्रदेशांना राज्यांचा दर्जा देण्याविषयी समर्थन करणारांचे म्हणणे असे आहे की राज्यपुनर्रचना करताना आर्थिक स्वायत्तता हा निकष नव्हताच मुळी. भाषिक एकता आणि भौगोलिक सलगता हेच महत्त्वाचे निकष मानण्यात आले होते, आर्थिक स्वायत्तता हा दुय्यम प्रश्न होता. आणि तसे पाहिले तर संपूर्ण भारत तरी आर्थिकदृष्ट्या स्वायत्त आहे का ? आपल्या देशाला परदेशातून मोठ्या प्रमाणावर मदत घ्यावी लागतेच आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या राज्यांपैकी कितीतरी ' डेफिसिट स्टेट्स ' आहेत. तेव्हा आर्थिक स्वायत्तता हा महत्त्वाचा मुद्दा नाहीच.

काही महिन्यांपूर्वी सर्वोदय नेते जयप्रकाश नारायण यांनी छोटी छोटी राज्ये असण्यावर भर दिला होता. एका भाषणात ते म्हणाले होते की, छोटी पण आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण राज्ये निर्माण होणे भारताच्या ऐक्याच्या दृष्टीने अधिक चांगले होईल. आत्ताच्या प्रचंड राज्यांसारखी ती प्रबळ असणार नाहीत. त्यामुळे केंद्र सरकारची ताकद वाढेल.

परंतु जे घडणार ते जयप्रकाशजींची अपेक्षा अर्धवट पुरी करणारेच घडणार असे दिसते. छोटी पण आर्थिक दृष्ट्या एकदम परावलंबी राज्ये निर्माण होतील असा रंग दिसतो. हिमाचल प्रदेश व मणिपूर-त्रिपुरा यांना राज्यांचा दर्जा देणारी विधेयके संसदेच्या पुढच्या अधिवेशनात मांडली जाणार आहेत. त्यावेळपर्यंत इतर राज्यांच्या मागण्यांचा जोर वाढेल यात शंकाच नको.

केरळातल्या निवडणुकींचे बेंडबाजे वाजत असतानाच इकडे उत्तर प्रदेशात भारतीय क्रांतिदलात फुटीरतेचे वारे वाहू लागले आहेत. मागल्या महिन्यात नव्या कॉंग्रेसमध्ये विलीन होण्यास नकार देऊन चरणसिंगांनी उत्तर प्रदेशच्या राजकारणाला नवी धार आणली होती. कारण उत्तर प्रदेशचे सरकार आपल्या खिशात पाहिजे ही नव्या कॉंग्रेसची सतत धडपड चालू आहे. आता विधानसभेतील भाक्रांदचे पाच सदस्य परवाच फुटून निघाले आहेत. आणि चरणसिंग सरकार पाडण्याच्या उद्योगाला ते लागले आहेत.

या पाच जणांचे नेते शोनाथ सिंग म्हणताहेत की भाक्रांदचे आणखी अनेक सदस्य पक्षातून फुटून निघणार आहेत. कारण काय तर चरणसिंगांची हुकूमशाही प्रवृत्ती आणि त्यांच्या सरकारची लोकविरोधी धोरणे. भाक्रांदच्या संसद सदस्यांनी तनखेबंदी बिलाच्या विरोधात मत दिले आहे. तेही शोनाथ सिंगांच्या गटाला नापसंत आहे म्हणून हे लोक बाहेर पडले. आता ते आपला नवा गट स्थापन करीत असून अनेक अपक्ष उमेदवारांनाही जाळ्यात ओढण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

— अरुण गोसावी

# १५ जागा – ७६ उमेदवार !!

सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचे तत्त्व आपल्या देशाने स्वीकारल्यानंतर त्या दृष्टीने भराभर पावले टाकण्यास सुरुवात झाली. साहजिकच गोवामुक्तीनंतर गोव्यातील जनताही सदर विकेन्द्रीकरण प्रयोगाची बळी झाली. नव्यानेच आलेली लोकशाही, तीसुद्धा साडेचारशे वर्षांच्या प्रदीर्घ पोर्तुगीज हुकूमशाहीनंतर, आणि राजकीय अपरिपक्वता यामुळे आज तरी हा प्रयोग येथे असफल झाल्यासारखा वाटतो आहे.

येत्या चार सप्टेंबर रोजी गोव्यात प्रथमच नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. ६१ डिसेंबरला गोवा स्वतंत्र झाला. दर साली-ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या. इ. स. १९६३ मध्ये विधान सभेसाठी मतदान झाले. त्यानंतर विलिनीकरणासाठी 'जनता कौल' झाला व ६७ मध्ये दुसऱ्यांदा निवडणुका झाल्या. अर्थातच येथील मतदारांमध्ये, त्यांच्या विचारसरणीत राजकीय प्रौढत्व निर्माण झाले असे मानावयास हरकत नाही.

आतापर्यंत राज्यसरकारवर खूप टीका झाली या निवडणुका न घेतल्याबद्दल. शेवटी गेल्यावर्षी सरकारने या बाबतचा कायदा पास केला आणि तब्बल वर्षभराने अखेर निवडणुका होऊ घातल्या. गेली नऊ वर्षे या नगरपालिकांचा कारभार चालत होता. कारण तो बंद पडू शकत नव्हता म्हणून. काही ठिकाणी सरकारनियुक्त अध्यक्ष, तर काही ठिकाणी तालुका मामलेदार हे पालिका अध्यक्ष म्हणून काम पहात होते.

संपूर्ण गोमंतक हे एक छोटेखानी राज्य. सात लाख लोकवस्तीच्या या प्रदेशात ३० सदस्यांची विधानसभा आहे. दोन खासदार आहेत. १३८ ग्रामपंचायती आहेत. आणि आता ११ नगरपालिका आहेत.

पोर्तुगीजांनी या ११ पालिका निर्माण केल्या. पण त्यांचे बरेचसे स्वरूप ग्रामपंचायतीसारखे ठेवले होते. 'काम्र म्युनिसिपाल' हे त्यांचे पोर्तुगीज नाव. यापैकी पणजी, मडगाव, वास्को, म्हापसा ही चार पालिका क्षेत्रे सोडली तर इतर ठिकाणी मतदारांची संख्या १० हजारांहून खाली आहे. कमीत कमी १० सदस्यांच्या या पालिका आहेत. आर्थिक दृष्ट्या वरील चार सोडून सर्वांचा कारभार संपूर्णतया राज्य सरकारच्या मदतीवरच चालावयाचा आहे. कारण सदस्यांचे भत्ते व इतर प्रशासन यासाठीच पालिकेचे उत्पन्न अपुरे पडणार असल्याची तक्रार आतापासूनच करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांचे वैयक्तिक मत याबाबतीत वेगळेच होते.

फक्त चार पालिका ठेवून बाकीच्यांना नगरपंचायतीसारखे स्वरूप द्यावे म्हणून त्यांनी खूप खटपट केली. पण अखेर पक्षांतर्गत दडपणाला त्यांना बळी पडावे लागले. अखेर 'सरकारकडून तुम्हाला अनुदान मिळणार नाही. तुमच्या कर्माची फळे तुम्ही भोगा' असे सांगून त्यांनी नाईलाजाने याला मान्यता दिली. जनतेवरती विनाकारण करांचा बोजा बसणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

पालिका अथवा ग्रामपंचायती यांच्या निवडणुकात पक्षीय राजकारण असू नये असे नामदार बांदोडकरांना वाटते. त्यासाठी त्यांच्या सत्ताधारी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने या निवडणुकात भाग न घेण्याचा निर्णय घेतला. याबाबत त्यांच्याशी चर्चा करीत असता ते म्हणाले, 'पालिकेच्या व्यवहारात राजकारण असूच नये. एखादी 'नागरी समिती' सारखी संघटना तयार करावी व योग्य उमेदवाराला लोकांनी मत द्यावे.'

विरोधी युनायटेड गोवन्स व जनसंघ–हा अखिल भारतीय–असे दोन पक्ष अधिकृतरीत्या या निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. गोव्यात नावापुरत्या असलेल्या नव्या काँग्रेसच्या नावाने काही ठिकाणी उमेदवार उभे आहेत. पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने येथे दणदणीत आपटी खाल्ल्यानंतर भारताच्या निवडणूक कमिशनरांनी नियमानुसार आवश्यक ती मते मिळविता न आल्याने राजकीय पक्ष म्हणून गोव्यापुरती काँग्रेस रद्दबातल ठरविली आहे याची येथे याद येते. काही पालिकातून नागरिक समिती व बरेच अपक्ष उमेदवार अशी ही निवडणूक आता होणार आहे.

म. गो. च्या बंडखोर गटाने या निवडणुका लढविण्याची घोषणा केली होती. माजी उपाध्यक्ष व बंडखोरांचे नेते आमदार कृष्णनाथ बाबुराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी प्रति कार्यकारिणी स्थापन केली होती. परंतु आज तरी त्यांच्या गोटात सामसूम आहे. मध्यंतरी झालेल्या संघर्षाने केलेल्या नुकसानीचा अंदाज घेत आणि आत्मसंशोधन करीत ही मंडळी सध्या बसली असल्याचे येणाऱ्या बातम्यांवरून कळते.

हाती आलेल्या वृत्तानुसार पालिका निवडणुकांची स्थिती अशी आहे––

पणजी १५ जागांसाठी ७६ अर्ज, मडगाव १५/१३४, म्हापसा १३/७८, वास्को १५/१०६, फोंडा १०/५१, पेडणे १०/२८, सत्तरी १०/२९, केपे १०/२२, डिचोली १०/३६, काणकोण १०/२९, सांगे १०/२६. सध्या उभ्या असलेल्या उमेदवारांतून निरनिराळ्या विचारसरणीचे लोक निवडून आल्यास पालिकांचा कारभार कसा चालेल याबाबत सामुदायिकरीत्या चिंता व्यक्त करण्यात आली.

– विनायक बार्देशकार

# कात्रणे । कात्रणे

## राजकीय परिभाषा

श्री. र. के. खाडिलकर, केंद्रीय मंत्री हे नुकतेच अहमदाबाद येथे गेले होते. अहमदाबाद शहर इंदिरा-काँग्रेसच्या बैठकीचे उद्‌घाटन करताना त्यांनी सांगितले–

'चक्रवर्ती राजगोपालाचारी मेल्यानतर स्वतंत्रपक्ष निकालात निघेल...'

प्रत्येक सुसंस्कृत लोकशाहीप्रधान देशाची राजकीय परिभाषा किमान सभ्यतेच्या पातळीवर असते. परंतु कम्युनिस्ट नेते हे स्वतःची निराळी भाषा रूढ करतात. त्यांचे ज्यांच्याशी पटत नाही – 'त्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत' किंवा 'त्यांना लिक्विडेट केले पाहिजे' अशा जाहीर वल्गना ते करीत असतात. इंदिरा काँग्रेसवाले सध्या कम्युनिस्टांशी सोयरीक करून असल्यामुळे, काही काळ कम्युनिस्ट नेते, इंदिरा-यशवंतराव-जगूबाबू या थोर थोर नेत्यांच्या वाटेला जाणार नाहीत ! परतु एकेकाळी गांधीजींनाही जनतेचे शत्रू ठरवून मोकळी झालेली ही मंडळी, या थोर थोर नेत्यांवर केव्हा थुंकू लागतील याचा भरवसा देता येत नाही. सध्या इंदिरा-काँग्रेसमध्ये शिरलेल्या या जातीच्या लोकांचे 'थुंकीझेले' ही भूमिका इंदिरा-काँग्रेसवाले करीत आहेत. साधन-शुचिता, अहिंसा आणि बापूजी यांच्या नावाने वेळीअवेळी गळा काढणाऱ्या या मंडळींपुढे, नाही तर श्री. खाडिलकर अशी भाषा काढू शकले असते काय ?

कुणीही मेल्यानंतर नेमके काय होते ?

'Oh the Death ! The Death ! It buries every error, covers every defect – extinguish every resentment ! From its peaceful bosom spring none but fond regrets & tender recollections. Who can look down upon the grave, even of an enemy & not feel a compunctions throb, that he should ever have warred– !

वॉशिंग्टन आयर्व्हिगला अभिप्रेत असलेली अशीच भारताची आतापर्यंतची परंपरा आहे. मरणानंतर इथे वैर संपते. म्हणूनच प्रतापगडावर अफझुलखान हिरव्या चादरीखाली सुखाने आजही चिरनिद्रा करू शकतो. मेलेल्यांची थडगी इथे पुनर्मूल्यमापन करून उखडली जात नाहीत. इथे मरण चुका झाकून टाकते, मृताची अनिष्ट कृतीही नजरेआड होते. उरतात त्या फक्त माणसाच्या संबंधातील काही कोवळ्या आठवणी. अगदी हाडवैऱ्याच्या थडग्याकडे पहातानाही अंतःकरणात इथे

मनाला रूखरूख लागते, की अरेरे, या माणसाने उगाच एवढा संघर्ष केला. आणि म्हणून सभ्य माणसे इथे अभद्र भाषा बोलत नाहीत.

अशा या भूमीत आता सुरू झालेली ही खाडिलकरी भाषा, किती भयानक आहे पहा. स्वतंत्र पक्षाविषयी सोयरसुतक फार थोड्यांना आहे! परंतु राजगोपालाचारी मेल्यानंतर स्वतंत्र पक्ष निकालात निघेल, असे म्हटल्यावर ज्या तथाकथित समाजवाद्यांना व साम्यवाद्यांना स्वतंत्र पक्ष लवकर निकालात निघावासा वाटतो त्यांना राजगोपालाचारी यांना लवकरात लवकर खलास करणे ही देशभक्ती वाटू शकेल! आणि याच न्यायाने सर्व पक्ष वागू लागले तर?

खाडिलकर आणि त्यांचे थुंकीझेले, यांना हे माहीत आहे काय की जो मरणाची वाट पहात असतो त्याला मृत्यू भेटत नाही, आणि जो दुसराच आधी नक्की मरणार आहे या भ्रमात रहातो, त्याला पुष्कळवेळा मृत्यू खेचून नेतो. मृत्यू 'सिनिऑरिटी लिस्ट' मानीत नाही. राजगोपालाचारी मेल्यानंतर स्वतंत्रपक्षाचे काय व्हायचे असेल ते होईल, परंतु तो आसुरी आनंद भोगण्यासाठी खाडिलकर नक्की रहाणार आहेत, असे आश्वासन त्यांनी परमेश्वराकडून मिळवले आहे काय? ☐

## लाख मोलाच ...

सुप्रसिद्ध ऊर्दू कवी रघुपतिसहाय फिराक, यांना नुकतेच भारतातील सर्वोच्च बहुमानाचे, लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले. एका पत्रकाराने त्यांची नुकतीच मुलाखत घेतली. या मुलाखतीतील काही प्रश्नोत्तरे—

प्रश्न : गेल्या साठ वर्षातील उत्तम इंग्रजी गद्य लिहिणारे भारतीय कोण?

फिराक : आनंद कुमारस्वामी, अरविंद घोष, जगदीशचंद्र बोस, खुदाबक्ष, अमीर अली, सी. वाय. चिंतामणी, गांधीजी, जवाहरलाल नेहरू, मौलाना महमद अली, रवींद्रनाथ टागोर.

स्वामी विवेकानंद, महंमद इक्बाल, सर्वपल्ली राधाकृष्णन हे उत्तम इंग्रजी वक्ते म्हणून येतील, परंतु त्यांचे गद्य लेखन इतके चांगले नाही.

प्रश्न : मौलाना आझादांचे ऊर्दू लेखन थोर दर्जाचे आहे ना?

फिराक : मौलाना आझादांचे गद्य हे उपजतच गतप्राण झालेले असे.

प्रश्न : सध्याचे श्रेष्ठ ऊर्दू कवी कोण कोण आहेत?

फिराक : सध्या कुणी चांगले ऊर्दू काव्य लिहितो असे मला वाटत नाही. माझ्यानंतर भारतात चांगला ऊर्दू कवी झालेलाच नाही.

प्रश्न : इंग्रजी भाषेविषयी आपले काय मत आहे?

फिराक : भारतात थोर वाङ्मयीन कलाकृती उत्पन्न व्हाव्यात अशी इच्छा असतील

तर इथे इंग्रजीचे पुनर्जीवन झाले पाहिजे. केवळ हिंदी किंवा ऊर्दू भाषा, मोठाले साहित्यकार निर्माण करू शकणार नाही.

प्रश्न : भारतीय संस्कृतीचे विशेष काय आहेत ?

फिरक : शांततेचा सतत शोध हे भारतीय संस्कृतीचे रहस्य आहे. 'रामायण' व महाभारत या महान ग्रंथातील मूल्ये जगातील इतर कुठल्याही महान रचनेत आढळत नाहीत. आपली ग्राम ण गीते व लोकगीते ही जगातील कोणत्याही ग्रामीण लोकगीतांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्यातील न्यूनता ही आहे की माणसातील समता हे मूल्य आपल्यापाशी नाही. लोकशाहीची मोठी परंपरा नाही. चोख सचोटीच्या राज्यकारभाराचीही परंपरा नाही.

प्रश्न : आपल्या देशातील शिक्षणाचा दर्जा कसा सुधारावा ?

फिरक : मातृभाषेची हेळसांड न करता, इंग्रजी भाषेचा अभ्यास शाळांतून सुरू केल्याशिवाय हे होणार नाही. जर आपण इंग्रजीची कास सोडली तर आजच्या जगात आपण आणि अशिक्षित यांच्यात फारसा फरक रहाणार नाही. उत्तम इंग्रजी ज्ञान असल्याखेरीज उत्तम गद्य वा पद्य लेखन भारतीय भाषात होणे कठीण आहे असे मला वाटते.

प्रश्न : काही राजकीय पक्षांना अभिप्रेत असलेल्या 'हिंदू राष्ट्र' या कल्पने-विषयी आपले काय मत आहे ?

फिरक : हिंदू राष्ट्राची कल्पना वेडगळपणाची (Absurd) आहे. कारण प्रत्येक सहावा-सातवा माणूस हा अहिंदू आहे. विकसन पावणाऱ्या राष्ट्रीय जीवनात, अहिंदूंच्या अपेक्षांचा विचार टाळता येणार नाही. हिंदू व मुसलमानांचे आर्थिक प्रश्न समान असतील, तर त्यांचे सांस्कृतिक प्रश्नावरही एकमत राहील. मुसल-मानांना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी 'खेळणे' म्हणून वापरले, यामुळे हिंदूंचा मुसल-मानांवर राग आहे. मुसलमानांची बहुसंख्या असलेली राज्ये हिंदूना मान्यच होती परंतु पाकिस्तान निर्मिती ही मोठी चूक झाली आहे !

तात्पर्य–

१ : गेल्या ६० वर्षात एकाही मराठी माणसाने चांगले इंग्रजी गद्य लिहिलेले नाही.

२ : इंग्रजीत उत्तम वक्तृत्व करणारा कुणीही महाराष्ट्रीय माणूस आजतागायत झाला नाही.

३ : इंग्रजीचा भरपूर व्यासंग केल्याखेरीज उत्तम साहित्यकार होणे कठीण आहे.

४ : पाकिस्तान ही मोठी चूक आहे परंतु हिंदूराष्ट्राची कल्पना ही वेडगळ आहे.

**–सेना महाराज**

हत्या । हत्या



# हत्या

विजय तेंडुलकर

तुम्ही, समजा की विनायक आहात.

तुम्ही काही माणसांना एका रात्री पार्टीला तुमच्याकडे बोलावता. खाण्या-पिण्याची उत्तम सोय ठेवता.

त्या माणसांनाही कळत नाही की तुम्ही का बोलावलेत, त्यांचे असे आदरातिथ्य का होते आहे.

त्यातील एका तरुण स्त्रीला मात्र कळते. तिला मुळी ठाऊकच असते.

गंमत म्हणजे ही माणसे एकमेकांशी परिचित नसतात. जी अशी नसतात त्यांचा परिचय क्रमशः पुढे घडत जातो.

म्हणजे तुम्हीच तो घडवता.

तुम्ही सांगता की मित्रहो, तुम्हाला आश्चर्य वाटत असेल, मी तुम्हाला आज पार्टीला का बोलावले. पण मी एक प्रकाशक आहे. एका माणसाने आपल्या आठवणींचा एक ग्रंथ लिहिला आहे तो प्रकाशित करण्याचे मी ठरवले आहे.

मग आमचा काय संबंध ?—सर्वांचा गिल्ला.

तुम्ही त्यांना शांत करून पुढे सांगता, आपल्याला का बोलावले असे तुमच्या-पैकी प्रत्येकाला वाटणे साहजिकच आहे तुमचा माझा साधा परिचयदेखील नाही, असलो तर नावांनीच आपण एकमेकांना परिचित असू. मीसुद्धा खरे म्हणजे मनाशी हेच म्हणतो आहे की, साली काय गंमत आहे पहा, सुमारे महिन्यामागे मला कोणी म्हणते की या माणसांना तू महिन्याने घरी पार्टीला बोलावशील तर मलासुद्धा ते खरे वाटले नसते. पण मंडळी, योगायोग घडतात.

त्या आठवणींच्या ग्रंथाचे काय ?—अनेकांचा प्रश्न.

तुम्ही घसा किंचित खाकरून गळ्याचा टाय चाचपीत म्हणता, तिकडेच मी

येतो आहे. जरा धीर धरा. तर रणजित इनामदार नामक गृहस्थाने आपल्या या आठवणी लिहिल्या आहेत–

एक दोघे दचकतात. बाकीचे कोरा चेहरा ठेवतात. आलेल्यातील एक प्रौढ स्त्री आवंढा गिळते. हे चोरट्या नजरेने टिपीत तुम्ही सुखावता.

तुम्ही पुढे म्हणता, तुमच्यापैकी कुणाशी माझी ओळख नाही हे खरे तर अर्ध-सत्यच ठरेल. ओळख नव्हती हे मात्र सत्य. हे आठवणींचे हस्तलिखित या इनामदार नामक इसमाकडून माझ्याकडे आले, मी ते वाचण्यासाठी घेतले. आणि वाचू लागलो तर सारेच विलक्षण !

पुन्हा भोवती सूक्ष्म दचकादचक. चोरटे आवंढे.

मंडळी – तुम्ही म्हणता – या ग्रंथानेच मला तुमची एक ओळख ओघाओघाने करून दिली, असे मी म्हटले तर कृपा करून अविश्वासाने पाहू नका. तुमच्यापैकी प्रत्येकाविषयी या ग्रंथाने मला काही सांगितले आणि असे वाटले की, तुम्हाला एकदा पार्टीला बोलावून तुमचा परिचय करून घेतलाच पाहिजे. इतकेच नव्हे तर या अत्यंत मनोरंजक त्याचप्रमाणे उद्‌बोधक ग्रंथातली तुमच्याविषयीची मजेदार आणि अद्‌भुत माहिती प्रत्यक्ष प्रकाशनापूर्वी तुम्हाला ऐकवलीच पाहिजे.

भोवती निःस्तब्धता, तंग चेहरे, रोधलेले श्वास. तुम्ही हे सारे किलकिल्या नजरेने मनापासून एन्जॉय करता.

मात्र आसपासच कुठेतरी असलेली तुमची पत्नी अस्वस्थ आहे.

प्रकाशक असलेला विनायक नसलेले वाचकहो, यानंतर काय घडणार याविषयी तुमच्या मनात विलक्षण उत्सुकता असेल तर 'नाट्यसंपदा' गुजराती पातीचे 'हत्या' हे नाटक तुम्हाला आनंद देईल. ते एका इंग्रजी नाटकवर आधारलेले असले तरी गुजराती अर्धपाश्चात्य उच्चवर्गात ते बरेच व्यवस्थित 'फिट' करण्यात आले आहे. त्यातली जवळ जवळ निम्मी वाक्ये थोडीबहुत इंग्रजी असल्याने ते कळण्यासाठी गुजराती आलेच पाहिजे अशी अट मुळीच नाही. शिवाय येथवर वर्णन केलेल्या घटनेपुढे त्यात जे व जसे घडते ते सारे इंग्रजी खून-सस्पेन्सयुक्त चित्रपट किंवा मराठी रहस्यकथा वाचणाऱ्या प्रेक्षकाला अंदाजाने ताडण्याला वेळ लागण्याचे कारण नाही, इतके या पातळीवर ते तर्कशुद्ध आणि साधे सरळ आहे. म्हणजे आठवणींचा लेखक रणजित इनामदार (इनामदार हे आडनाव गुजराती समाजात असते हा या नाटकाच्या निमित्ताने लागणारा शोध;) हाच पहिल्या अंकाअखेरी प्रकाशकाच्या निमंत्रणानुसार पार्टीत येऊन थडकतो. त्याने लिहिलेली म्हणून उपस्थितांची वा त्यांच्या सुहृदांची जी पूर्वचरित्रे तो प्रत्यक्ष येण्यापूर्वी त्याचा तथाकथित प्रकाशक सर्वांना पाळीपाळीने ऐकवतो, ती कमालीची बदनामी कारक आणि सामाजिक प्रतिष्ठा नामक गोष्टीची हानी करू शकणारी असतात. सर्वजण इनामदारवर तो येण्यापूर्वीच संतप्त आहेत. चरफडत आहेत. प्रकाशका-

जवळचे हस्तलिखित नाहीसे केल्याने इनामदार थोडाच गप्प होणार आहे? तो नव्याने सर्व लिहील. मग त्याला गप्प कसे करायचे? अशा पद्धतीने इनामदार येण्यापूर्वीच त्याच्या खुनाचे वातावरण तयार झालेले असते. मतलबी 'प्रकाशका'च्या पुढाकाराने कटदेखील शिजून तयार असतो. जिने खून केला ती म्हणून एक काल्पनिक नाममात्र व्यक्ती आधीपासून योजनापूर्वक तयार केली जाते. आणि इनामदार येतो. सगळे त्याच्याशी हस्तांदोलन करीत असताना अंक संपतो.

इनामदारचा खून आता निश्चितच असतो. तो कसा घडतो ही एक उत्सुकता आणि उपस्थित व्यक्तींमधले गुंतत जाणारे परस्पर संबंध कसे गुंतत जातात ही दुसरी उत्सुकता, अशा दुहेरी उत्सुकतेत दुसऱ्या अंकाअखेरी आपण इनामदारचा खून पहातो–खरे म्हणजे ऐकतो. कारण रंगमंचावर हा खून होतो तेव्हा अंधार करण्यात आलेला असतो. मात्र कटात ठरल्यानुसार हा खून न होता आयत्यावेळी आणखीच कोणीतरी तो केलेला असतो. पोलिस येऊन पोचतात.

इथून पुढे खून कसा झाला याची उकल होण्यात तिसरा अंक संपतो. आणि अनपेक्षितपणे विनायकची बायको मरण पावते. खुनाचा केवळ पोस्ट मॉर्टेम ठरावा असा हा अंक नव्या हत्येने अनपेक्षितपणे उचलला जातो आणि नाटक संपते. ही दुसरी हत्या कशी झाली हे खुबीने त्यापूर्वीच सांगण्यात आलेले असल्याने नाटक संपताना सर्व हिशेब चुकता झालेला असतो. विचार करण्यासाठी काही शिल्लक नसते जिवाला लावून घ्यावे असे तर काही या प्रकारच्या नाटकात नसतेच. समोर खून पाहूनही, मेल्या माणसाविषयी आपण साधे चुकचुकतदेखील नाही कारण तो माणूस नसून नाटकातले केवळ एक पात्र आहे हे भान या प्रकारच्या नाटकांचे लेखक, निर्माते, दिग्दर्शक आपल्याला कधीही विसरू देत नाहीत. इतकेच नव्हे तर वेगवेगळ्या युक्त्यांनी त्यांच्या नाटकाचे नाटकीपण ते सारखे आपल्याला जाणवून देत असतात. 'हत्या'मध्ये दिग्दर्शक–अनुवादक–मुख्य नट कांति मडिया मूळ लेखकाच्या सहाय्याने हेच करतात. जिला एक काल्पनिक नाव देऊन खुनाच्या आरोपासकट योग्य वेळी पूर्वनियोजित पद्धतीने 'अदृश्य' करण्याची वित्तथरारक कल्पना विनायक काढतो ती पार्टीला आलेली तरुण मुलगी आणि आठवणींच्या ग्रंथाचा लेखक इनामदार ही दोन्ही पात्रे कोणत्याही लकबी न देता त्यांनी फिकी ठेवली आहेत. ती रंगमंचावर वावरतात पण क्षणभरही 'जगत' नाहीत. त्या जणू अखेरपर्यंत छाया रहातात, व्यक्ती होत नाहीत. तुलनेने इतर सर्व व्यक्तिरेखा होतात. त्यांना त्यांची त्यांची अलग वैशिष्टये मिळतात, स्वभाव प्राप्त होतात. त्यांच्यात परस्परसंबंध निर्माण होतात. त्यांचे असे एक लुटुपुटीचे का होईना, जग तयार होते. केंद्रबिंदूच अस्पष्ट ठेवल्याने नाटकातील मध्यवर्ती घटनेने–खुनाने–आपण मुळीच अस्वस्थ होत नाही आणि तरी फिरत्या परीघात गुंतलेले रहातो. नाटक आपल्या दोन घटका बऱ्या घालवते आणि पुढच्या सेकंदाला आपण ते नाटक विसरून आपले व्यवहार करू शकतो.

१६ सप्टेंबर १९७०

यामुळेच की काय, व्यवहारी गणला जाणारा गुजराती प्रेक्षक या नाटकाला गर्दी करता आहे. एकाद्या जळत्या वा विझल्या समस्येची मगजमारी नसलेले हे प्रकरण त्याला मानवते असे दिसते.

कांति मडिया हे आजच्या गुजराती रंगभूमीवरचे एक प्रथितयश दिग्दर्शक–नट. 'अश्रूंची झाली फुले' (आतमने ओझलमा राख मा) 'मला काही सांगायचंय' (ऊपर गगन, नीचे धरती) 'माय थ्री एंजल्स' (अमे, तमे अने रतनियो) ही त्यांनी 'नाट्य-संपदा'च्या नावाखाली केलेली तीन आधीची यशस्वी नाटके. यातले 'मला काही सांगायचंय' प्रथम त्यांच्या रंगभूमीवर आले आणि नंतर मराठी रंगभूमीवर. या 'हत्या' नाटकाचे दिग्दर्शन त्यांनी अपेक्षित कसबाने केले आहे. विशेषतः पात्रांच्या हालचाली अचूकपणे उत्कंठावर्धक ठेवण्यात ते पुष्पळ यशस्वी झाले आहेत. त्यांचा नट संच नाटके बदलली तरी बव्हंशी कायम असतो. यामुळे या संचातील प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व, लकबी, उणीवा अशा सर्वांची जाण ठेवून त्यांचा नाटकाला जास्तीत जास्त उपयोग करून घेणे मडिया यांना चांगले जमते. त्याचबरोबर क्वचित कोणावर मडिया यांच्या अभिनयाचा दाट पगडाही बसलेला दिसतो. उदाहरणार्थ या नाटकात कुमारसाहेब विक्रमसिंहजी ही भूमिका करणारे हर्षद दवे उत्कट प्रसंगी प्रति मडिया होतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला मडिया यांचा अभिनय विशोभित दिसत नसला तरी त्यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व अशा वेळी झाकोळून जाते. बहुधा योगायोगानेच, या नाटकाच्या संचातील किमान तीन नट मडिया यांजप्रमाणे लांब, सतत कपाळावरून ओघळणारे केस वाढविलेले होते. हे केस मागे सारण्याची लकबही मग मडिया धरून सर्वांची सारखीच वाटली. मालतीबहेन दिवेटिया ही भूमिका दिना गांधी या गुजराती रंगभूमीवरच्या ज्येष्ठ अभिनेत्रीने लीलया वठवली तर विनायक झवेरीच्या पत्नीची, ज्योतीची भूमिका तरला जोशी यांनी चांगली पेलली. खुद्द धूर्त विनायक जव्हेरी कांति मडिया यांनी, तर भारदस्त अनंतराय त्रिवेदी गिरीश देसाई यांनी आपल्या भिन्न व्यक्तिमत्त्वांनी चांगला उभा केला. बाकी संचही–विशेषतः नोकराच्या भूमिकेत ललित शाह–नाटकाच्या रंगतीत आपापल्या भूमिकेत विनातकलीफ वावरत होता. इन्स्पेक्टर झालेले अरविंद वैद्य अहमदाबादचे एक गुणी महाराष्ट्रीय नट या गुजराती नाटकात ते बेमालूम गुजरातीपणे वावरले, बोलले.

असे हे 'हत्या', व्यावसायिक गुजराती रंगभूमीची गरज भागविणारे, व्यवहारी गुजराती प्रेक्षकाला दोन घटका रमवणारे. नेटके आणि सुबक. सर्वसामान्य नजरेतून अथपासून इतीपर्यंत वेधक. मराठी रंगभूमीला अशी नाटके, असे प्रयोग नवीन मुळीच नाहीत. पण म्हणूनच, हा प्रयोगदेखील कधी पट्ट्यात आल्यास पहाण्याला हरकत नाही. तेवढेच इंग्रजीतले परिचित मराठीऐवजी रुचीपालट म्हणून गुजरातीत पाहिल्याचे आगळे समाधान. ◻ ◻ ◻

# दि न्यूज रेड बाय....
# दि बी. बी. सी. वर्ल्ड सर्व्हिस

'द बी. बी. सी. वर्ल्ड सर्व्हिस...द न्यूज रेड बाय...' हे शब्द सकाळी ७-३० च्या वा संध्याकाळी ६-३० च्या 'सिलोन रेडियो' वरून सहक्षेपित होणाऱ्या बातम्यांआधी आपल्यापैकी अनेकांनी ऐकले असल्याने आपल्या परिचयाचे असतील.

श्री. मेलविल डि'मेलो, श्री. हुसेन यांच्यासारखे काही नामांकित भारतीय निवेदक समालोचक 'बी. बी. सी.'त प्रशिक्षण घेऊन तयार झाले आहेत. 'बी. बी. सी.'ने ध्वनिक्षेपण व दूरचित्रवाणी कार्यक्रमाबाबत जागतिक किर्ती मिळवली असून दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश धैर्य टिकवण्याबाबत वा परदेशी तळ ठोकून असलेल्या ब्रिटिश हेरांसाठी गुप्त भाषेतील संदेश कार्यक्रमांद्वारे ध्वनिक्षेपित करण्याबाबत मोलाची कामगिरी बजावली आहे. आपल्या 'आकाशवाणी'प्रमाणे 'बी. बी. सी' सरकारी ध्वनिक्षेपण यंत्रणा नसून ती एक स्वायत्त संस्था आहे.

अशा या संस्थेला जागतिक प्रांगणात सध्या वाईट दिवस आले आहेत असं दिसतं. ब्राझिलबद्दल दूरचित्रवाणीवर विपर्यस्त भाग दाखविल्याबद्दल अलीकडेच त्या देशानं बी. बी. सी. चा निषेध केला तर गेल्याच आठवडयात हंगेरीने या संस्थेचे बुडापेस्ट येथील प्रतिनिधी श्री. जॉर्ज माइक्स यांना 'वन पेअर ऑफ आईज' या मालिकेतील चित्रीकरणाकरिता, बंदी केलेल्या विभागात जाऊन चित्रीकरण केल्याबद्दल व सरकारी हुकुमाचं उल्लंघन केल्याबद्दल देशाबाहेर घालविलं.

याच मालिकेसाठी ('वन पेअर ऑफ आईज') सुप्रसिद्ध फ्रेंच दिग्दर्शक श्री. लुई माल (Louis malle) यांनी कलकत्त्यावर आठ डॉक्युमेंटरीज तयार केल्या होत्या व श्री. डॉम मोराईस (सुप्रसिद्ध भारतीय पत्रकार आणि 'इंडियन एक्सप्रेस'चे संपादक श्री. फ्रॅंक मोराईस यांचे हे चिरंजीव ब्रिटिश नागरिक असून गेल्या वर्षी नोव्हेंबरच्या सुमारास त्यांच्या लंडनमधील १० वर्षांच्या वास्तव्यानंतर, वर्षभराच्या वास्तव्यासाठी येथे आले आहेत. यांनी 'बिविल्डर्ड जायन्ट'—ही

शिवाजीवरील फिल्म तयार केली. या फिल्म्स् भारताची प्रतिमा डागळणाऱ्या होत्या आणि त्यात भारताची एकच बाजू दाखविण्यात आली होती. रस्त्यावर पडलेली मेलेली गुरं, भिकारी हे 'कलकत्त्या'चं स्वरूप तर 'बिविल्डर्ड जायन्ट'-मध्ये शिवाजीचं खोडसाळपणे चित्रण केलेलं होतं. अर्थातच याचा परिणाम गेली ३० वर्षे भारतात व आग्नेय आशियात नव्या दिल्लीतून कार्य करणारी 'बी. बी. सी.'ची कचेरी गेल्या २९ तारखेस बंद होण्यात झाला. भारत सरकारनं तसा 'बी. बी. सी. ला आदेश देऊन बी. बी. सी. चे येथील प्रतिनिधी श्री. रोनॉल्ड रॉबसन यांची मान्यता काढून घेतली. श्री. रॉबसन यांच्याबाबत एक गमतीदार प्रकार म्हणजे निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या देशात त्यांच्यावर असा प्रसंग याआधी आला होता. सुमारे दोन वर्षांपूर्वी द. ऱ्होडेशियाबाबत त्यांची बातमोपत्रं त्या सरकारला न रुचल्याने त्यांना तो देश सोडावा लागला. पण धडपड ही तर त्यांच्या रक्तातच भिनलेली आहे. त्यांच्या गेल्या १६ वर्षातील नोकरीच्या काळात निरनिराळ्या ज्या ३० देशांत त्यांना कामगिरीवर जावं लागलं तेथे काहीतरी गडबड झालीच. उदा. अल्जिरिया, बर्लिन व सायप्रस येथे अगदी आणिबाणीच्या काळातच त्यांचा मुक्काम होता. कांगोतील यादवी युद्ध, ६७ सालची पश्चिम आशियातील लढाई व कंबोडियातील धुमश्चक्री यावेळी हे साहेब तेथे होते. दुसऱ्या महायुद्ध काळात ते १५ व्या पंजाब रेजिमेंटमध्ये तर ६२ च्या भारत–चीन युद्धप्रसंगी त्यांनी लडाखमधून बी. बी. सी. ला बातम्या पाठविल्या. पण श्री. माल यांनी त्यांच्या वादग्रस्त चित्रपटाची मालिका तयार केली त्यावेळी ते भारतातसुद्धा नव्हते. पण त्याचं प्रायश्चित्त त्यांना भोगावं लागत आहे.

श्री. माल यांनी ६८ साली कलकत्ता येथे हे चित्रीकरण केलं त्यावेळी त्यांनी त्या फिल्म्स् भारत सरकारला दाखवाव्यात असं त्यांना सांगण्यात आलं व त्यांनी ते कबूलही केलं. (अर्थातच आता ते असं कबूल केल्याचं नाकारीत आहेत) पण शेवटी त्या रंगीत फिल्मस्वरील प्रक्रिया करणं येथे शक्य नसल्याने फ्रान्समध्ये त्या न्यायला याव्यात अशी त्यांनी विनंती केली व तेथे त्या प्रकाशित करण्यापूर्वी भारतीय वकिलातीला दाखविण्यात याव्यात असं ठरलं; पण त्यानी तसं न करता फिल्म्स् तयार झाल्यावर त्या केन (Cannes) फिल्म फेस्टिव्हलमध्ये दाखविल्या त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला. पण भारतीय राजदूताच्या विनंतीस मान देऊन त्यात सुधारणा करण्यात येऊन त्यानंतर दाखविणेही स्थगित करण्यात आलं; पण जूनच्या १० तारखेला त्यातील पहिली फिल्म बी. बी. सी. वर दाखविण्यात आली. अर्थातच लंडनमधील भारतीय हायकमिशनर श्री. आप्पासाहेब पंत यांच्या हे निदर्शनाला आलं व त्यांनी पत्र लिहून बी. बी. सी. च्या निदर्शनाला आणलं. पत्रात त्यांनी पुढील फिल्मस् दाखविण्यात येऊ नये व दाखविलेल्या फिल्मस्बद्दल जाहीर क्षमा मागितली जावी अशी मागणी केली होती. भारत सरकारनेही वरिष्ठ

बी. बी. सी. च्या अधिकाऱ्यांना यातून मार्ग काढण्यासाठी बोलणी करण्यास भारतात बोलाविलं होतं पण तेही त्यांना नामंजूर होतं व त्यांनी भारत सरकारने श्री. आप्पासाहेब पंत यांच्यातर्फे केलेली वरील मागणी फेटाळल्याने भारत सरकारला बी. बी. सी. ची कचेरी बंद करण्यावाचून गत्यंतर उरले नाही.

या कृतीमुळे भारत–ब्रिटन संबंधात काही बिघाड होणार नाही असे जरी भारत सरकारला वाटत असलं तरी ते चुकीचं आहे. पण हे सर्व अकस्मात घडलं अशातला भाग नव्हे. हळूहळू तणावा वाढत गेल्यानं हे घडलं आहे. गोवामुक्तीच्यावेळी ब्रिटिश सरकार व बी. बी. सी. नं भारत विरोधी भूमिका घेऊन 'गोव्यावर नेहरूंनी यशस्वी आक्रमण' केल्याचं म्हटलं. ६५ साली भारत–पाक युद्धाच्या वेळीही प्रधान-मंत्री विल्सन व बी. बी. सी. चे झुकतं माप पाककडेच होतं. आपल्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीनंतर 'द हेड ऑफ स्टेट इज रादर अ मायनर कॅरक्टर' अशी बदनामी-कारक मल्लीनाथी केली होती. (अर्थातच बी बी. सी. चे भारत–द्वेषावरील असे अनेक किस्से देता येतील). ६८ साली स्थलांतरीतांचा कायदा आला. त्यामुळे दुरावा अधिक वाढला तर अलीकडे भारतीयांना इंग्लंडमध्ये प्रवेश करण्यास प्रवेश परवाना पद्धती लागू करण्यात आली. (राष्ट्रकुटुंब राष्ट्रामध्ये ही पद्धती नव्हती.) व काही भारतीय प्रवाशांना विमानतळावर वाईट वागणूक देण्यात आली. श्री. पंत यांची हायकमिशनर म्हणून नेमणूक झाल्यावर त्यांनी संबंध सुधारण्याचा प्रयत्न सुरू केला. तेवढ्यातच हे 'माल' प्रकरण सुरू झालं व बी बी. सी. ची कचेरी बंद झाली. (चीनने ही कचेरी आधीच बंद केली आहे. भारताच्या निर्णयामुळे जगातील फार मोठ्या भागातून बी. बी सी. ला गाशा गुंडाळावा लागला आहे.)

याचबरोबर आठवण होते ती ताश्कंद येथून चालणाऱ्या रेडियो पिस अॅन्ड प्रोग्रेस 'च्या कार्यक्रमांची – हा रेडिओही भारत विरोधी भूमिका घेतो पण त्यात बातम्या पुरविणाऱ्या दिल्लीतील एका रशियन वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीबाबत भारताने अशी भूमिका घेतलेली नाही. ब्रिटिश सरकारनेही नाकर्तेपणाची भूमिका घेतली ती बी. बी. सी. स्वायत्त आहे. या सबबीवर; पण ते सरकार बी. बी. सी. ला परदेशां-साठी असलेले कार्यक्रम करायला आर्थिक सहाय्य देते यावरच तर दिल्लीतील कचेरीचा खर्च चालत असे.

बी. बी. सी ने भारतावरील कार्यक्रमांच्या निवडीबाबत सल्ला देण्याची योजना पुढे केली पण भारताने ती नाकारली. बी. बी. सी. च्या इतिहासातील हा पहिलाच दाखला.

अजूनही भारतात कचेरी थाटण्याची बी. बी. सी. ची तयारी असून भारताची दुसरी बाजू दाखविणाऱ्या फिल्म्स् तयार करण्याचीही बी. बी. सी. ने तयारी दाखविलेली आहे; पण ते एवढ्यात तरी शक्य होईल असं दिसतं नाही.

**– प्रतिनिधी**

"असं काय करतोस रे भाऊ ?
मी आता कुठे जाऊ ?"
"ते मला ठाऊक नाही.
माझ्या घरात रहायचं तोवर
माझं ऐकलं पाहिजे नाही तर
तुझी वाट तुला मोकळी !"

**चंद्रकांत अंबाडे**

# नदी मिळे सागराला!

"करा ! करा ! दिवाळी साजरी करा. पेढे वाटा ! मोठे अटकेवरती झेंडेच लावलेत की नाही ?"

दादासाहेब आपल्याशीच ओरडले, आणि एकदम भानावर आले न् शरमले. कारण खोलीत कुणीही नव्हतं. होता फक्त गडद अंधार ! नाही म्हणायला शेजारच्या घरात, अंगणामध्ये लावलेल्या मोठ्या दिव्याचा प्रकाश पडला होता थोडासा, आणि त्या दिव्याखाली चाललेल्या चहापार्टीची गडबडही ऐकू येत होती स्पष्टपणे. कपबशांचे आवाज, पुरुषांचं हसणं–खिदळणं, मधूनच बायकी चिवचिवणं आणि मधूनच स्पष्टपणे समजणारं सातमजली विकट पुरुषी हास्य ! भाऊंचेच ते ! आपल्याच खोलीत असूनही दादासाहेब त्या शेजारच्या चहापार्टीमध्ये इतके दंग झाले होते की, भान न राहावून एकदम त्यांचा जळफळाट बाहेर पडला. होय, शेजारच्या घरात आज चहापार्टी होती, कारण सकाळीच कोर्टात निकाल लागला होता आणि भाऊराव केस जिंकला होता. दादासाहेब त्या केसमध्ये कुणीही नव्हते



पण जणू काही त्यांचाच पराभव झालाय इतके ते शरमले होते. अंधारातल्या येरझारा थांबवून ते आरामखुर्चीत बसले. दोन्ही हातानी त्यांनी स्वतःचं डोकं घट्ट दाबून धरलं आणि डोळे मिटून घेतले. पण मनातील विचार थोडेच थांबतात? एवढसं कारटं आणि माझ्यापुढं दिमाख दाखवतंय! बाबा वारले तेव्हा चड्डी घालायची देखिल अक्कल नव्हती तेव्हा. मोठा भाऊ वडिलांसमान होता आणि आज...? आता वकील झालाय ना मोठा? आज...केस जिंकली ना कोर्टात! आपणच त्याला वकील केलं ना? तो वकिली हिसका त्याने आपल्यालाच दाखविला. सख्ख्या धाकट्या वहिणीच्या सुखाची होळी केली. शिवाय वरती केस जिंकल्याचा टेंभा मिरवतोय आणखी! पार्टी करा, पेढे वाटा, आनंदीआनंद करा पण... माझ्यापुढं यायला तोंड आहे कुठं? मोठा भाऊ आज कस्पटासमान आहे नाही का? कस्पटासमान... होय, तो शब्द त्यांचा त्यांनाच झोंबला. त्यांचा श्वास जोरात होऊ लागला. आता काही करणे शक्य आहे का? पण त्यांना काहीही मार्ग सुचेना.

खोलीतल्याप्रमाणे मनातही अंधार जणू पसरला होता त्यांच्या ! इतक्यात, अंधारात पावलं वाजली. अस्पष्ट आकृतीस त्यांनी अंदाजानेच हाक मारली.

" कोण ? पार्वती ? "

ह्यावर अंधारातून नुसताच हुंदका ! त्यावर जरा रागातच त्यांनी विचारलं, " कां ? तुला काय झालंय रडायला ? " ह्यावरही उत्तरादाखल एक हुंदका. तेव्हा मग तेच पुढे म्हणाले, " कश्शाच वाईट वाटून घेऊ नये. जे काही होतंय ते चांगल्याकरिताच समजायचं. पांडुरंगाची इच्छा म्हणायची दुसरं काय ? माझा एवढा सख्खा धाकटा भाऊ असूनही मला त्याचं काही वाटत नाहीय. ज्या दिवशी तो वेगळा झाला त्याच दिवशी मी त्याच्या नावाने आंघोळ करून मोकळा झालोय. आता सुख कसलं नि दुःख कसलं ? "

" पण जरा शारदा वन्सचा विचार करा ना ! केवळ एक ' स्त्री ' म्हणून माझं आतडं तुटतंय ! उभं आयुष्य जायचंय तिचं अजूनी ! "

" बरं जा जा, मोठा आलाय तिचा पुळका ! "

पार्वतीबाईंच्या एका वाक्यानेच तिची व्यथा त्यांना जाणवली–समजली. होय, पोटच्या मुलाप्रमाणे त्यांनीच धाकट्या दिराला अन् नणंदेला सांभाळलं होतं. लहानाचं मोठं केलं होतं. नवऱ्याची जेमतेम मिळकत ! ह्या महिन्याची त्या महिन्याला गाठ घालता घालता नाकी नऊ येत. पुढे शारदाला कॉलेजला घातलं तेव्हा मोहनमाळ मोडली. भाऊला लॉ कॉलेजात घातलं तेव्हा एकदाणी मोडली. पुढे शारदा इंटरला असताना मुलगा पाहाण्यापासून तो वरात परत जाईपर्यंत त्यांनी कष्ट उपसले. बहिणीच्या लग्नात भाऊ चांगला ' नवरदेवा 'प्रमाणे मिरवला होता. इकडे दादासाहेबांना श्वास घ्यायला फुरसत मिळाली नव्हती. पण लग्नसमारंभ नीटपणे पार पडला एवढंच समाधान त्यांना पुरेसं होतं. लग्नाकरिता झालेले कर्जेपाणी फेडण्याकरिता त्यांनी मोठ्या आशेने धाकट्या भावाकडं पाह्यलं ! पण वकील झालेला तो भाऊ आता ' कायदा ' शिकला होता. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ! वडिलोपार्जित घराचा अर्धा हिस्सा घेऊन तो सरळ वेगळा झाला. कर्ज कुठे वडलोपार्जित होते म्हणे ? ते म्हणे दादासाहेबांनी अनाठायी करून टेवले होते. जणू काही शारदा ह्याची कुणीच नव्हती ! झाले, उतारवयात हाही एक टोला जणू दैवाने त्यांना दिला. ते अधिकच खचले. त्यातल्या त्यात त्यांना एकच समाधान होतं. वडिलांच्या मागे लहान भावाचं शिक्षण केलं होतं. बहिणीस लहानाचं मोठं करून रीतसरपणे पिवळी केली होती. दोन्ही कर्तव्यातून ते मुक्त झाले होते. पण त्यावरही आता पाणी पडलं होतं. सकाळीच कोर्टाने घटस्फोट मंजूर केला होता. शारदा कायद्याने घरी परत आली होती. धाकट्या भावानेच बहिणीची केस लढविली होती. तोच आनंद साजरा करण्याकरिता वडिलमंडळींना चहापार्टी होती. दादासाहेबांना अर्थातच आमंत्रण नव्हतेच. पण सारे कानावर येत होतं. गॅलरीतून पलीकडच्या अंगणातलं सारं दिसत होतं.

"कांग्रेच्यूलेशन्स वकीलसाहेब." कुणीतरी म्हणत आत आलं.

"पहिलीच केस, पण जिंकलीत हं !"

"नाहीतर काय ? मोठ्या भावाला पण म्हणे जमलं नाही.

"लहान वयात हे म्हणजे खरंच क्रेडिट बरं का !" ...दुसरा.

तिसरा कुणीसा म्हणाला,

"अहो, नुसत्या वयाबरोबर काय अक्कल वाढते काय ? मग तसं कुंभाराच्या गाढवाचेही वय दरवर्षी वाढतेच की !"

ह्यावर सारेजण हसू लागले. त्या एकत्रित हसण्यामध्ये भाऊरावांचं ते हास्य विचित्र अन् सैतानी–एकदम ओळखू येत होतं. त्याला जणू विजयाची नशा चढली होती. दोस्तमंडळी तोंडावर हांजी हांजी करीत होती. आणि त्या स्तुतीत हा भरकटत वाहात चालला होता. कोकाकोलाच्या बाटल्या फुटल्याचे आवाज ऐकू येत होते सैंपाकघरातून शेवचिवडा–भजी तळणाचा भपकारा दरवळला होता. खुषमस्करे लोक त्यावर ताव मारीत होते आणि आताच 'कुमारी' झालेल्या शारदेकडे आशाळभूतपणे पाहात होते. हे सारं पाहून इकडे दादासाहेबांचा जीव तळमळत होता.

त्यांना आठवले, केवढ्या थाटात शारदाचं लग्न आपण लावून दिलं होतं. मुलीच्या आईऐवजी पार्वतीबाईंनीच रुखवताचं सारं केलं होतं. देवाब्राह्मणांसमोरची सप्तपदी, होमहवन, भटजींची मंगलाष्टकं, ते शुभमंगल सावधान, त्यांनीच केलेले कन्यादान. वरातीनंतर मुलाच्या घरी जाण्यापूर्वी जोडीने पाया पडायला आली होती ती दोघं ! हे सारं सारं काही एका कागदाच्या ऑर्डरनं नाहीसं होऊं शकतं काय ? शिवाय लग्नानंतरचा पतिपत्नींचा सहवास–निर्माण झालेली जवळिक–ते स्त्रीसुलभ प्रेम–हे सारं काय एका कायद्याच्या साध्या चिठोऱ्याने नाहीसं होऊं शकतं ? ते स्वतःचे स्वतःलाच प्रश्न करीत होते अन् त्यांचं त्यांनाच उत्तर सापडत नव्हतं. कायद्याने कदाचित नाती जोडली जात असतील. पण तोडली जाणं अशक्य ! नाती – प्रेमाची नाती–तोडायला कायदा केवळ दुबळा आहे. पण कायद्याप्रमाणे त्यांना कायदा कळत नव्हता, करण ते कॉलेजात जाऊन कायदा शिकले नव्हते !

इतक्यात वीज चमकून गेल्याप्रमाणं झगझगीत प्रकाश चमकून गेला. तसे ते उभे राहिले आणि त्यांनी सभोवार पाहिलं. खाली अंगणातल्या पार्टीमध्ये कुणीतरी सर्वांचे फ्लॅशगनने फोटो घेत होता. पाठमोऱ्या फोटोग्राफरकडे पाहून त्यांना भास झाला तो दोरे-पाटील तर नव्हे, भाऊंचा जिगर दोस्त ? शारदा बिचारी भ्यायलेल्या गाईप्रमाणे सारे सोपस्कार सहन करून घेत होती. लोकांना फराळाचा आग्रह करीत होती आणि सरबताचे ग्लासेस देत होती. खाली मान घालून यांत्रिकपणे. ह्या लोकांच्या गप्पात जणू तिला रस नव्हता ना नजरांना प्रतिसाद ! पूर्वीची कॉलेजात जाणारीच शारदा जणू ! भोळी भाबडी !

दादासाहेबांना आठवले. शारदेचे लग्न होऊन जेमतेम चारच महिने झाले होते. घर कसं सुनं सुनं वाटत होतं. त्याचवेळी धाकटा भाऊदेखील वेगळा झाला. त्याला जे जे वाटलं ते ते सामान त्यांनी त्याला नेऊ दिलं. स्वैंपाकघरातल्या पाणी तापविण्याच्या बंबाला त्याने हात लावताच पार्वतीबाईंचं पित्त खवळलं. पण त्यांनीच तिला शांत केलं होतं. एखाद्या लहान पोराप्रमाणं समजूत घातली होती. 'अगं, जुनाट तर झालाय. जाऊ दे की ! आपण घेऊ दुसरा !' झालं, शारदा गेली. सामानसुमान गेले, भाऊ गेला ! त्यांना अधिकच उदास वाटू लागलं. सारं घर जणू त्यांना खायला उठलं. रात्ररात्र त्यांना झोप येईना. आढ्याकडे पहात ते तळमळत नुसतेच अंथरुणात पडून राहात अन् पहाटे पहाटे उगीच कुठे डोळा लागे ! एकदा असाच डोळा लागला आणि त्यांना हाक ऐकू आली. "दादा ! दादा !!" ते दचकून उठले ! भास तर नाहीय ! पण दुसऱ्यांदा हाक आली तसे ते उठलेच ! दारात शारदा उभी होती ! ते चकितच झाले. तिला अशी एकटी, अवेळी अनपेक्षित पाहून 'आत ये' म्हणण्याचंही भान राहिलं नाही.

"ऑं ? आता कशी आलीस ?"

"रात्रीच्या पॅसेंजरला बसले ! जरा लेट झाली गाडी."

"एकटीच ?"

"होऽऽ"

"बरोबर कोणी नाही ?"

"कशाला हवी कुणाची सोबत ?"

"काही विशेष ?"

"सहज ! वहिनीची आठवण झाली म्हणून !"

शारदेची उडवाउडवी लक्षात येऊनही त्यांच्या मनात शंका-कुशंका डोकावली नाही. त्यांनी मोठ्या प्रेमानं पाहुणचार केला. मेव्हण्यांची चौकशी केली. पार्वतीबाईंनी मीठमोहऱ्या उतरून टाकल्या. प्रथमच माहेरी आली म्हणून ओटी भरली तिची ! चार दिवस पाहुणचार करून, मेव्हण्यांकरिता बेसन लाडू करून दिले. दादासाहेबांनी तिकिट काढून देऊन, हातखर्चाला पंचवीस-तीस रुपये दिले व प्रेमाने निरोप दिला तिला.

पण त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांनी ती तशीच पहाटे एकटीच आली. तेव्हाही त्यांनी घरखर्चाला पन्नास रुपये देऊन तिला परत पाठविलं. पण पंधरा दिवसाच्या अंतराने ती पुन्हा आली तेव्हा मात्र त्यांनी खडसावून विचारलं. त्यावर ती रडूच लागली. हे काय चालवलंय ? माहेर जवळ आहे, म्हणून काय उठसूठ पळायचं ! तिकडं कुठं मद्रासला दूर दिलं असतं म्हणजे ? ही काय भानगड आहे ? दरवेळी इकडे एकटं निघून यायचं, खर्चाला पैसे घेऊन जायचे आणि संपले की, पुन्हा परत येरे माझ्या मागल्या ! संसार आहे की खेळखंडोबा ? पण पुन्हा त्यांनी राग

आवरला. तिला जवळ घेतलं. डोळयावरून आणि पाठीवरून प्रेमानं हात फिरवून समजावलं. "अगं, नवऱ्याशी किरकोळ किरकोळ भांडणं व्हायचीच. भांड्याला भांड लागायचंच! म्हणून काय नवराच सोडून द्यायचा असतो की काय? लग्नानंतर मुलगी सासरची होते. तिनं सासरीच रहायचं असतं. नदी समुद्रालाच मिळायची असते. तेथून नदीला परत फिरता येतं काय? मतभेद व्हायचेच! तू कॉलेजात बुकं शिकलेली शहाणी मुलगी ना? 'लाईफ इज अॅन अॅडजेस्टमेंट' या विषयावर भाषण करून टाळ्या तूच मिळविल्यास ना? मग इथे सासरी थोडसं अॅडजेस्ट करून का घेत नाहीस? घ्यावं, एखाद्या वेळेला आपण पडतं घ्यावं. कुठं कमीपणा येतो त्यामुळं? दोघांपैकी एकानं माघार घेतली की, भांडण आपोआप मिटतं. अगं, हादेखील एक प्रकारचा त्याग आहे. आणि त्याग हाच संसाराचा पाया आहे. तुझ्या संसाराला आत्ताशी कुठं सुरुवात झालीय? नीट मन शांत ठेऊन नको का वागायला?"

शारदा शांतपणे सारं ऐकून घेत होती. दादासाहेबांच्या नजरेला नजर न देता! अगदी स्टेशनवर गाडी सुटण्यापूर्वीही त्यांनी तेच सांगितलं तिला. "पोरी, त्याचं सुख हे आपलं सुख असं मानून पहा बरं काही दिवस! रागावला, बोलला तरी आपलाच तो. मी घालू का त्याची समजूत? पण एक लक्षात ठेव, टाळी नेहमी दोन्ही हाताने वाजत असते. चूक त्याच्याप्रमाणे थोडीफार तुझीही असली पाहिजे. ते काहीही असो. पोरी, डोंन्ट मिस्टेक मी, पण अशा प्रकारे निघून येणं शेवटचंच बरं का आजचं! आता पुन्हा आलीस तर माझं दार बंद समज! हे असं येणं चांगलं नव्हे, म्हणूनच त्याला मी उत्तेजन देणार नाहीय. हा, दुसऱ्या कशाबद्दल म्हण, मी मदत करीन. एम्. ए. ला बसतेस? मी भरतो कॉलेजची फी? पण असे गाडीभाड्याला नाही मिळायचे दरवेळी हं!" हे कठोर बोलताना तिच्या डोळयाला डोळा देण्याचं धैर्य त्यांना झालं नव्हतं. "ते काहीही असो. ही तुझी शेवटची खेप बरं का?"

कठोरपणाने का होईना, तिला सुधारल्याच्या समाधानात ते घरी परतले. जेमतेम महिना लोटला नसेल. पुन्हा एके दिवशी शारदा दारात हजर. आता मात्र त्यांना राहावले नाही.

"खबरदार आत येशील तर?" उंबऱ्यातच तिला बजावले त्यांनी.

"दादा!"

"दादा गेला खड्ड्यात! तुला मागं काय सांगितलं होतं?

"दादा, बघरे मला चालवत नाहीय रे." बोलता बोलता तिने पोटऱ्यांवरचे माराचे वळ दाखवले. दंडावरचं खरचटलेलं दाखवीत ती म्हणाली, "दादा, माझं थोडं ऐकून तरी...??"

"एका अटीवर" तिला थांबवीत ते मध्येच म्हणाले, लगोलगच्या गाडीनं चल

आपण दोघं जावू तुझ्या सासरी. मी घालतो त्याची समजूत. अन् जर तुझीच चूक निघाली तर याद राख. चलतेस ?"

"मी ? आत्ता मी जन्मात त्याचं तोंडदेखील पाहणार नाही." ती.

"मग मीही तुझंदेखील तोंड पाहणार नाही." तेही तितक्याच ठामपणाने म्हणाले आणि तोंड फिरवून मागे वळले. समोरच्या गॅलरीत भाऊ उभा होता. दोन्ही हात कमरेवर ठेवून, छद्मीपणानं हसत ! तो इतका वेळ सारं पाहत होता तर ! दादासाहेबांना क्षणभरच शरमल्याप्रमाणं झालं. झरझर भाऊ जिना उतरला आणि खाली आला. शारदा आता रडकुंडीस आली होती.

"दादा, पाया पडते रे मी तुझ्या !" म्हणत ती खाली वाकली, तोंच भाऊने पाठीमागून येऊन तिचे दंड पकडले. तिला उठवीत तो म्हणाला – अगदी प्रत्येक शब्दावर जोर देत–

"पाया देवाच्या पडायचं असतं फक्त !"

त्याचा प्रत्येक शब्द त्यांच्या काळजात सुरीप्रमाणे चिरत चिरत गेला. लोहाराच्या भात्याप्रमाणं त्यांचा श्वास होऊ लागला आणि त्याच लोहाराच्या भट्टीतल्या रसरसत्या लोखंडाप्रमाणं भाऊंची नजर त्यांना भासली. त्यांचे ओठे थरथरू लागले, पण आवाज फुटेना त्यांना. तोवर भाऊ शारदेला घेऊन निघूनही गेला होता. दादासाहेबांचा उघड उघड अपमान करून. तोही असा नाट्यमय रीतीने ! आणि त्यानंतरचं पुढचं सारं रामायण घडलं होतं. त्यानेच तिची केस कोर्टात नेली होती. ते माराचे वळ कोर्टात दाखवन, साक्षीपुरावा देऊन आज घटस्फोट मिळविला होता. त्या मुलीचा बळी देऊन स्वतःच्या विजयाची जाहीरात चालवली होती. दादासाहेबांना मात्र राहून राहून शारदेची दया येत होती. ह्या बिचारीचं पुढं कसं होणार ? भावाच्या घरी काय जन्म काढणार ? उद्या त्याचं लग्न झाल्यावर वहिनीचं न् हिचं घरात पटेल का ? आयतं खाणाऱ्याला अन्न कधी गोड लागत नसतं. फुकट ही मुलगी आयुष्य वाया घालविणार तर ? पण, एकदम शेवटची स्टेप घेण्यापूर्वी तडजोडीचा कुणी प्रयत्न केला का ? मुलाकडची बाजू वर म्हणून ते गप्प आणि हे अती शहाणे, म्हणून हे गप्प ! थोडासा मनाचा मोठेपणा दाखविला की राष्ट्राराष्ट्रांत तडजोडी होतात. मग पतिपत्नीत तडजोडीस मार्ग नसता का मिळाला ? समाजात लोकांना चर्चेला उगीचच चान्स ! बघता बघता काहीतरी ठरवल्याप्रमाणे त्यांना वाटू लागले. ते पुन्हा अस्वस्थ होऊन येरझारा घालू लागले. खोलीतल्या खोलीतच पण खोल अंधारांत. होय. आता बाहेर देखील अंधार पसरला होता. पार्टीची गडबड शांत झाली होती. जादा लावलेला दिवा आत नेला होता. मंडळी खाऊनपिऊन ढेकरा देत पसार झाली होती. एकएक शेजारपाजारचे दिवेही शांत झाले होते. त्या शांततेत त्यांना सैंपाकघरात ताटं मांडल्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला, तसे बसल्या बसल्याच त्यांनी आत तोंड वळवून सांगितले, "मला भूक नाहीय आज !"

पण पार्वतीबाईंना त्यांचा स्वभाव आज काय नवीन नव्हता. त्या शांतपणानें आत आल्या. त्यांच्या कपाळावरचे केस मागे करून, हलकेच त्यांना उठवले आणि जेवायला चालविले. एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे तेही निमूटपणे चालू लागले. दोघेही जिन्यात आले तोच शेजारच्या माडीतून जोरदार आवाजात कुणीतरी म्हणालं, "चालती हो जा मग! गेटाऊट्!!"

दोघही क्षणभरच जिन्यातच थबकली–प्रश्नार्थक मुद्रेने एकमेकांकडे पाहात! तोच कानावर पुन्हा भाऊचे शब्द आले,

"मग काय अशी कुवारी राहाणार आहेस की काय जन्मभर?" दादासाहेबांनी पार्वतीबाईंना विचारलं–हलक्या आवाजात–"म्हणजे विचार तरी काय आहे याचा?" पण पार्वतीबाईंनी मान हलवीत सांगितले, "आता आलं लक्षात! तो जाडचा एजंट-ब्रोकर आहेना, तो दोरे-पाटील, त्याचा आहे तिच्यावर डोळा. हे दोघं कोर्टातले दोस्त ना! कर म्हणत असेल त्याच्याशी लग्न न् दुसरं काय?"

दादासाहेबांना ही बातमी नवीन होती. "खरं म्हणतेस?" त्यावर पार्वतीबाईंनी फक्त एक दीर्घ निश्वास टाकला अन् कपाळाला हात लावीत म्हटलं, "देवा नारायणा! पोरीचं नशीबच फुटकं गं बाई!"

दादासाहेबांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली! काय हे? लग्न की खेळखंडोबा? घटस्फोट घेऊन पुरते चोवीस तास झाले नाहीत, तोंच दुसरं लग्न, अरे काय, माणसं आहात की जनावरं? शी: शी:! नतद्रष्ट कारटी! जीवच घेतो गळा दाबून! फासावर लटकलो तरी बेहेत्तर म्हणावं..." तिरिमिरीसरशी ते जिना उतरले आणि दाणदाण पावलं टाकीत, मधलं अंगण ओलांडून भाऊच्या घरात शिरले. त्या आवाजाने मधल्या खरकट्याच्या कुंडीवरची दोन कुत्री दूर पळाली. तेथेच बाजूला अंधारात सिगरेटोचा लाल ठिपका अधांतरी दिसला, तसे त्यांनी विचारलं जोरात...

"कोण आहे ते?"

"मी–मी दोरेपाटील. वकीलसाहेबांना भेटायचंय. एवढी सिगरेट संपली की, आत जातो. ह्य: ह्य: ह्य:." पण दादासाहेब इथं ऐकायला थांबलेच नाहीत. वेगळं झाल्यापासून आज प्रथमच ते त्या घरात शिरत होते, आणि तेही अशा प्रकारे! तावातावाने ते आत पाऊल टाकणार तोंच त्यांच्या कानावर शारदेचे शब्द आले,

"असं काय करतोस रे भाऊ? मी आता कुठं जाऊ?"

"ते मला ठाऊक नाहीय. माझ्या घरात राहायचं तावर माझं ऐकलं पाहिजे! नाही तर तुझी वाट तुला मोकळी!"

"अरे पण, दोरे-पाटीलच काय, पण कुणाशीही मला लग्नच करायचं नाहीय" यावर काही क्षण शांतता. मग पुन्हा तीच म्हणाली, "स्त्री आयुष्यात फक्त एकाच पुरुषाला जवळ करू शकते."

"वा! वा! काय पण तत्वज्ञानाचे डोस!" भाऊचं उपहासात्मक हंसणं. दाराच्या फटीतून दादासाहेबांना दिसत होता फक्त सिगरेटचा धूर अन् भाऊ.

"कसं सागूं मी तुला? तूं माझ्यापेक्षा मोठा आहेस – वयानं – बुद्धीनं! पण लग्न व्हायचंय तुझं अजूनी. तुला ते नाही कळायचं."

"काय पण नवऱ्याच्या प्रेमाचा उमाळा आलाय? अन् तोही तसल्या त्या गांवभवानीच्या माडीवर सदान्‌कदा पडणारा! आय पीटी यू!"

"हां, त्यांच्याबद्दल बोललेलं खपायचं नाही हं मला!"

"इतकं होतं तर घटस्फोट कशाला घेतलास?"

"मी कुठं घेतला? तूंच भरीला घातलंस मला. मी आधीपासूनच बजावीत होते. पण तूं ऐकशील तर ना? तुझ्या वकीलपत्रावर सही करून चुकले होते ना मी!" शारदेच्या स्वराला धार होती जणूं.

"मी मग सही घेऊन काय वाईट केलं तुझं?"

"पण, हा बाजार मांडलास ना माझा? मुलगी म्हणजे काय गोठ्यातली म्हैस वाटली की काय तुला? चालली आपली कुणाही धन्यामागे!"

"पुरे. पुरे. फार नको चुरुचुरु करूस. एवढी अक्कल होती तर कशाला आलीस त्याला सोडून?" भाऊच्या शब्दाशब्दात राग होता.

"तुला सांगून काय उपयोग! तुझ्या मठ्ठ डोक्यात ते शिरायचं नाही. ती दोघं जर सुखी होणार असतील तर माझी मध्ये अडचण कशाला? म्हणून मी आपण-होऊन त्यांचा मार्ग मोकळा केला. होऊ देत, तिच्याशी सुखी होऊ देत त्यांना. मला आनंद आहे. हेच सांगायला मी त्या दिवशी तिच्याकडे गेले होते, पण तिच्या आईला वाटलं मी भांडायलाच आले अन् तिनं मला मारहाण केली."

"म्हणजे? मारहाण नवऱ्यानं केली नाही तुझ्या?" भाऊला शॉक!

"तूं म्हणालास म्हणून कोर्टात तशी साक्ष दिली इतकंच!"

"तू म्हणालास म्हणून घटस्फोट घेतला. तू म्हणालास म्हणून साक्ष दिली. सगळं तू तू तू! उपकार झाले माझ्या डोक्यावर. आत्ता आणखीन् हा एक उपकार कर म्हणजे माझी जबाबदारी संपली."

"ते मला जमायचं नाही!" शारदा शांतपणाने म्हणाली.

"मग इथं राहायच नाही?" शारदेची काकुळती.

"का? तुझ्या लाडक्या दादाकडे जा की!" भाऊचा उपहास.

"दादाकडे जायला मला तोंड कुठे आहे, नाहीतर खरंच...!"

"हो हो, बघ ना दारात उभं करतो का तो तुला आता?"

दादाचं नाव ऐकताच शारदेच्या डोळ्यात एकदम आशेचा किरण चमकला. इतका वेळ खाली घातलेली मान तिनं वर केली, त्याच नेमक्या क्षणी दादासाहेब आत गेले. त्यांना पाहाताच भाऊ ताड्‌दिशी उभा राहिला. पण त्यांनी त्याच्याकडे

लक्षच दिलं नाही. शारदेच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले, "चल!" शारदेला हुंदका आवरेना. त्यांच्या छातीवर डोकं घाशीत ती अधिकच रडू लागली. तिच्या पाठीवर हात फिरवीत ते म्हणाले, "अजूनही वेळ गेलेली नाही. तुमं त्याच्यावर अजूनही प्रेम आहे ना ?" शारदेने अधिकच मान खाली घातली तेव्हा तेच पुढं म्हणाले, "देवाब्राह्मणासमोर सप्तपदीनंतर घातलेलं मंगळसूत्र अशा खोटयानाटया साक्षींनी तुटत नसतं. तूं काही सासरी गेलीस ती कोर्टाच्या ऑर्डरने नाही आणि आत्ताही तडजोड करून पुन्हा सासरी गेलीस तर कोर्ट मध्ये आडवं येणार नाही ! माझ्यावर विश्वास आहे ना ?" बोलता बोलता ती दोघेही बाहेर आली. त्याची चाहूल लागताच अंधारातून कुणीतरी पुढं झालं, तसं शारदेनं त्यांना मिठीच घातली.

"तुझी सिगरेट संपली नाही का अजूनी ? मी संपवू का एका झटक्यात ?" दादासाहेब अंधाराला उद्देशून म्हणाले तसं तो दोरे-पाटील सायकलवर टांग टाकून पळाला. पार्वतीबाईंनी ह्या दोघांना अंगणातून येताना पाह्यलं, तसं त्या सैंपाक-घरात तिचंही ताट मांडण्यास झर्दिशी गेल्या. चंद्र आता ढगातून बाहेर पडला होता आणि निरभ्र आकाशात वेगाने पळत होता. त्या स्वच्छ चंद्रप्रकाशात त्यांनी तिच्या गालावरचे अश्रू पुसले. कुठेतरी 'विविध भारतीचं' शेवटचं गाणं रेडियोवर लागलं होतं.

"ओहोहो, ताल मिले नदिके जलमे । नदी मिले सागरमें ।
सागर मिले कौनसी जलमे । कोई जाने ना ।"

□ □ □

[ 'सट्टत्तिक वाळ्कैमडैवळ्' या तामीळ कथेचे स्वैर रूपांतर ]



# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता

अनिल बर्वे

लेखांक : चार

बाबा आदमच्या काळातील ट्रक खाचखळग्यातून कसाबसा पुढे सरकत होता. सुमारे अर्धा पाऊण तास गेल्यावर गोविंदपेठ गाव लागले. सहा सात महिन्यापूर्वी तेथील पोलीस पाटलाचा बळी नक्षलवाद्यांनी घेतला होता. गोविंदपेठ हजार वस्तीचे गाव असावे. गावात हमरस्त्यावर गवताने शाकारलेल्या मोठ्या झोपडीत पोलिसांनी तात्पुरते पोलीस स्टेशन उभारले होते. सी. आर. पी. ची

एक कंपनी तेथे ठाण मांडून होती. गोविंदपेठच्या पुढेच दोन मैलावर पसरा गाव असून तेथून पसराचे जंगल सुरू होते. गोविंदपेठला येताना थांबावे असा विचार करून तसाच पुढे गेलो.

पसरा गाव दिसू लागले. गवताची शाकारलेली घरे व झाडे झुडपे व्हीएतनाम किंवा कंबोडियाचे दर्शन घडवत होती. गावाच्या सुरुवातीलाच फॉरेस्टचे चेक नाके आहे. ट्रक पाहताच फॉरेस्ट गार्ड धावत आला व त्याने खांब वर करून मार्ग मोकळा केला. नाक्यापाशीच एका गवती मंडपात 'निष्प्राण खाटेवर' डेप्युटी रेंजर आर महंमद दंडेवाला येणाऱ्या जाणाऱ्या ट्रकवर लक्ष देत पडून राहिला होता. भरपूर दाढीचा हा म्हातारा बोलघेवडा व मनमिळाऊ होता.

पसरा हे सुमारे बाराशे चौरस मैलाचे जंगल आहे. साग, हलदावा, बंकतुतूर, बिजा, महगनी, खोडशा आदि वृक्षांनी हे जंगल दाट झाले आहे. आज जंगलामध्ये अक्षरशः सहा पावलावरचे काही दिसत नाही. या जंगलात वाघ, सांबर, रानडुकरं बरीच असून डासांचा त्रास भयंकर आहे. नक्षलवादी क्रांतिकारक या डास, चिलटां-मुळे अक्षरशः हैराण होतात. सर्वसाधारणपणे धडधाकट नक्षलवादी एखादाच—सर्वच बारीक तापाने सदैव आजारी असतात. क्रांतीवरचा विश्वास व भविष्यावरची निष्ठा नसती तर ही माणसं या भयाण जंगलात राहिलीच नसती.

कोमा व गोंड या आदिवासींची सुमारे दीड लाख वस्ती या जंगलात छोट्या छोट्या वाड्यातून रहाते. सुसंस्कृत मानवी जीवनापासून शेकडो वर्षे मागे असलेली ही माणसं अज्ञान, दारिद्र्य यामुळे सावकार, जमीनदारांचे खास भक्ष्य बनलेली आहेत. अर्धपोटी रहाणे, कित्येक दिवस उपाशी राहणे हे यांच्या पाचवीलाच पुजले आहे. ही अर्धपोटी, उपाशी माणसं पाहिली की तुंदिलतनु पुढाऱ्यांच्या उपोषण-बाजीचा, त्या स्टंटगिरीचा तिटकारा येतो. एकही मूल धडधाकट वा गोंडस दिसत नाही. हातापायाच्या काड्या, मोठ्या पोटाचो, कोणत्या ना कोणत्या रोगाला बळी पडलेली ही मुलं पाहिली की आदिवासींच्या शूरत्वाचे व घाटदार शरीरांचे वर्णन करणाऱ्या शहरी लेखकांचे हसूच येते. अंगावर धड कपडा कुणाच्याच नसतो. स्त्रियादेखील एक पंचा अंगाभोवती कसाबसा गुंडाळतात. सर्व स्त्रिया उघड्या छातीच्या—कोणीच पोलकं वापरीत नाहीत—

सदैव हकोबा किंवा सॅटीनच्या पातळ पोलक्यातून तरुणींच्या ब्रेसीयरच्या गाठी पाहणाऱ्या आमच्या साहित्यिकांच्या नजरेला या स्त्रियांचे जीवन पडेल काय ?

तेंदु—जंगली बोर—चिरंजी व कंदमूळ खाऊन दिवस गुजरणारे हे आदिवासी डोंगर कपारीतल्या एखाद्या खाचरात भात पिकवून, कधीही न फिटणाऱ्या कर्जाच्या व्याजापोटी ते सावकाराला नेऊन घालतात. हंगामामध्ये महिना दीड महिना बिडी-पत्तीच्या तोडणीकरता रुपया बारा आणे रोजावर राबणे व जंगल तोडणीकरता दिवसरात्र मेहनत करून अर्धपोटी राहणे हे यांचे जीवन. या सर्व माणसांच्या उज्ज्वल

भविष्याकरता नक्षलवादी र्जवाचे मोल देत आहेत आणि त्याची जाणीव या अडाणी आदिवासींना आहे. आपल्या घासातला घास काढून ते नक्षलवाद्यांना देत असतात. माझ्याबरोबरचा फॉरेस्ट गार्ड मला सांगत होता–' साहेब, या आदिवासींचा पाठिंबा नसता तर पोलिसांनी एका आठवड्यात नक्षलवाद्यांना चिरडून टाकले असते परंतु कितीही मारहाण झाली, छळ झाला, स्त्रियांची अब्रू लुटली गेली तरी हे आदिवासी फितुरीचा शब्द बोलून नक्षलवाद्यांचा घात करीत नाहीत. शहरातून येऊन शस्त्र हाती घेतलेल्या नक्षलवाद्यांना जंगलाची माहिती, लपायच्या जागा हेच आदिवासी दाखवतात. आदिवासींची कित्येक तरुण मुलं नक्षलवाद्यांच्या दलमस्मधून भरती झाली आहेत–क्रांतीचा वणवा पेटतच आहे.

पसरापासून एटूरनागारमपर्यंत रस्ता आहे–आहे म्हणजे नकाशात आहे. कारण प्रत्यक्षात खाचखळगे आणि दगडधोंडे यांची पायवाटच आहे. एटूरनागारमहून भद्राचलमला जायचे झाले तर गोदावरी पार करावी लागते आणि लाँचच्या तेवढ्या प्रवासाला कॉन्ट्रॅक्टर आठ रुपये घेतो. या भयानक रस्त्यांचे वर्णन करताना डेप्युटी रेंजर म्हणाला–' कोणी आजारी असेल तर औषधोपचारासाठी शहरात न्यायचा प्रयत्न केला जात नाही. कारण रोगी वाटेतच मरतो. एखाद्या मारामारीच्या प्रकरणात जखमीला पोलीस घेऊन जाऊ लागले–तर शहरात त्याचे पोस्टमार्टेम करावे लागते.' विनोद हा सत्याच्या अतिशयोक्तीतून जन्म घेतो–तेव्हा त्यामागचे सत्य हे मान्य करावेच लागते.

पसरा ते एटूरनागरमपर्यंतच्या रस्त्यावर मोठी पाटी आहे. ' जंगलात फॉरेस्ट ऑफीसरच्या पूर्व परवानगीशिवाय शस्त्र न्यायला बंदी आहे ' अपवाद फक्त नक्षलवाद्यांचा. हा विभाग ' पशुसंरक्षण ' विभाग आहे आणि ' पशुहत्येस ' बंदी असल्याचा व नियम तोडल्यास कडक शिक्षेचा बोर्ड रस्त्यावर लावला आहे. तरीसुद्धा मोटारीतून येणारे फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर व जमीनदार सरसकट सांबर, रानडुकर मारून नेतात. त्यांना अडवणे केवळ अशक्य असल्याने पशुहत्या चालूच आहे. आपण आपले कर्तव्य बजावत आहोत हे दाखवण्याकरता ससे किंवा सांबर मारून पोट जाळणाऱ्या आदिवासींना अधून मधून जेलची हवा दाखवण्यात येते. ' पशूंची ' काळजी घेणाऱ्या या सरकारने ' नरमेध ' होऊ नये म्हणून काळजी घेतली असती तर ?

माझ्याबरोबरचा फॉरेस्ट गार्ड मॅट्रिक्युलेट पास होता. कंडक्टर, मास्तर अशा अनेक नोकऱ्या करून फॉरेस्ट गार्डच्या भरतीत आला होता. थोड्याच दिवसात ग्रॅज्युएट लोकसुद्धा ' फॉरेस्ट गार्ड 'करता अर्ज करतील याची त्याला खात्री होती. त्याला पगार एकशेवीस रुपये. स्वतःचा खर्च चालवून बायको आणि कुटुंब पोसता येणे अशक्य. तरी त्याचा खर्च चालतच होता. रोज बेकायदा जंगलतोड आणि शिकार होत असतेच. गाड्या, ट्रक अडवून दोनचार रुपये कमावणं आणि पगारातली तूट भरून काढणे यावरच त्याचे लक्ष असायचे. जे काही चालले आहे ते योग्य



नक्षलवादी क्रांतीचे केंद्र

नव्हे हे तो प्रांजलपणे कबूल करायचा. परंतु 'हरामखोरांच्या दुनियेत हरामखोरी केल्याशिवाय जगता येत नाही' हा त्याचा जीवनविषयक सिद्धांत होता. 'या सर्व हरामखोरांना विरोध करायचा असेल तर नक्षलवादीच व्हायला पाहिजे' असे त्याचे ठाम मत होते.

पापपुण्याला किंवा नरकालासुद्धा न भिणाऱ्या या सावकार, जमीनदार व फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टरांनी नक्षलवाद्यांचा मात्र धसकाच घेतला आहे. नक्षलवादी आले आणि त्यांनी या फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टरांच्या बंदुकाच हिसकावून नेल्या. नक्षलवाद्यांचे बळ पाहून या ठेकेदारांनी त्यांच्याबरोबर तहनामा केला व दरमहा ठराविक रकमेची औषधे व इतर सामुग्री पुरविण्याचे मान्य केले. नक्षलवादी आले म्हणूनच आदिवासींना दीड दोन रुपये मजुरी मिळू लागली, नाहीतर त्याआधी तांदुळाच्या मापट्यावर त्यांना घाम गाळावा लागे.

फॉरेस्ट ऑफीसरांना नक्षलवाद्यांनी 'लक्ष्मण रेषा' घालून दिल्या आहेत. त्या ओलांडून जाण्याचे धाडस एकही अधिकारी करत नाही. आदिवासींना क्षुल्लक कारणावरून छळणाऱ्या या अधिकाऱ्यांची मिजास आता पूर्णपणे उतरली आहे. पसरा या दीड हजार वस्तीच्या गावामध्ये सहा महिन्यापूर्वी सुभानशेठ या सावकाराचा रात्री अडीच वाजता खून करण्यात आला. खून पडताच पोलीस आले. गावकऱ्यांना बेदम मारहाण करण्यात आली. पण कुणाकडूनही नक्षलवाद्यांबद्दल माहिती मिळाली नाही.

सुमारे पंधरा वीस वर्षांपूर्वी सुभानशेठ पसराला येऊन स्थायिक झाला. पसराला आला तेव्हा फिरकोळ असामी असलेला हा माणूस लवकरच लक्षाधीश होऊन बसला. भरमसाठ व्याजावर कर्ज देणे वस्तू अवाच्या सवा किमतीला विकणे हा त्याचा धंदा. आदिवासी, भूमिहीन शेतमजुरांचा तो काळच होऊन बसला होता. त्यामुळेच त्याच्या

खुनाबद्दल कुणी साधं दुःखसुद्धा व्यक्त केलं नाही. 'सुमानशेठ'चे घर गावाच्या कडेलाच होते.

नक्षलवाद्यांनी सुमानशेठकडे 'पीपल्स आर्मी' करता दहा हजार रुपयांची मागणी केली. सुमानशेठने, मुलीचे लग्न आहे, लग्न झाल्यानंतर रक्कम देतो, असे वचन दिले. महिना झाला. लग्न उरकले गेले. नक्षलवादी पुन्हा आले—सुमानशेठने पुन्हा आठ दिवसांची मुदत घेतली व सरळ वरंगळला जाऊन महिनाभर राहिला. दरम्यान त्याने पोलिसांशी संधान बांधले. गावी परतल्यावर नक्षलवाद्यांनी पुन्हा त्याच्याकडे पैशाची मागणी केली. सुमानशेठने पुन्हा मुदत मागितली. तेव्हा पाणी मुरते आहे हे नक्षलवाद्यांनी ओळखले व रात्री अडीच वाजता त्याला घराबाहेर नेऊन गोळ्या घातल्या. सुमानशेठच्या मुलीने स्वतःच्या अंगावरचे दागिने काढून नक्षलवाद्यांसमोर ठेवले. परंतु ते नक्षलवाद्यांनी नाकारले—'आम्ही डाकू नाही, क्रांतिकारक आहोत. तुमच्या बापाने आम्हाला फसवायचा प्रयत्न केला म्हणून त्याला मारले,' असे सांगून व सुमानशेठच्या मुलांना, 'भिऊ नका—गाव सोडून जाऊ नका, तुम्हाला काहीही त्रास होणार नाही,' असे अभिवचन देऊन नक्षलवादी निघून गेले. सुमानशेठचे कुटुंब गावातच राहत असून त्यांना नक्षलवाद्यांकडून कधीही त्रास झालेला नाही. सुमानशेठचा खून रात्री २॥ वाजता करण्यात आला व त्या आधी ९ चे सुमारास गोविंदपेठ येथे पोलीस पाटलाला मारण्यात आले.

गोविंदपेठचा पोलिसपाटील रघुनाथराव हा पोलिसांचा खास दोस्त होता. गावाच्या कडेला पोलीसचौकीसमोर पंचवीस तीस यार्डावर गवताने शाकारलेले, शेणमातीने सारवलेले त्याचे घर आहे. त्याच्या घरावरून तो चांगला सुखवस्तू माणूस होता याची कल्पना येते. घराबाहेर अंगणात मातीने लिपलेले 'फुरी'—धान्याचे कोठार होते. अंगणातच दुसऱ्या कडेला गवताने शाकारलेला, भिंती नसलेला सैपाकाचा लहानसा मंडप 'इल्लू' होता. मी गेलो तेव्हा रघुनाथरावची आई कामानिमित्त बाहेरगावी गेली होती. घराचे अंगण सारवलेले व भिंती चुना आणि गेरू यांनी रंगवलेल्या होत्या. रघुनाथराव हा छत्तीस वर्षांचा होता. त्याला पोलिसांशी हातमिळवणी करू नकोस असे कैक वेळा नक्षलवाद्यांनी बजावले होते. परंतु रघुनाथरावाने हा सल्ला ऐकला नाही. तो दिवस-रात्र पोलीसांबरोबरच असायचा आणि घराजवळ पोलीसचौकी होती, त्यामुळे तो निर्धास्त होता. तपासणीच्या कामात पोलीस जी अमानुष मारहाण करीत त्यात हा गृहस्थ उत्साहाने भाग घेई. त्याच्या पापांचा घडा एक दिवस संपूर्ण भरला. रात्री नऊ वाजता तो जेवायला बसला असताना पोलीसाच्या वेशातील एका नक्षलवाद्याने त्याला बाहेर बोलावले. तो बाहेर येताच त्याला जागच्या जागी गोळ्या घालून नक्षलवादी निघून गेले पोलीस धावत आले, गावकऱ्यांनी कानावर हात ठेवले, नंतर त्याच रात्री सुमानशेठचा पसरा येथे बळी घेण्यात आला

चेचेया हा स्टेट रिझर्व पोलिसमधील लान्सनायक मला सांगत होता, "गावा-गावातून दोन-चार नक्षलवादी तरी आहेतच. कित्येकजण दिवसा गावात व रात्री जंगलात जातात." गोविंदपेठ येथील मुत्तिआल नावाचा नक्षलवादी क्रांतिकारक भूमिगत आहे; गोविंदपेठपासून दोन मैलावर दुंपलगुडे येथील सामारेड्डी नावाचा नक्षलवादीही भूमिगत आहे. पोलीस जंग जंग पछाडत आहेत. परंतु त्याचा पत्ता लागत नाही. तेथीलच अंजिरेड्डी हा नक्षलवादीसुद्धा गेले वर्षभर भूमिगत आहे.

माहिती घेत घेत मी पसराच्या पोलीस स्टेशनवर गेलो. तेथे ओ. सी. एचकामनी हे हैद्राबादचे पोलीस इन्स्पेक्टर भेटले. काही काळ श्रीकाकुलम येथे 'ड्युटी' बजावल्यावर त्यांची येथे बदली झाली होती.– गप्पा सुरू झाल्या.

"मी या विभागात आल्यापासून सर्वत्र शांतताच आहे. परंतु मी जो इथल्या हल्ल्यांचा अभ्यास केला त्यावरून नक्षलवादी हे बरेच 'सोबर' वाटतात. त्यांनी डाके घातले असले तरी त्यांची मध्य-प्रदेशातल्या डाकूंबरोबर तुलना करता यायची नाही."–पोलीस इन्स्पेक्टर ओ. सी. एचकामनी बोलू लागले.

"डाके घालताना हत्या टाळायची असाच त्यांचा रोख असतो. साधारणत: संध्याकाळी सात ते दहा वाजता माणूस पाठवून बातम्या काढावयाच्या व रात्री अडीच ते चारच्या दरम्यान हल्ला करायचा हे त्यांचे तंत्र आहे. हल्ला करताना साधारणत: एक फाइटिंग स्क्वाड येते. हल्ला हा गावातील जमीनदार, सावकार आदी शोषक वर्गावर असल्याने, व लोकांची त्यांना सहानभूती नसल्याने त्यांच्या मदतीला कोणी धावून येत नाही. हल्ला करताना प्रथम ते बॉंब-स्फोट करतात. हल्ल्याच्या ठिकाणापासून दोनशे तीनशे यार्डावर संत्री ठेवलेले असतात. जिकडून पोलीसांचा धोका जास्त तिकडे लक्ष अधिक असते. दरवाजा ठोठावून ते 'वर्ग-शत्रूला' जागे करतात. त्यांच्यावरचे आरोप वाचून दाखवतात. ते मान्य केल्यास परततात. नसल्यास ठार मारतात. एरिया कमिटीचा हुकूम असल्याशिवाय कोणास ठार मारत नाहीत. हल्ला करतात तेव्हा दोघांपेक्षा जास्त लोकांना एकत्र जमू देत नाहीत. हल्ला करण्याचे त्यांचे 'लक्ष्य' ठरलेले असते व त्या प्रमाणेच ते हालचाल करतात. लोक विरोधाकरता जमल्यास हवेत बार काढून त्यांना घाबरवतात. परंतु त्यांचेवर गोळीबार करत नाहीत. श्रीकाकुलममध्ये डाक्यात मिळालेली संपती कलकत्ता हेडक्वार्टर्सला पाठवली जाते. कारण 'कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्ट लेनिनीस्ट'चे (चारु मुझुमदार गट) ते मुख्य केंद्र आहे. वरंगळ व खम्मम येथील भागातील लूट 'विजयवाड्याला' रवाना होते, कारण 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' (नागीरेड्डी गट) यांचे ते मुख्य केंद्र आहे."

'नक्षलवादी बॉंब कुठून आणतात? परदेशी शस्त्रे असतात का?'–मी विचारले.

"नाही, परदेशी शस्त्रे नक्षलवाद्यांकडे मिळालेली नाहीत. इथेच लुटीत मिळालेली शस्त्रे असतात. शस्त्रास्त्रांच्या दृष्टीने नक्षलवाद्यांची परिस्थिती अतिशय

'चिनाजाक' आहे त्यांचे हडचे बाँब देखील गावठी असतात. इथले शेतकरी रानडुकरांना भिववण्यासाठी व त्यांना मारण्यासाठी हे बाँम्ब् वापरतात. आपट बाराकरता वापरली जाणारी स्फोटक दारू एका कागदाच्या पुडीत बांधून, ती पुडी व काचेचे तुकडे, लोखंडाचे तुकडे, खिळे, चुका आदी वस्तु एक पत्र्याच्या डब्यात बंद करतात. हा डबा म्हणजेच बाँब. हा 'कंट्री डायनामाइट' फेकून मारतात. जमिनीवर पडताच स्फोट होऊन खिळे-काचा जोरात लागतात. या बाँबमुळे फार गंभीर व त्रिंग्यारी जखमा होतात. क्वचित प्रसंगी माणूस मरण्याचीही शक्यता असते. परंतु हे बाँम्ब् हाताने फेकायचे असल्याने पन्नास-साठ यार्डापेक्षा जास्त लांब फेकता येत नाहीत व पोलीसांशी चकमक करताना याचा फारसा उपयोग होत नाही."

इतका स्वस्त बाँब, जो कुणीही माणूस तयार करू शकतो, तो जर कलकत्त्याला सहा रुपये किलोने विकत मिळत तर त्यात आश्चर्य ते कसले? रशियन फेरविचारवाद्यांच्या व अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या आधुनिक शस्त्रांस्त्रांनी सज्ज असे भारत सरकार या गावठी बाँम्बना काय भीक घालणार?

आंध्रमध्ये नक्षलवादी क्रांतिकारकांनी कुठेही 'मोलोटोव्ह कॉक्टेल'चा फारसा, किंबहुना काहीच उपयोग केलेला आढळून आला नाही. भिवंडीमध्ये महाराष्ट्रातील जातीयवादी गुंडांनी मात्र 'मोलोटोव्ह कॉकटेल'चा सर्रास व परिणामकारक उपयोग केल्याची नोंद आहे. 'मोलोटोव्ह कॉकटेल' तीरकमठे किंवा बंदुकीच्या सहाय्याने फार दूरवर फेकता येतो. 'मोलोटोव्ह कॉकटेल'ने आग फार झटकन लागून संहारही जास्त होतो. जंगल असल्यामुळेही कदाचित नक्षलवादी या पेट्रोल बाँबचा उपयोग करीत नसावेत.

नक्षलवादी चळवळीचे मूल्यमापन त्यांच्याकडे किती शस्त्रे आहेत किंवा त्यांची युद्धपद्धती काय आहे यावरून करता येणार नाही. तरी पण नलक्षवाद्यांची ताकद किती आहे यावरून ते किती काळ लढू शकतील व प्रस्थापित समाजावर किती मोठा आघात करू शकतील याचा अंदाज मात्र नक्की घेता येईल. 'लीडर' या साप्ताहिकाच्या वृत्ताप्रमाणे –

'खम्ममला लागून असलेल्या बस्तर (मध्यप्रदेश) जिल्ह्यातील पाटनम तालुक्यात नक्षलवादी क्रांतिकारकांनी एक ट्रेनिंग सेंटर उघडून नोव्हेंबर व डिसेंबर अडुसष्ट या दोन महिन्यात साडेआठशे जणांना बंदुका व रायफली चालवायचे शिक्षण दिले. यापैकी दीडशे जण हे खुद्द वरंगळ जिल्ह्यातले होते. या प्रशिक्षित क्रांतिकारकांनी नंतर मुलुग, एटूरनागारम व नरसमपेठ तालुक्यात आपले लक्ष केंद्रीत केले. करीमनगर जिल्ह्यात जगतीयाळ व मेडक जिल्ह्यात सिदीपेट येथे सातजण त्यांच्या नेत्यासह 'सत्यमूर्तीसह' – पोलिसांनी पकडले.'

अर्थात साडेआठशे आकडा जरी प्रशिक्षितांचा असला तरी त्यांच्याकडे तेवढी

शस्त्रास्त्रे नाहीत व दोन महिन्याच्या 'झटपट' शिक्षणातून कसलेले गुरीला तयार होणेही कठीण. आपल्याकडे पुण्यात जसे 'रायफल ट्रेनिंग क्लब' मधून एअरगन चालवणारे वीर निपजतात तसेच हे क्रांतिकारक. अर्थात त्यांना हिणवण्याचा येथे उद्देश नाही. कारण शेवटी प्रत्यक्ष लढाईतून खरे शिक्षण मिळत जाते. नक्षलवाद्यांकडे वायरलेस सेटस्, बायनॉक्युलर्स् वगैरे आधुनिक साधने आहेत हा माझ्या मते केवळ 'प्रचार' आहे. आर्थिक कमतरता व शस्त्रास्त्रांचा तुटवडा हाच नक्षलवादी क्रांतिकारकांचा मोठा कमकुवतपणा आहे.

जमीनदार, सावकार, शिकारी, फॉरेस्ट कॉंट्रॅक्टर यांच्यावर हल्ला चढवून नक्षलवादी क्रांतिकारकांनी शस्त्रास्त्रे गोळा केलेली आहेत. उदा० मेसर्स तुलजासिंग सीताराम रेड्डी व कमल मनोहर राव या मर्दापूर तालुक्यातील (करीमनगर जिल्हा) लोकांवर हल्ला चढवून क्रांतिकारकांनी ४ थ्रीनॉट थ्री रायफली, नऊ १२ बोअर गन व तेरा मझल लोडर्स पळवल्या. यापैकी मझल लोडर्सचा युद्धाकरता काहीच उपयोग नाही. मझल लोडर्स म्हणजे ठासणीच्या बंदुका. आपल्याकडे कोकणपट्टीतील शेतकरी माकडाचा त्रास चुकवण्यासाठी या ठासणीच्या बंदुकीचा उपयोग करतात. या ठासणीच्या बंदुका खेड्यातसुद्धा तयार करता येतात. एक लाकडी दस्ता, त्याला जोडलेली लांब लोखंडी नळी व घोडा अशी साधी रचना असते. प्रथम नळीत दारू ठासून त्यावर चिंध्या ठासून मग छरे भरतात. छरे न मिळाल्यास खिळे, चुका भरून नंतर खटका ओढायचा. बार होऊन छरे दूरवर पसरतात. या ठासणीच्या बंदुका पुन्हा भरायला किमान दहा मिनिटे लागतात. त्यांच्या सहाय्याने नेमबाजी करता येत नाही व त्यांची मारगिरी म्हणजे फायररेंज ही फारतर शंभर यार्डपर्यंतच असते. अशा या ठासणीच्या बंदुका छापमारीला वापरता आल्या तरी पोलिसांशी लढताना कुचकामी ठरतात. बंदुका, रायफली पळवून आणल्या तरी त्याच्या बुलेटस व काडतुसांच्या काळ्याबाजारातील खरेदीसाठी फार पैसा खर्च होतो.

खर्चाच्या तोंडमिळवणीसाठी नक्षलवाद्यांनी करवसुलीला सुरुवात केली आहे. विडा पत्तीच्या व जंगलच्या ठकेदारांकडून केवळ वरंगळ जिल्ह्यातच नक्षलवाद्यांनी सुमारे दोन लाख रुपये वसूल केले. पकेळ तालुक्यातील बकपेठ गावातील प्रकाशराव रेड्डी यांना अडकवून वीस हजार रुपये वसूल केल्यावरच १७ जूनला त्यांना सोडले. विविध डाक्यातून लुटलेले सोने विजयवाड्याला पाठवण्यात येत असे. असेच एकदा १४ मे १९६९ ला गोलकोंडा एक्सप्रेसमधून २७० तोळे सोने घेऊन येताना पी. रामनरसय्या व शेषगिरी गोवेटी व विरन्ना हे विजयवाडा रेल्वे स्टेशनवर पकडले गेले. परंतु पी. रामनरसय्या हा मोठ्या हिकमतीने निसटून गेला. इतर दोघांची वरंगळ जेलला रवानगी करण्यात आली.

आज जंगम, करीमनगर, वरंगळ, कोथामुडेम, वेलमपल्ली, सीरपूर, कागझनगर, भद्राचलम व हैदराबादच्या परिसरात दीड हजाराहून अधिक नक्षलवादी असून

त्यात उच्च शिक्षित डॉक्टर्स, वकील, इंजिनियर्स इत्यादी तरुण व तरुणी सुद्धा आहेत—
—राधा !

राधा ही तरुण क्रांतिकारक स्त्री गेल्या महिन्यात पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडली. कोथागुडेममधील एक ॲडव्होकेट भक्तलु वेंकटेशवरलु यांची ही तरुण बहीण पुरुषी पोशाख करून एका फाइटींग स्ववाडचे नेतृत्व करीत होती. सुंदर व मोहक व्यक्तिमत्त्वाची ही तरुण क्रांतिकारक स्त्री नक्षलवादी क्रांतीमध्ये बळी गेली. राधा हे नाव वरंगळ—खम्ममधील विद्यार्थी अत्यंत आदराने उच्चारतात— राधाला ते हिरॉइन मानतात.

कम्युनिस्ट रेव्होल्युशनऱ्यांनी विजयवाडयाच्या बैठकीत क्रांतिकारक उठाव करावयाचे निश्चित केल्यावर रामनरसय्या, चंद्रपुला रेड्डी आणि बुतला वेंकटेशराव हे आपापल्या केंद्राकडे निघून गेले. १४ एप्रिलला बुतला वेंकटेशराव हा खम्ममला आला व त्याने १६ एप्रिलला 'पागीदेरु' येथील जमीनदाराचे घरावर हल्ला चढवून चार बंदुका पळवल्या आणि मग वणवा भडकतच गेला—

दोन एरिया कमिटया 'कटपुरम' येथे तीस एप्रिल व एक मे या दोन दिवशी एकत्र आल्या. आपल्या अनुभवांवरून त्यांनी चर्चा व विचारविनिमय करून अहवाल तयार केला आणि प्रदेश कमिटीकडे पाठवला. प्रदेश कमिटीने या अहवालावर ५ व ६ जुलैला विचारविनिमय केला. एरिया कमिटयांच्या त्या अहवालात म्हटले होते—

'त्वरित दलमस् उभारावेत. ज्यामध्ये सात ते नऊ माणसं असतील. प्रत्येक दलमसला कमांडर, डेप्युटी कमांडर व पोलिटीकल प्रपोगंडीइस् असावा. फॉरेस्ट ऑफिसर्सना काम करावयास बंदी घालून कण्टीव्हेबल जमिनीचा ताबा घ्यावा. पोलीस, लॅण्डलॉर्डस्ना प्रतिकार करण्यासाठी 'लोकयुद्ध' सुरू करावे. खेडयातील पटेल—पटवारी व्यवस्था संपवून त्यांची रेकॉर्डस् जाळून खेडयाच्या पातळीवर जनसत्ता स्थापावी. जमीनदारांना हाकलून द्यावे. आवश्यकता भासल्यास ठार मारून त्यांच्या जमीन—पैशाचे वाटप करावे. सी. आय. डी. कॉन्स्टेबल्स खेडयात माहिती जमवायला येतात त्यांना ठार करावे. आणि सर्व प्रकारची शस्त्रास्त्रे दलमसला उपलब्ध करून घ्यावीत.'

अशा रीतीने सशस्त्र संघटन चालू असतानाच नेत्यांनी टोपण नावांनी वावरावयास सुरवात केली. उदा. के. पांडुरंगराव याने 'सुरी' नाव घेतले तर नागीरेड्डी ने 'चलन' हे नाव घेतले. गुप्त हालचालींसाठी खास माणसांकरवी पत्रव्यवहार चालू करण्यात आला. आणि याच सुमारास पी. जे. मोहनराव हा सोळा एप्रिलला क्रांतिकारकांना येऊन सामील झाला.

परंतु नक्षलवाद्यांचे बळ पोलीसांशी झुंजण्याएवढे वाढले नव्हते. ५ जुलै ६९ ला पी. रामनरसय्या — मुलुग एरीया कमिटीचा प्रमुख — याने आपल्या ताकदीचा अंदाज सेंट्रल कमिटीला पाठवला. त्यात त्याने म्हटले—'तीन रायफली, तीन डबल बॅरल

गन्स, एक सिंगल बॅरल गन्स, २२ ची एक गन, १३ ठासणीच्या बंदुका, ४ ट्रान्झीस्टर्स, रोख पंचवीस हजार रुपये, २० तोळे सोने आणि चारशे तोळे चांदी.' हा साठा.

नक्षलवाद्यांच्या संख्येचा नक्की आकडा मात्र कोणास माहीत नाही. परंतु तेरा विविध गटांच्या आधिपत्याखाली २५६ सशस्त्र क्रांतिकारक जंगम ते वरंगळ भागात क्रियाशील असल्याचा दावा 'लीडर' साप्ताहिकाने २ जुलै ७० च्या अंकात केला आहे.

नक्षलवाद्यांनी पावसाळ्याच्या मुहूर्तावरच उठावांना सुरुवात केली. कारण या डोंगराळ व जगलमय भागात पावसाळा हा गनिमी युद्धाकरता अत्यंत उपयुक्त. तसेच पावसाळ्यात शेतकरी हा जमीन कसावयास उत्सुक असल्याने जमिनी कब्जात घेऊन वाटल्यास भूमिहीन शेतमजूर व शेतकरी मोठ्या प्रमाणावर या उठावांमध्ये सामील होतील. त्याचप्रमाणे पावसाळ्यात जो बेकार वरकड मजूर तयार होतो तो उपाशी व असंतुष्ट असतो. त्याला एकत्र करून त्यांनाच शिक्षण देऊन दलमस् उभारणे हे अत्यंत सोयीचे जाते.

नक्षलवाद्यांचे हल्ले वाढत गेले तसे फार मोठ्या प्रमाणावर पोलीसदल त्या विभागात आणले गेले. वरंगळ या एकाच जिल्ह्यात सी. आर. पी. च्या दोन कंपन्या, आंध्र रिझर्व पोलीसच्या दोन कंपन्या, स्थानिक पोलीस व सी. आय. डी. आहेतच. परंतु एवढे पोलीसदल असूनही नक्षलवाद्यांच्या हालचालींवर काहीच परिणाम झालेला नाही. दाट जंगलामुळे त्यांच्यावर गोळीबार करता येत नाही. गोळीबार केला तरी ते झिगजॅग पद्धतीने पळत असल्याने त्यांच्यावर काही परिणाम होत नाही. आजपर्यंत जे नक्षलवादी नेते पकडले गेले ते एक्सपोज झालेले होते, कारण त्यांनी डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा त्याग केलेला होता. त्यामुळे डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांवर लक्ष ठेवून त्यांना पकडणे सोपे गेले. परंतु जे एक्सपोज न झालेले कार्यकर्ते आहेत ते अजून क्रियाशील आहेत. शिवाय नक्षलवाद्यांनी दुय्यम नेतृत्वाची एक फळी निर्माण केल्याने प्रथम श्रेणीचे पुढारी पकडले जाऊनही त्यांच्यावर परिणाम झालेला नाही.

४ मे ७० ला आंध्रचे गृहमंत्री जे. वेंगळराव यांनी नक्षलवाद्यांची पाळेमुळे खणून काढल्याचे घोषीत केले. परंतु तरीही नक्षलवादी जोर धरत होते. १२ जुलैला सत्यम् व कैलासम् हे नेते मारले गेल्यावर पुन्हा एकदा जे. वेंगळराव यांनी नक्षलवादी संपल्याचे घोषीत केले. परंतु पुन्हा १४ जुलैला वरंगळ काँग्रेस कमिटीच्या माजी अध्यक्षांच्या दोघा भावांना नक्षलवाद्यांनी कंठस्नान घातले. आंध्रच्या वृत्तपत्रातून दररोज एक तरी बातमी घातपाताची असते. ३००० नक्षलवादी व त्यांचे प्रथम श्रेणीचे नेते अटकेत असूनही नक्षलवाद संपत नाहीत. कारण या चळवळीची मुळे फार खोलवर जनमानसात जाऊन पोचलेली आहेत.

१३ जुलैला नर्कल तालुक्यातील पदीपमपुला येथील दोन जमीनदार श्रीनिवास रेड्डी व गापे रघुनाथ रेड्डी यांना नक्षलवाद्यांनी पहाटे तीनचे सुमारास मारले होते. दोघेही भाऊ होते. पदीपमपुला हे मुलुगहून ५० मैलावरील एक खेडे असून रस्ते व दळणवळण नसल्याने तेथपर्यंत पोचणे दिव्यच आहे. डी. एस्. पी. श्री. ए. गोपाल-रेड्डी यांनी मला सांगितले–

'या जमीनदारांनी 'सुरी'ला पकडून दिल्याचा व हेच जमीनदार पी. रामनरसय्याला पकडण्याकरता पोलीसांना मदत करीत असल्याचा नक्षलवाद्यांना संशय होता. तसेच पदीपमपुला व पुलुसा या गावातील काही जमीन या जमीनदारांनी बळकावली होती. ते भांडणही पेटलेले होते. तेव्हा १३ ला रात्री २॥–३ चे सुमारास नक्षलवाद्यांचे एक फाइटींग स्क्वाड गावामध्ये आले. त्यांनी दरवाजा ठोठावून या जमीनदारांना घराबाहेर बोलावले व त्यांच्यावरचे आरोप वाचून दाखवले. दोघाही जमीनदारांनी हे आरोप नाकारले. नक्षलवाद्यांत व त्यांच्यात १॥ तास चर्चा झाली. परंतु जमीनदार चुका मान्य करेनात. तेव्हा त्यांना लांब नेऊन गोळ्या घातल्या गेल्या.'

घरातल्या स्त्रियांना–मुलांना त्रास दिला का ?–मी.

'नाही. मॉरली नक्षलवादी फार चांगले वागतात. सहसा इतरांना मारहाण करत नाहीत. स्त्रियांवर बलात्कार तर सोडाच पण त्यांच्याशी असभ्यपणेही वागत नाहीत.'– डी. एस्. पी.

'नक्षलवाद्यांना गावकऱ्यांनी विरोध केला का ?'–मी.

'नाही. उलट गावकऱ्यांनी नक्षलवाद्यांना मदत केली असाच आरोप जमीनदारांचे कुटुंबीय करतात. पोलीसांनाही तपासात गावकऱ्यांचे सहकार्य मिळत नाही.' – डी. एस्. पी.


गावकरी नक्षलवाद्यांना सहकार्य करतात हाच पोलीसांचा खरा राग आणि मग वाटेल ते अमानुष अत्याचार करून ते या रागाची भरपाई करतात.

क्रमशः

---

पुढील लेखांक : बुधवार दिनांक २३ सप्टेंबर अंकात

---



**टिळकांच्या जीवनाचा कलात्मक आलेख**

एक प्रभावी कलाकृती

# दुर्दम्य

'दुर्दम्य' या लो. टिळकांच्या जीवनावर लिहिलेल्या चरित्रपर कादंबरीचा पहिला खंड नुकताच प्रसिद्ध झाला. ही संपूर्ण कादंबरी खरे पाहता १ ऑगस्ट रोजीच प्रसिद्ध व्हावयास हवी होती. प्रकाशकांनी या कादंबरीची प्रसिद्धिपूर्व सवलतीची योजना जाहीर करताना तिच्या वाचकांना तसे आश्वासन दिले होते. परंतु लेखकांकडून तिचे संपूर्ण लेखन ठरविलेल्या मुदतीत पार पडू शकले नाही. ते का झाले व कसे झाले या विषयीचे सविस्तर आणि मनमोकळे निवेदन प्रथम खंडात प्रकाशकांनी केलेले आहे. इतकेच नव्हे तर पूर्वी ठरलेली ३५० पानांची संपूर्ण कादंबरी ज्या सवलतीच्या दराने देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते त्याच किंमतीत आता किमान ७०० पानात संपणारी ही कादंबरी देण्याचे त्यांनी ठरविले आहे. प्रकाशकाच्या मनाचा हा खरोखरच मोठेपणा असून व्यवसायाच्या सचोटीचा तो एक भाग आहे. मात्र स्वतः गंगाधर गाडगीळ यांनी अशा असाधारण परिस्थितीत आपले चार शब्द या पहिल्या खंडाला जोडले असते तर ते वाचकांच्या आणि त्यांच्या स्वतःच्याही दृष्टीने आवश्यक होते.

चरित्रपर कादंबरी लिहिण्याचा प्रकार मराठीमध्ये अगदी अलीकडे सुरू झालेला आहे. केवळ तीन चार कादंबऱ्या आज तशा उपलब्ध आहेत आणि त्यातही श्री. ज. जोशी यांची 'आनंदी गोपाळ' हीच पहिली यशस्वी कादंबरी ठरलेली आहे

**वि. शं. पारगांवकर**

असे म्हणावे लागेल. परंतु 'आनंदी गोपाळ'च्या मानाने 'दुर्दम्य'चा विषय अतिशय अवघड आहे. आनंदी आणि गोपाळराव या शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या दोन सामान्य परंतु महत्त्वाकांक्षी व्यक्ती होत्या. उलट लो. टिळक एक इतिहास आहेत, एक महान संस्था म्हणूनच त्यांचे जीवन व्यतित झाले आणि लोकांपुढे तेव्हा आले आणि आजही उरलेले आहे. टिळकांचे आयुष्य आणि कार्य तुमच्या आमच्या जीवनाचा आजही एक घटक होऊन राहिलेले आहे, इतके ते जीवन सर्वसामान्य पातळीवर आलेले आहे तसेच महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या जीवनाशी थेट जाऊन भिडलेले आहे.

त्या दृष्टीने पाहता गंगाधर गाडगीळ यांचे कार्य सोपे खासच नाही. या जीवनातील सत्य ओळखून त्याला कलेच्या सप्तरंगी इंद्रधनुष्याचे रूप देणे ही गोष्ट सोपी नाही. महाराष्ट्रातील गेल्या शतकातील काळ प्रचंड व्यक्तिमत्त्वाच्या लोकांनी अक्षरक्षः भारून टाकलेला होता. रावसाहेब मंडलीक, महादेव गोविंद रानडे, अण्णासाहेब पटवर्धन, विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोखले अशा किती तरी व्यक्ती महाराष्ट्राच्या भूमीवर त्याकाळी आपल्या अलौकिक तेजाने तळपत होत्या. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचा त्यांनी होम पेटविला होता आणि समाजकार्याचा विडा उचललेला होता. त्या काळातील या असंख्य व्यक्तींच्या त्यागाला मोलच नव्हते आणि लो. टिळकांच्या तर नव्हतेच नव्हते. त्यांनी आपल्या सर्व शक्तिनिशी अनेक आघाडयांवरून तेव्हाच्या परिस्थितीला तोंड दिलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू तेव्हा इतक्या प्रखर तेजाने तळपलेले आहेत की त्यांना तुलनाच नाही. एकएका पैलूचे संपूर्ण जीवन व्हावे एवढे स्वयंपूर्ण पैलू टिळकांनी जोपासलेले आणि वाढविलेले आहेत.

टिळक नावाच्या एका व्यक्तीचा जो जीवनाविष्कार गेल्या पन्नास पाऊणशे वर्षांपूर्वी व्यक्त झाला होता तो जेवढा दुर्दम्य होता तेवढाच देदीप्यमानही होता. गाडगीळांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिलेले हे विशेषण अतिशय समर्पक आहे. अनेक पातळयांवरून व्यक्त होणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे जीवन गाडगीळ यांनी जितक्या हलक्या हातांनी, हळुवारपणे टिपलेले आहे तितक्याच आत्मविश्वासाने आणि निर्भीडपणे त्याला कलेचा आकार देण्याचे अवघड कार्यही त्यांनी यशस्वीपणे केलेले आहे. 'दुर्दम्य' या कादंबरीचा पहिलाच खंड आज उपलब्ध आहे. त्यावरून सर्व कादंबरीचे रूप पाहणे आणि त्याविषयी निदान करणे शक्य नसले तरी ज्या कालखंडापर्यंत हे जीवन त्यांनी आणून भिडविले आहे ते थेट आणि प्रत्ययकारी उतरलेले आहे या विषयी शंकाच नाही. टिळक ६ सप्टेंबर १८९८ रोजी तुरुंगातून सुटतात येथपर्यंत पहिला खंड आणून समाप्त केलेला आहे. 'बळवंतराव म्याट्रिकची परीक्षा पहिल्या तडाक्याला उतरल्या'पासून या जीवनाची सुरुवात गाडगीळांनी केली आहे. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या

जीवनात खऱ्याखुऱ्या अर्थाने टर्निंग पॉइंट येतो. म्हणजे लोकमान्यांच्या जीवनाची सुरुवात गाडगीळांनी एका टर्निंग पॉईंटपासूनच केलेली आहे.

टिळकांच्या जीवनाचा पट उलगडताना सामान्य मुलाचे एका असामान्य व्यक्तिमत्त्वात कसकसे रूपांतर होत गेले याचा एक चैतन्यमय आलेखच जणू या कादंबरीत गाडगीळांनी काढलेला आहे. 'दुर्दम्य' हा शब्द टिळकांच्या अवघ्या जीवनाचा एकमेव निकष होऊन राहिलेला आहे. त्यांच्या बाबतीतील हा परवलीचा शब्द गाडगीळांनी नेमका हेरला आणि मग त्यानंतर त्यांना टिळकांच्या जीवनाची गुरूकिल्लीच जणू सापडली. एका भक्कम खुंटीला साखळदंडाने बांधलेला सिंह अडकवून ठेवावा तसे गाडगीळांनी 'दुर्दम्य' या खुंटीभोवती टिळकांचे जीवन फिरविले आहे. असे जीवन फिरवीत असताना टिळकांचे मन आणि त्यांच्या आकांक्षा चित्रित करताना गाडगीळ कुठेही कमी पडलेले नाहीत. कॉलेज जीवनातील गप्पागोष्टीतून-टिळकांचे मन इतरांपेक्षा कसे आणि किती निराळे आहे हे दाखविताना ते प्रसंग कसे योजितात ते पाहण्यासारखे आहे. पान ५० वर ते म्हणतात :

'बळवंतराव क्षणभर स्तब्ध राहिले, 'ही गोष्ट काही अगदीच अशक्यातली नाही' या वाक्याने त्यांच्या अंगावर एकदम सर्रकन काटा उभा राहिला होता. एखादे गणित सुटल्यावर उठत असे तसा. आखाड्यात समोर उभ्या राहिलेल्या प्रतिस्पर्धी मल्लाची ताकद अजमवावी तशी ते कल्पनेने इंग्रज सरकारची ताकद अजमावू लागले, 'या पटवर्धनांच्या म्हणण्यातही काही तथ्य आहे. अशक्य असं काहीच नाही. आर्किमिडीज तर ही पृथ्वीदेखील उलथून टाकणं शक्य आहे असं म्हणायचा. त्याचं त्यानं गणित मांडून दाखविलं होतं. मग इंग्रज सरकार उलथून पाडणं का अशक्य व्हावं ? फक्त त्याचं गणित नीट माडलं पाहिजे.'

## विविध पदरांची उकल

या संभाषणातून गाडगीळांनी टिळकांच्या मनाचे कितीतरी पदर अगदी सहज उलगडून दाखविले आहेत. कार्यक्रमाच्या आखणीची सवय, गणित या विषयाबद्दल असलेला विलक्षण ओढा, दास्यत्वातून मुक्त होण्याची जाज्वल्य अभिलाषा आणि आपण हे सारं केलं पाहिजे ही विलक्षण तळमळ. असे अनेक प्रवाह येथे गाडगीळ यांनी टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाला आणून मिळविलेले आहेत. वासुदेव बळवंत फडके या क्रांतिकारकाइतकीच टिळकांना स्वातंत्र्याची तहान लागलेली होती. परंतु या कामी स्वतःच्याच अंगाचा जाळ करून एकट्याचीच आहुती स्वातंत्र्यदेवतेला अर्पण करावयाची का इंग्रज सरकारची ताकद अजमावून ते राज्य उलथून पाडण्याचे गणित मांडावयाचे ? दोन व्यक्तिमत्त्वातील हा फरक गाडगीळांनी जितका नेमकेपणाने तितकाच कलात्मकतेने व्यक्त केला आहे.

लो. टिळकांच्या जीवनातून निघणारे अनंत प्रवाह महाराष्ट्राला देणगी म्हणून मिळालेले आहेत. लोकमान्य म्हणजे जाज्वल्य देशाभिमान, लोकमान्य म्हणजे मूर्ति-

मंत बुद्धिमत्ता, लोकमान्य म्हणजे साक्षात धैर्य; तसेच त्यांचे अवघे जीवन गणितातील प्रमेयांनी निबद्ध झालेले आहे. अनेक व्यक्तींशी त्यांचा संबंध आला, अनेक संस्थांशी आला. हजारो लाखो लोकांना टिळक आपले वाटले. महाराष्ट्राचे नेतृत्व तर त्यांनी केलेच, पण भारतीय नेतृत्वाचे शिखरही काही काळ त्यांनी आक्रमिले होते आणि आश्चर्य असे की इतके असूनही टिळक पुन्हा या साऱ्यांपासून अलिप्तच राहिलेले आहेत. भावनेचा भाग त्यांच्या जीवनात यत्किंचितही दिसत नाही. स्वतःचे मल वारले तेव्हाचा प्रसंग गाडगीळांनी उभा केला आहे. त्यामध्ये टिळकांची प्रतिमा पाहून अचंबा वाटतो. तेव्हाचे त्यांचे वय पाहता त्यांनी इतके आध्यात्मिक असायचे काही कारण नव्हते. परंतु टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे हेच तर वैशिष्टय होते. लोकांच्या भावनांचा ते कल्लोळ उडवून देत पण स्वतः कधीही भावनाप्रधान होत नसत.

स्वतःच्या संसाराच्या बाबतीतही त्यांची वागणूक अशीच अलिप्तपणाची होती. त्यांनी बायकोवर कधी झडझडून प्रेम केले नाही. मुलांकडे कधी वात्सल्याने पाहिले नाही. हा एक प्रकारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दोषच होता असे म्हणावे लागेल. जसा भांडखोरपणा आणि वादाचे टोक शेवटपर्यंत ताणीत नेण्याची त्यांची सवय हेदेखील दोषच म्हणावे लागतील. तरीपण या दोन्हीमध्ये त्यांच्या वृत्तीचे गांभीर्य आणि बुद्धि व तर्क यामधील संगती कधी टळली नाही. हट्टीपणाने वादविवाद करण्यातदेखील त्यांचा एक हिशेब असे आणि हाती घेतलेल्या कार्याविषयीची विलक्षण तळमळ असे. म्हणूनच गोपाळ गणेश आगरकर हे जसे त्यांचे सहकारी मित्र होते तरी पण तत्त्वाची बाब जेव्हा येई तेव्हा टिळक आगरकरांचे वाभाडे काढल्याशिवाय राहात नसत. तडजोड हा शब्द जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला ठाऊकच नव्हता.

अशी ही विलक्षण गुंतागुंतीची व्यक्तिरेखा गाडगीळांनी सामर्थ्याने उभी केली आहे. त्यांचे गणिती मन, गोष्टींकडे अलिप्तपणे राहण्याची सवय, राजकारणाविषयीचे अचूक ज्ञान ही त्यांची वैशिष्टये गाडगीळांनी अतिशय कौशल्याने उभी केली आहेत. टिळक या व्यक्तीच्या जीवनात लहानमोठ्या हजारो लाखो घटना घडल्या आहेत. त्यातील काही घटनांमधून त्यांचे व्यक्तित्व तयार होत गेले आहे आणि काही घटना त्यांच्या अपूर्व व्यक्तित्वामुळेच निर्माण झाल्या आहेत, त्या घटनांचा उपयोग आणि त्यांची बांधणी गाडगीळांनी मूळ व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची दिशा लक्षात घेऊन केलेली दिसते. कारण टिळकांच्या काळात फार मोठमोठी माणसे त्यांच्या अवती भोवती होती. रावसाहेब मंडलीक आणि महादेव गोविंद रानडे ही मंडळी देखील त्या काळाचे नायकच होते. आणि नायकांचेच जीवन लाभलेले त्यांचे सहकारी गोपाळ गणेश आगरकर हेदेखील टिळकांच्या जीवनाशी थेट येऊन भिडलेलेच होते. या साऱ्या गुंतागुंतीच्या आणि अवघड काळातून टिळकांचे नायकत्व सिद्ध करीत करीत पुढे जाणे ही मुख्य अवघड कामगिरी 'दुर्दम्य'चा

कथाविषय आहे. व्यक्तिचित्रणात अथवा विकासाच्या टप्प्यात थोडी देखील गफलत झाली तरी हे प्रभावी चित्रण निष्प्रभ होण्याची भीती ठायी ठायी होती. गाडगीळांना या संकटाची कल्पना पुरेपूर आहे आणि त्यावर मात करण्याचे कौशल्यही त्यांच्याजवळ आहे. आगरकर यांचे व्यक्तिचित्रण थोडे जरी अधिक होते तर टिळकांच्या व्यक्तिरेखेचा तोल जाण्याचा धोका निर्माण झाला असता. मंडलीक आणि रानडे यांच्याशी टिळकांचा जो बौद्धिक पातळीवरून झगडा झालेला आहे त्यामधून टिळकांच्या भावी जीवनाची प्रभावी बीजेच निष्पन्न होतील – झाली पाहिजेत याची काळजी गाडगीळांनी फार घेतलेली आहे. आणि केवळ त्यामुळेच हे अतिशय विशाल जीवन त्यांनी कलेच्या चौकटीत यशस्वीपणे निबद्ध करण्यात यश मिळविले आहे. मराठीतील चरित्रपर कादंबरी म्हणून दुर्दम्यचा ठसा मराठी वाचकावर कायमचा उमटलेला दिसेल असे भाकित करणे अनाठायी होणार नाही.

## थोडा रसभंग

एवढी यशाची बाजू झाल्यानंतर तिच्यातील काही दोषही सांगितले पाहिजेत. पहिला दोष म्हणजे तिच्या निवेदनाच्या ओघात गाडगीळ 'त्या काळच्या पुण्यात असे होणे काही अशक्य नव्हते.' सारखी ऐतिहासिक निवेदनाला शोभतील अशी वाक्ये लिहितात (पान ५२). किंवा 'स्त्रियांना उपजत बुद्धीनेच या गोष्टी कळतात.' सारखी अकलात्मक निवेदने करून जातात (पान ५३), किंवा 'बळवंतरावांना जन्मभर अशी हारच खायची होती.' (पान २३६-२३७) अशी भविष्य वर्तविणारी वाक्ये येतात. निवेदनात अशी वाक्ये कलाहानी करतात आणि जागृत वाचकांचा त्यामुळे रसभंग होतो.

तसेच काही ठिकाणी क्वचित ऐतिहासिक गफलतीही झाल्या आहेत. उदाहरणार्थ पान १५३ पर्यंत टिळकांनी सुरू केलेल्या शाळेच्या नावाचा उल्लेख 'न्यू स्कूल' आढळतो आणि पान १७५ वर एकदम 'न्यू स्कूल'चे 'न्यू इंग्लिश स्कूल होते' असे होण्याला निश्चितच स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे टिळक डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सदस्यत्वाचा राजिनामा देतात तो प्रसंग गाडगीळांनी अगदीच उडत उडत वर्णिला आहे. टिळकांच्या जीवनातील तोही एक 'टर्निंग पॉइंट' आहे, त्या दृष्टीने या प्रसंगाकडे पाहिले गेले नाही.

हे काही थोडे दोष असले तरी 'दुर्दम्य' ही कादंबरी लिहून गाडगीळांनी कादंबरीच्या क्षेत्रात फार मोठे यश मिळविले आहे हे सांगितलेच पाहिजे. ◻

दुर्दम्य : गंगाधर गाडगीळ : सुविचार प्रकाशन, पुणे–नागपूर

## विज्ञानखबरी

दत्तप्रसाद दाभोळकर

# अपोलोंनी सांगितलेले गुपित

अपोलो ११, अपोलो १२, अपोलो १३ – प्रेषिताच्या रुबाबात अपोलो अवतीर्ण होतात. वृत्तपत्रांचे कॉलम अपोलोच्या जयजयकारांनी खळाळून वाहू लागतात. पानपट्टीच्या दुकानापासून पार्लमेंटच्या व्यासपीठापर्यंत अपोलोशिवाय आणखी काही चर्चिलेच जाऊ शकत नाही. तरुण-तरुणींच्या सलज्ज कुजबुजीपासून पेन्शनरांच्या वेळकाढू गप्पांपर्यंत सर्वत्र फक्त अपोलोच बाकी उरतो–प्रेषिताचे भाग्य अपोलोच्या वाट्याला येते आणि प्रेषिताचे दुर्भाग्यही ! प्रेषिताच्या चमत्कारांनी आणि जयजयकारांनी मंत्रमुग्ध झालेली जनता प्रेषिताला काय सांगावयाचे आहे हे बहुधा कधीच ऐकत नाही ! प्रेषिताप्रमाणेच अपोलोही सत्याच्या शोधात नम्रतापूर्वक प्रवास करणारा एक प्रवासी असतो. गवसलेले काही नवे त्याला तुम्हाला सांगावयाचे असते. अपोलोच्या प्रत्येक उड्डाणातून एक नवा मंत्र जन्माला येत असतो. अलिबाबाची एखादी अज्ञात गुहा उघडण्याचे सामर्थ्य या नव्या मंत्रात असते. आपण मात्र हा नवा मंत्र समजावून घेण्याऐवजी अपोलोच्या चमत्कारात आणि जयजयकारात चकावून बसतो !

तुम्हाला माहीत आहे ? परतीचा प्रवास करणाऱ्या अपोलो १२ ने एक विलक्षण प्रयोग केला. चंद्राने भांबावून जावे असा एक विलक्षण प्रयोग. अपोलो १२ ने आपले दोन टन वजनाचे चांद्रयान दर तासाला ५८ शे किलोमिटर वेगाने सरळ चंद्राच्या अंगावर भिरकावून दिले ! चंद्रावरून परत निघण्यापूर्वी कंपनाचा अभ्यास करणारे यंत्र अंतराळवीरांनी चंद्राच्या पृष्ठभागावर बसविले होते. त्या कंपन यंत्राने चंद्रावर झालेल्या या आघाताची प्रतिक्रिया अंतराळवीरांना व जगभरच्या शास्त्रज्ञांना समजावून दिली. चांद्रयानाच्या या आघाताने चंद्रावर एक मजेशीर घटना घडली होती. सतत पंचावन्न मिनिटे आघाताने निर्माण झालेल्या कंपनाच्या लाटा व प्रतिलाटा चंद्राच्या पृष्ठभागावर उमटत होत्या. आपल्या पृथ्वीवर जर अशाच स्वरूपाचा आघात झाला असता तर एक ते दोन मिनिटाहून अधिक काळ कंपनाच्या लाटा व प्रतिलाटा उमटल्या नसत्या. पृथ्वीभोवती वातावरण आहे. पृथ्वीच्या अंतरंगात ज्वालामुखीसारखे पदार्थ भरलेले आहेत. याउलट चंद्राभोवती वातावरण नाही. चंद्राचे अंतरंग एकसंध आहे. ते संपूर्णतः कोरडे आहे–निदान असे आपण मानत आलो आहोत.

कंपनाच्या लाटा चंद्राच्या पृष्ठभागावर काही सेकंदाहून अधिक काळ उमटणार नाहीत अशी सार्वत्रिक समजूत होती. पण या लाटा उठल्या सतत पंचावन्न मिनिटे ! चंद्राला धक्का द्यावयास निघालेल्या शास्त्रज्ञांनाच चंद्राने धक्का दिला ! हा धक्का पचवून कोलंबिया विद्यापीठातील डॉ. ग्रे यांनी काही नवी अनुमाने केली आहेत. त्यांच्या मते चंद्राचा पृष्ठभाग अनेक वेगवेगळ्या थरांचा (आवरणांचा) बनलेला आहे. चंद्राच्या पृष्ठभागात असलेली आवरणे काही कठोर पदार्थांची बनलेली आहेत. कंपनाने निर्माण झालेल्या लाटा लगेच नष्ट न पावता आतल्या आत घुमत राहिल्या त्याचे कारण हेच ! काही शास्त्रज्ञांच्या मते आणखीही एक गोष्ट उघड होते. चंद्राच्या मध्यभागावर आपण समजतो तसा लाव्हासारखा तप्त रस साठविलेला नसणार. चंद्राचा पृष्ठभाग तप्त असेल पण तेथे कोणताही द्रव पदार्थ नसेल. हे अनुमान मान्य केले की, चंद्र पृथ्वीपासून अलग होऊन अंतराळात फेकला गेला हे खोटे ठरते. यापूर्वीच्या अपोलोंनी पण हेच सांगितले होते. प्रशांत महासागराच्या ठिकाणचा काही भाग अंतराळात फेकला गेल्याने चंद्र निर्माण झाला असे आपण मानत होतो. पण चंद्रावरून आणलेली धूळ आणि प्रशांत महासागरातील अपेक्षित विभागातील धूळ यांची पत्रिका अजिबात जमली नव्हती म्हणून सूर्यमालेतील इतर ग्रह जसे जन्माला आले तसाच चंद्र जन्माला आला. चंद्राचा पृथ्वीशी तसा इतर काही संबंध नाही. चंद्राच्या मध्यावर तप्त रस नाही असे म्हटल्यावर चंद्रावर ज्वालामुखी नसणार. म्हणजे चंद्रावर दिसणारी प्रचंड विवरे ज्वालामुखीने निर्माण झालेली नसून चंद्राच्या पृष्ठभागावर उल्कांची जी वृष्टी होते त्यातून ही विवरे जन्माला आलेली असणार. आणखी काही अपोलोंचा प्रवास संपला की, याबाबत आपण नक्की मत देऊ शकू. चंद्राच्या पृष्ठभागावरून आणलेली धूळही कदाचित शास्त्रज्ञांच्या डोळ्यात धूळफेक करत असेल. ती धूळ प्रत्यक्ष चंद्रावरील आहे की चंद्रावर पडलेल्या उल्कांची आहे असा प्रश्न काही शास्त्रज्ञांनी याबाबत विचारला आहे. यापुढील अंतराळवीर चंद्रावर मुक्काम करून चंद्रावर स्फोट करतील. त्या स्फोटांनी निर्माण होणाऱ्या कंपनांचा आलेख घेतील. त्याचवेळी हे अंतराळवीर चंद्राच्या अंतरंगातील अधिक विश्वासार्ह दगड गोळा करतील. अपोलो १३ ची फेरी यशस्वी झाली असती तर हे काम यापूर्वीच संपले असते. यापूर्वी आणलेल्या मातीनेही आणखी एक गोष्ट सांगितलेली आहे. माती जेवढी अधिक खोलवरची तेवढे त्या मातीतील प्रांगाराचे (कार्बनचे) प्रमाण अधिक भरलेले आहे. अशी खूप शक्यता आहे की, फार आतल्या थरात सजीवांच्या निर्मितीसाठी व पोषणासाठी आवश्यक असलेली प्रांगाराची संयुगे दडलेली असतील. चंद्रावर आतापर्यंत सिलीकाने बनविलेली तीन खनिजे आढळली आहेत. विश्वाच्या पाठीवर कोठेतरी प्रांगाराप्रमाणेच सिलिका आपली जीवसृष्टी निर्माण करेल हे रशियन शास्त्रज्ञांचे भाकीत या खनिजांमुळे अनेकांना पुन्हा आठवले. शास्त्रज्ञांना सर्वात अधिक घोटाळ्यात टाकले आहे

चुंबक यंत्रांनी. चंद्राच्या चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी चंद्रावर चुंबक यंत्रे बसविली होती. त्या यंत्रांनी दिलेल्या संदेशांचे योग्य स्पष्टीकरण अजूनही देता आलेले नाही. चंद्राचा ध्रुव प्रदेश हा शास्त्रीय दृष्टीनेही सर्वात महत्त्वाचा प्रदेश आहे. चंद्रावर कोणत्याही स्वरूपात थोडे जरी पाणी असेल तर ते ध्रुव भागातच असेल, आणि चंद्रावर पाण्याचा जरी अत्यल्प भाग मिळाला तरी साऱ्या विश्वाचा नकाशा लगेच बदलून जाईल. चंद्रावर पाणी असेल तर बाकी सर्व संकटावर मात करून माणूस चंद्रावर वसाहत स्थापन करू शकेल. पण नेमक्या याच बाबतीत अपोलो आपणाला काही सांगू शकणार नाही. चंद्राची स्थिती आणि इतर शास्त्रीय अडचणी मुळे अपोलोच्या चांद्रयानाला ध्रुवप्रदेशात उतरता येणार नाही. अपोलो आपणाला जे काही सांगू शकतो ते इथे संपते. शास्त्रज्ञांनी याबाबत एक वेगळा उपाय

---

## मी हे वाचले आहे……

भाक्रा नानगलचे धरण बांधले त्यावेळी त्याची आयुर्मर्यादा ६५० वर्षांची कल्पिली होती, पण काही तज्ज्ञांच्या मते त्या धरणाची आयुर्मर्यादा ६५ वर्षांहून अधिक असणार नाही. अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. जॉर्ज क्वेस्टर यांनी 'सायन्स अॅन्ड पब्लीक अफेअर्स' या मासिकात एक लेख लिहिलाय. भारत लवकरच अणुबाँब बनवेल असे साधार विवेचन त्यांनी त्या लेखात केलंय. आपण ३३ एकर जमिनीत शेती करतो तरीही आपले धान्याचे उत्पादन फक्त दहा कोटी टन आहे हे एवढे धान्यही दरमाणशी दरवर्षी १८० किलो धान्य देऊ शकेल. एवढे अन्न जगण्यास पुरेसे असेल. प्रत्यक्षात मात्र आपण दरवर्षी एक कोटी टन धान्य आयात करतो. पाश्चात्य देशात प्रत्येक माणूस दरमहा १८ किलो मासे वा मटण खातो. भारतात हे प्रमाण दरमहा दर माणशी ३ किलो एवढे कमी आहे. आपण आपल्या आहारातील मांस व मटणाचे प्रमाण पाश्चात्यांच्या एवढे केल्यास आपण धान्य निर्यात करू! भारताला ४७०० किलोमीटर्सचा समुद्रकिनारा लाभला आहे. भारतातील नद्यांचे क्षेत्रफळ तीन कोटी एकरांचे आहे. एवढ्या पाण्यात आपण एक कोटी टन वजनाचे मासे पकडू शकू. प्रत्यक्षात आपण फक्त पंधरा लाख टन मासे पकडतो. चहा कॉफी यांचे महत्त्व लोकांना पटविण्यासाठी आपणाकडे चहा व कॉफी बोर्ड आहे. मासेमारीबद्दल आपण अजूनही असा बोर्ड स्थापन केलेला नाही. अग्निबाण उडविण्याच्या क्षेत्रात आपण फार झपाट्याने प्रगती करीत आहोत. गेल्या काही महिन्यात ५८ किलो व २७ किलो वजनाचे दोन अग्निबाण आपण अनुक्रमे १२० किलोमिटर व १९५ किलोमिटर एवढे वर उडविले.

आता ठरविला आहे. सूर्याकडे सोडले जाणारे 'सॅटर्न पाच' हे रॉकेट, चंद्राजवळून जाताना चंद्राच्या ध्रुवप्रदेशाच्या दिशेने एक दुसरे रॉकेट सोडेल. हे दुसरे रॉकेट चंद्राच्या ध्रुवप्रदेशाला जोरदार धडक देईल. त्यामुळे चंद्राच्या ध्रुवप्रदेशाबद्दल माहिती तर मिळेलच पण आपण भाग्यवान असलो तर चंद्राच्या त्या भागातील पाण्याचाही आपणाला शोध लागून जाईल.

## मुजऱ्याचे मानकरी

चीनने अणुबाँबचा पहिला स्फोट केला त्यावेळी डॉ. भाभा आत्मविश्वासाने म्हणाले होते, 'आम्ही सुद्धा फक्त एका वर्षात अणुबाँब बनवू शकू. एका बाँबची किंमत एक कोटी रुपयांहून अधिक नसेल!' भाभांचा हा आत्मविश्वास लटका नव्हता. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवितील अशा कर्तृत्ववान भारतीय शास्त्रज्ञांचा संच भाभांनी उभा केला होता. २७ डिसेंबर १९६८ला चीनने ज्यावेळी अणुबाँबचा स्फोट केला त्यावेळी भारतीय शास्त्रज्ञांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखविली. डॉ. टी. जी. वर्गीस आणि डॉ. व्ही. कुमार या दोन भारतीय शास्त्रज्ञांनी एक नवी पद्धत वापरून एक नवा प्रयोग केला. चीनची अणुस्फोटाची नक्की जागा व नक्की वेळ या प्रयोगामुळे कळू शकली. अमेरिकेने इतर मार्गांनी मिळविलेल्या माहितीशी ही माहिती तंतोतंत जुळत होती. भारतीय शास्त्रज्ञांच्या पराक्रमाची ही वीरगाथा 'नेचर' या जगद्विख्यात अमेरिकन मासिकाने नुकतीच प्रसिद्ध केली आहे.

या दोन शास्त्रज्ञांनी उत्तर आणि पूर्व दिशांना एका विशिष्ट अंशातील दोन जागा निवडल्या. या दोन जागांच्या मधील अंतर १६७० कि. मिटर एवढे ठेवण्यात आले. या दोन ठिकाणी भारतात बनविलेल्या वायुदमन लेखनींची (Barograph) स्थापना करण्यात आली. दोन्ही वायुदमन लेखनी त्रिकोणी आकाराच्या होत्या. आणि त्रिकोणाच्या प्रत्येक बाजूवर अतिसूक्ष्म लहरींची नोंद करणारी आणखी एक एक वायुलेखनी बसविण्यात आली होती. हवेच्या दाबात थोडा जरी बदल झाला तरी या यंत्रांनी त्याची नोंद घेतली असती. बाजाच्या पेटीला असतात तसे भाते या यंत्राला लावलेले होते. हवेच्या दाबाच्या फरकामुळे होणाऱ्या अतिसूक्ष्म आवाजाची नोंद त्या भात्यांनी घेतली असती. हे भाते एका विद्युत प्रवाहाला जोडलेले होते व या सर्वांजवळ चुंबकीय शक्तीवर काम करणारे ध्वनिचित्रक (Tape recorder) बसवले होते. हे ध्वनिचित्रक जागतिक वेळेच्या (G. M. T.) आलेख पट्टीशी जोडलेले होते. अणुस्फोटानंतर क्षितिज पातळीशी समांतर अशा ज्या लाटा निर्माण झाल्या त्याची नोंद या वायुदमन लेखनींनी केली ध्वनिचित्रण दर वीस सेकंदाला 'एक डाइन प्रती सेंटिमिटर' एवढ्या हवेच्या दाबातील फरकाची नोंद करू शकत होता. या यंत्रांनी एक गोष्ट स्पष्ट झाली. हवेच्या दाबात झालेला फरक

दोन्ही यंत्रांनी सारखाच नोंदविला होता. पण उत्तर दिशेला बसविलेल्या यंत्रांनी ही नोंद एक तास वीस मिनिटे उशिरा केली होती. म्हणजे ४१.५५° अक्षांशात उत्तरेकडे आणि ९०° रेखांशात पूर्वेकडच्या भागात, 'लोप नोर'जवळच्या एका भागात हा स्फोट झाला होता. स्फोटाची जागा अचूकपणे नक्की केल्यावर स्फोटाची वेळ ठरविणे सोपे होते. स्फोटामुळे निर्माण झालेल्या लहरींचा सरासरी वेग ठरविण्यात आला. स्फोटाची जागा व आपण बसविलेल्या यंत्राची जागा यातील अचूक अंतर मोजण्यात आले. या अंतराला लहरीच्या वेगाने भाग दिल्यावर स्फोटाची वेळ व पहिली नोंद यामधील कालावधी मिळाला. हा कालावधी दोन तास एक मिनिटांचा होता. आपल्या यंत्राने पहिली नोंद जागतिक वेळेनुसार ९-३० ला केली होती म्हणजे लोप नोर जवळच्या त्या विशिष्ट ठिकाणी जागतिक वेळेनुसार सकाळी ७-७९ ला चीनने अणुस्फोट केला होता.

डॉ. टी. जी. वर्गीस आणि डॉ. व्ही. कुमार यांनी केलेले काम लाख मोलाचे आहे. हे दोघे परदेशात जन्मले असते तर तिथल्या विज्ञानप्रेमी तरुणांनी त्यांचे मुळी टोलेजंग सत्कारच केले असते. इथे मात्र त्यांच्या कार्याची माहिती एका अमेरिकन मासिकावरून आपणाला समजते आहे. पण म्हणनही काही बिघडत नाही. आपण सारेचजण त्यांचे आज अभिनंदन करू या. – खूप उशिरा पण अगदी मनापासून !

□ □ □

## सोपे गणित (लठ्ठ लोकांसाठी)

आपण लठ्ठ आहात काय ? असलात तरी आहार अथवा व्यायाम या संबंधी आपण तज्ञ असाल ही शक्यता फारच कमी. अर्थात तुमच्या मनातून आपले वजन यापेक्षा अधिक वाढू नये असे निश्चितपणे वाटत असेल (आणि वजन न चुकता वाढत असेल) तर एक अगदी सोपे गणित सांगतो. सुमारे १६० पौंडाचा माणूस तासाला जर ३॥ मैल या वेगाने चालला तर दर मिनटाला तो सुमारे पाच कॅलरी उष्णता खर्च करतो. याचा अर्थ तुम्ही जर दररोज तासभर चालण्याचा व्यायाम घेतलात तर सुमारे तीनशे कॅलरी उष्णता वापरता. (थोडक्यात तुमच्या शरीरातले तेवढ्या अन्नाचे ज्वलन होते). ही उष्णता फक्त एक औंस स्निग्ध पदार्थापासून मिळते. एक औंस म्हणजे दररोजच्या जेवणात थोडेसेच तूप लोणी जास्त. तुम्ही त्याचा विचार करत नाही. पण ह्या अवघ्या एका औंसाने (आणि त्याबरोबर न चालण्याने) तुमचे वजन वर्षाच्या शेवटी पंचवीस पौंडाने वाढते. थेंबे थेंबे तळे साचते ते असे.

# रंगभूमि

## दादू इंदुरीकर

### अखेर लग्नच मानवलं !

दादू इंदुरीकर ही मोठी अजब चीज आहे. त्यांच्या नवीन वगासंबंधी तुमची काहीही मते असोत; पण त्यांच्या कौशल्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. दीर्घकाळ बोर्डापासून दूर असलेल्या या कलावंताला अनेकांनी सहाय्य करून पुन्हा त्यांचा फड उभा करून दिला.

न्यू हनुमान थिएटरमार्फत त्यांनी सादर केलेला कार्यक्रम भरपूर मनोरंजन करणारा, त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करणारा आणि दिलेल्या पैशाचा पुरेपूर मोबदला देणारा आहे. तमाशाची सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या या कार्यक्रमामध्ये आढळतात. गणगौळण, नंतर लंका, सरला नांदुरेकर आणि पार्टीचा कार्यक्रम आणि मग 'गाढवाचं लग्न' हा वग अशी त्यांच्या कार्यक्रमांची मांडणी आहे.

गणगौळणीचा प्रारंभीचा भाग रंगत नाही. नांदुरेकर पार्टीची बारी प्रेक्षणीय आहे आज तमाशामधील ज्या नृत्यांगना आहेत त्यामध्ये नांदुरेकर पार्टीतील सरलाला अग्रक्रमाचा मान द्यावा लागेल. कार्यक्रमाची आखणी पद्धतशीरपणे केली आहे. या चारही भगिनी आपआपल्या क्षेत्रामध्ये प्रभावी असल्या तरी त्यातील सरलाचे नृत्य विशेष प्रभावी वाटते. तिची तयारी, आवेश, चैतन्यमय हालचाली, आणि भावदर्शनाचे कौशल्य, यामुळे सहसा टाळी न देणारे पुणेकर तिच्या कार्यक्रमाला हमखास दाद देतात. लंका आणि सरला या दोघींना नृत्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळालं आहे. दोघींच्या नृत्याविष्कारामध्ये मात्र पुष्कळच फरक आहे. गाढवाचं लग्न या वगाआधी होणारा हा तास सव्वा तासाचा कार्यक्रम प्रेक्षकांना एकदम पसंत पडतो.

'गाढवाचं लग्न' या वगाचं कथानक तसं लहान, आणि तमाशाला फारसं नवीन नसलेलं. तथापि वग खुलतो तो इंदुरीकर यांच्या कौशल्यामुळे. इंदुरीकर यांचा मिस्कील, सहजसुंदर अभिनय, आणि कामातील सफाई यामुळे कथानक समर्थपणे उचलून धरले जाते, आणि वग चांगलाच रंगतो.

इंद्रदेवाच्या दरबारामध्ये गंधर्व (सदाशिव रूपवते) नाचणाऱ्या अप्सरेचा हात धरतो. या घटनेने इंद्र संतापतो आणि 'तू पृथ्वीवरचे गाढव होशील' असा गंधर्वाला शाप देतो. चित्रसेन गंधर्व शापवाणी ऐकून घाबरून जातो. आपली चूक कबूल करतो आणि इंद्राची क्षमायाचना करतो. नेहमीप्रमाणे त्याला उःशाप मिळतो. इंद्र म्हणतो–'राजकन्येशी तुझे लग्न होईल, आणि तू पुन्हा गाढवाचा गंधर्व होशील.' गंधर्वरूपी गाढव सावळ्या कुंभाराकडे (दादू इंदुरीकर) आश्रयाला येते. सावळ्या व त्याची पत्नी गंगी (सौ. प्रभा शिवणेकर) या आगांतुक गाढवाचा संभाळ करतात.

एका रात्रीत तांब्या-पितळेची सात मजली माडी जो बांधेल त्याच्याशी मी लग्न करीन, असा राजकन्या 'पण' करते. गावात दवंडी पिटली जाते. सावळ्या आपल्या गाढवाच्या सांगण्याप्रमाणे राजाला भेटून 'पण' पूर्ण करण्याचे आश्वासन देऊन त्याच्याशी करार करून मोकळा होतो. गंधर्वरूपी गाढव 'पण' पूर्ण करते. राजकन्येचे गाढवाशी लग्न होते आणि गाढवाचा पुन्हा गंधर्व होतो.

वगामध्ये तीस-पस्तीस पात्रे असली, आणि प्रत्येक कलावंत आपआपल्या परीने वग रंगवत असला तरी वगावर खरी पकड इंदुरीकर यांचीच आहे. 'विच्छा-फेम' दादा कोंडके यांनी अनेक लकबी दादू इंदुरीकर यांच्याकडून घेतल्या असाव्यात असे इंदुरीकर यांचा सोंगाड्या पहात असताना जाणवते. दादांची वैचारिक बैठक कदाचित इंदुरीकर यांच्याजवळ नसेल; पण त्यांचा अस्सल रांगडा व क्वचित प्रसंगी अतिरंजीत वाटणाऱ्या खास तमाशा ढंगाच्या विनोदाला स्वतंत्र असे स्थान आहे. विनोदाचे मर्म ओळखून वाक्यांची अचूक फेक करणारा हा तमासगीर प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करतो यात शंका नाही.

दादू इंदुरीकर यांच्याविषयी विशेष उत्सुकता वाटल्याने त्यांना मुद्दाम भेटलो. पन्नाशी ओलांडलेल्या या कलावंताने जीवनाच्या विविध छटा स्वतः अनुभवल्या आहेत. बरे-वाईट दिवस पाहिले आहेत. दादूचं घराणंच तमासगिराचं. वडिलांचा व्यवसाय तमासगिरीचाच. दादूलाही लहानपणापासून या व्यवसायाची गोडी लागली. रोज रात्री जागवायच्या, तमाशे बघायचे, आणि रात्री पाहिलेल्या नकला दिवसा करायच्या. तुकाराम, शिंदे, सदाशिव पवार आणि अन्य स्नेह्या-सोबत्यां-बरोबर दादू लहानपणापासूनच कलगीतुऱ्याची भेदकी लावू लागला. दादूंनी एकदा ऐनवेळी म्हटलेली 'तू एक नंदाची नारी' ही लावणी पठ्ठे बापूरावांनी ऐकली होती आणि दादूला शाबासकी व आशीर्वाद दिले होते. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली तमासगिरीचे शिक्षण चालू असतानाच दादूचे वडील वारले. वडिलांच्या मृत्यूनंतर चुलत बधू मारुती इंदुरीकर यांची सोबत झाली. दादूचे स्वतःचे शिक्षण अगदीच बेताचे. त्यामुळे व्यवसायाला जी व्यवहाराची जोड हवी ती नसल्याने त्यांना कायम कुणाच्या तरी सहकार्याची आवश्यकता भासली. १९४४ मध्ये त्यांच्या चुलतभावाचे निधन



दादू इंदुरीकर । साठीच्या घरात !

झाले. काही त्रासदायक दिवसानंतर किसन कुरगावकराच्या मदतीने त्यांनी पुन्हा नवीन फड उभा केला. केवळ या व्यवसायावर नवीन जबाबदाऱ्या पेलणे कठीण झाल्यावर त्यांनी १९५६ मध्ये कॉटन ग्रीन येथे नोकरी पत्करली. नोकरी करीत असले, तरी त्यांचा खरा जीव आपल्या मूळ व्यवसायावर होता. तमाशाचा व्यवसाय मोठा विचित्र. बहुसंख्य मंडळी अशिक्षित असल्याने अनेक वेळा निरनिराळ्या फडांमध्ये बाचाबाची होते. एखादा कलावंत नावारूपाला येऊ लागला, त्याला लोकप्रियता मिळू लागली म्हणजे अन्य फडातील मंडळींचा जळफळाट सुरू होतो. मग माणसे फोडणे, कलाकाराला बदनाम करणे, त्याच्या सामानाची नासधूस करणे, असले प्रकार सुरू होतात. दादूंच्या वाढत्या लोकप्रियतेलाही या संकटांचे ग्रहण

लागले. १९६७ साली काही विघ्नसंतोषी मंडळींनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यांची सर्व मालमत्ता जाळून टाकली. फड उभा राहात नाही असे पाहिल्यावर साथीदार साथ सोडून निघून केले. आणि मानहानीचे जिणे पदरी आले. जिवाभावाचा व्यवसाय बंद पडला, तरी संसार चालवण्याची जबाबदारी टाळता येणे शक्य नव्हते. कलगी तुऱ्याच्या भेदक लावण्या गाण्यात महशूर असणाऱ्या या कलाकाराने काय करावे ? सबंध व्यवसायाला लाज वाटावी अशा पद्धतीचे जिणे दादूच्या वाट्याला आले. वॉर्डन रोडवरील एका पारशाकडे त्यांनी व त्यांच्या पत्नीने नोकरी पत्करली. भांडी घासण्यापासूनचे सर्व काम केले. दादूची दुर्दशा नाट्यव्यवसायातील मंडळींच्या कानी गेली. तमाशाप्रेमी मंडळींनी शासनाचे लक्ष या गुणी कलाकाराकडे जावे म्हणून प्रयत्न केले. नगरचे आमदार दादासाहेब रूपवते यांच्या विशेष प्रयत्नांमुळे मुख्यमंत्र्यांकरवी दोन हजार रुपयांची मदत इंदुरीकरांना देण्यात आली. शाहीर दादा कोंडके इंदुरीकरांचे शिष्य नसले, तरी दादूचा तमाशा त्यांनी पाहिला होता. कलाकार कसबी असल्याची त्यांची खात्री पटली होती. इंदुरीकरांवर ओढवलेल्या या कठीण प्रसंगी शाहीरांनी एक हजार रुपयांचे सहकार्य दिले. व्यवसायातील काही मंडळी दुःस्वास करीत असली, तरी त्यांच्यासंबंधी प्रेम बाळगणारी मंडळीही होतीच. सांगलीकर मंडळींसह भिकोबा पाटील यांनी पाचशे एक रुपयांचे सहाय्य केले. या सर्वांचा नावानिशी उल्लेख करण्याची गरज नव्हती. पण आपल्या मुलाखतीत या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला जावा अशी इंदुरीकरांची इच्छा असल्याने मुद्दाम नामोल्लेख केला.

पैशाची तरतूद झाल्यावर फड पुन्हा उभा राहिला. नाशिक, सोलापूर, पुणे, कोल्हापूर तसेच ग्रामीण भागात प्रयोग करण्यात आले. इंदुरीकर–शिवणेकर जोडीचे नाव पुन्हा गाजू लागले. महाराष्ट्र शासनाच्या तमाशास्पर्धेत इंदुरीकर यांनी कायम पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळविले आहे.

श्री. शंकर घाणेकर व न्यु हनुमान थिएटरचे चालक मधुकर नेराळे यांच्या सहकार्याने इदुरीकरांनी हा नवीन वग उभा केला आहे. पुण्या-मुंबईत मोठ्या जोरात प्रयोग चालू आहेत. 'गाढवाचं लग्न' यशस्वी ठरल्याने या कलाकाराला एक प्रकारची स्वस्थता आली आहे. तमाशाचे जीवन ते लहानपणापासूनच बघत आहेत, जगत आहेत. या व्यवसायातून उठण्याची वेळ येऊनही त्यांचे या व्यवसायावरील प्रेम कमी झालेले नाही. आपल्या मुलांपैकी एकाने तरी या व्यवसायात शिरावे अशी त्यांची इच्छा आहे. अशा या श्रद्धाळू कलाकाराच्या कलेचा आनंद दीर्घकाळ रसिकांना लुटता यावा असे मनापासून वाटते.

– शरद गोखले

महाराष्ट्र राज्याचे गादीवरच्या कुस्तीचे कोच
श्रीरंग जाधव यांची मुलाखत

# मराठी माती
# आणि
# गादीवरची कुस्ती

"पाहिलात ह्या तुमच्या गादीवरच्या कुस्तीचा कस ! मागच्याच हंगामात हजरत पटेलपासून सादिक पंजाबीपर्यंत सगळ्यांना खडे चारणाऱ्या मारुतीला ह्या रशियन मल्लाने अवघ्या ऐंशी सेकंदात चांदण्या मोजायला लावल्या. आहेत कुठं मॅटवरच्या कुस्तीसाठी योजनाबद्ध प्रयत्न ! आणि आंतरराष्ट्रीय कुस्तीत आपले नाव वाढावे असं आपल्या सरकारला मनापासून वाटंत तरी कुठं ? त्यांना पाहिजे आहेत चाळीस पन्नास रुपयाच्या खिरापतीवर त्यांचा झेंडा गावात नाचविणारे टगे. काही दिवसापूर्वीच कुस्तीत हयात घालवलेले ह्या विषयातले फण्यातले एक वयोवृद्ध तज्ञ मला पोटतिडकीने सांगत होते.

श्रीरंग जाधवांच्याकडे मुलाखतीला जाताना ह्या विचारांनी माझ्या मनाला पुन्हा अस्वस्थ केले होते. श्रीरंग जाधवांचा मातीवरच्या कुस्तीतला लौकिक मोठा आहे, आणि गेली पाच वर्षे महाराष्ट्र शासनाने गादीवरच्या कुस्त्यांसाठी नेमलेले कोच म्हणून ते काम करतात. महाराष्ट्र शासन हे कुस्तीप्रिय आहे असा डंका नेहमी पिटला जातो. (कदाचित शासनाचा बोलविता धनी सातारा-कोल्हापूरच्या मातीत वाढल्यामुळे असेल)पण कुस्तीची अभिमानास्पद परंपरा सांगणाऱ्या महाराष्ट्रीयन मल्लाची गादीवरील कुस्तीतील कामगिरी बरीच निराशाजनक आहे हे कटू पण सत्य आहे.

'हे असे का होते ? अपयशानंतर जोरजोरात चर्चा होते, पुन्हा जैसे थे. परिस्थितीत सुधारणा का होत नाही ?'

'कोण म्हणते सुधारणा होत नाही ? परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच सुधारली आहे.'

'पण तरीही आपण मागेच का ?

'अजूनही खूप सुधारणा व्हावयास हवी.'

'हे पुढाऱ्यासारखे उत्तर झाले. दारिद्र्य दूर होत आहे. पण अजून खूप प्रगती करायला पाहिजे.'

'तसं नव्हे. असे बघा, मी १९५२ साली हेलसिंकीच्या (ऑस्ट्रेलिया) ऑलंपिक स्पर्धेत भाग घेतला. संपूर्ण खर्च तर स्वतः करावा लागलाच; पण एकाही दिवसाचा सराव न मिळता वा एकाही नियमाची माहिती नसता कपडे काढले ते प्रत्यक्ष सामन्यातच.'

'सध्या काय होते ?'

'पहिलवानाला आधी कोचिंग मिळते. निवड झाल्यावरही खास कोचिंग मिळते.'

'हरिचंद्र बिरासदार वा मारुती मानेंना असे प्रशिक्षण मिळाले होते ?'

'फारसे मिळाले नाही.'

'का ?'

'गेल्या डिसेंबरमध्ये साताराची मॅट कुस्तीगीर परिषदेसाठी लातूरला गेली तो अजून परत आली नाही.'

'याचा अर्थ मातीवरच्या कुस्तीतील सरावावरच त्यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत बाजी मारली.'

'हो, जवळजवळ तसेच.'

'इतरांच्या प्रशिक्षणाचे स्वरूप काय ?'

'दरवर्षी आम्ही गादीवरच्या कुस्तीचे शिक्षण देणारा एक महिन्याचा कँप घेतो.'

'आणखी काही ?'

'याशिवाय काही कॉलेजे व व्यायामसंस्था कुस्तीसाठी जे कँप भरवितात त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करतो.'

'हे करूनही खूप वेळ उरतो. त्यातील कामाचे स्वरूप ?'

'त्यावेळी मी बहुधा सातारला असतो. ते माझे नेमून दिलेले हेडक्वार्टर आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ मी दोन तास तालमीत असतो.'

'साताराचे सोडून दुसरे पहिलवान असतात ?'

'हो. पुण्या-सोलापूरचे सुमारे आठ-दहा.'

'सरकारी खर्चाने ?'

'नाही स्वतःच्या.'

'रामचंद्र चव्हाण हे तुमचे दुसरे कोच ? त्यांचे काम ?'

'ते केंद्रातर्फे नेमलेले आहेत. त्यामुळे भारतातल्या अनेक कोचिंग कँप्सना त्यांना जावे लागते. इतर वेळा ते मुंबईत शिक्षण देतातच.'

'प्रत्यक्ष गरजेच्या मानाने हे खूपच कमी होते असे नाही तुम्हाला वाटत ?'

'नक्कीच, पण त्यालाही कारणे आहेत.'

'कोणती ?'

'मातीच्या कुस्तीचेच आकर्षण अजून लोकात आहे. त्यामुळे पैसे देणाऱ्या या धंद्याकडे पहिलवान दुर्लक्ष करू शकत नाही. शिवाय मॅट फक्त चार पाच ठिकाणीच सातारा, पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली. कोचची संख्याही खूप कमी पडते. पंजाब राज्यात प्रत्येक जिल्ह्याला एकेक कोच असतो. नाही तर आपल्याकडे मराठवाड्याच्या बिरासदारला कोल्हापूरला यावे लागते.'

'तुमच्या मासिक स्कॉलरशिपने गादीवरच्या कुस्तीला मदत कशी होणार?'

'होत नाही. फक्त पहिलवानाला थोडी मदत होते. आमच्या मेहनतीच्या काळात आम्ही थंडाईसाठी दोन किलो बदाम आठवड्याला आणत असू. आज बदाम ९० रु. किलो झाले आहेत.'

'मातीवरच्या आणि गादीवरच्या कुस्तीत नेमका फरक काय ?'

'गादीवरची कुस्ती अधिक चपळाईची आणि अधिक कौशल्यपूर्ण, अतिशय नियमबद्ध. त्यामुळे तक्रारीला जागा नाही. वेळेचे बंधन त्यामुळे मामला झटपट, आणि गुणावर निर्णय त्यामुळे निकाली कुस्ती हे नक्कीच.'

'एवढे असूनही आपल्या लोकांना ती आवडत नाही. का ?'

'खरे आहे. मातीच्या कुस्तीची जुनी परंपरा त्याला बहुधा कारण असावी. लोकांची अभिरुची अजून बदलली नाही.'

'होतकरू पहिलवानाला प्रथमपासूनच गादीवरच्या कुस्तीचा भरपूर सराव दिला तर फायदा होणार नाही का ?'

'निश्चितच होईल. त्यासाठी आम्ही एक योजना सध्या तयार करीत आहोत. आपल्या जिल्ह्यात नंबर काढणारे आणि इतर होतकरू अशा सुमारे वीस पंचवीस पहिलवानांची कुस्तीगीर परिषद वर्षा दोन वर्षासाठी निवड करेल. त्यांना मानधन देईल.'

'किती ?'

'ते साधारणतः त्यांच्या गटावर राहील. पण १४० पौंडावरच्या पहिलवानास महिना दोनशे, त्यापेक्षा भारी वजनाला सुमारे तीनशे याप्रकारे ! त्या काळात तो साताऱ्यात राहील आणि सतत गादीवरच्या कुस्तीचा सराव करील.'

'त्याची मातीवरची कुस्ती तुम्ही त्यावेळेस बद करणार काय ?'

'नाही.'

'पण मग संपूर्णपणे गादीवरच्या कुस्तीत लक्ष केंद्रित करण्यात अडचण नाही येणार ?'

'दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे मातीवरच्या कुस्तीतील फायदा गादीवरच्या कुस्तीत होतोच. दुसरे असे की फडावरच्या कुस्तीत मिळणारे पैसे हे त्याला दिल्या जाणाऱ्या मानधनापेक्षा बरेच अधिक असतात. ते सोडल्यास पहिलवान तयार होणार नाहीत. मला वाटते त्यांना एवढी सवलत असावी.'

'याशिवाय सरकारने काय करावे ?'

'कुस्ती हा जीवावरचा खेळ आहे. हातपाय कायमचा जायबंदी होण्याचा संभव. त्यात जीव ओतून खेळायला तसेच प्रोत्साहन हवे.'

'म्हणजे नेमके काय ?'

आम्हाला कुस्तीचे ट्रेनिंग द्यायला इराणचा जागतिक किर्तीचा मल्ल अमीर हमीदी पतिळायला आला होता. तो सांगे त्या राष्ट्राचा खेळाडू ऑलंपिकमध्ये ज्या प्रकारचा सन्मान मिळवतो, त्याप्रमाणे सरकार त्याच्या सर्व भावी आयुष्याची तरतूद करते.'

'म्हणजे आपल्या म्हणण्याप्रमाणे सरकारने ऑलंपिक स्पर्धेत जो विजेते वा उपविजेतेपद मिळवेल त्याला तहहयात एखादी एजन्सी वा रोख मानधन देण्याचे आधीच जाहीर केले तर त्याचा बराच उपयोग होईल.'

'हो त्यापासून बरीच स्फूर्ती मिळेल.'

'मला हे फारसे पटत नाही, पण ते असो. आणखी काही विचारतो.'

'विचारा.'

'हिंदकेसरी स्पर्धेबद्दल आपले मत काय ?'

त्या हास्यास्पद होऊ लागल्या आहेत. एक ऑलंपिक विजेता दुसऱ्या ऑलंपिकला हिरीरीने उतरतो. मारुती मानेला मारलेला अलेक्झाडर सहा वेळा जागतिक विजेता आहे. पण हिंदकेसरी बाबतही ईर्षा कुठे दिसते ? शिवाय सगळे नामवंत मल्ल त्यामध्ये एकाच वेळी भाग तरी कोठे घेतात ?'

'हे भाग घेणे सक्तीचे करावे काय ?'

'काही प्रमाणात सक्ती केली तरच हिंदकेसरी या सर्वोच मल्लाला अर्थ राहील.'

'समजा या सुधारणा करून हिंदकेसरी मॅटरवरची केली तर ?'

'जरूर करावी. त्याचा फायदा होईल.'


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

**दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २**

'मग महाराष्ट्र केसरी मॅटवरची का नाही ?'

'सध्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद दरवर्षीच्या अधिवेशनात फक्त विद्यार्थीगटाच्या कुस्त्या मॅटवरच्या घेते. हौशी गट आणि महाराष्ट्र केसरीच्या कुस्त्या मातीवर होतात. हे लवकरच बदलायला हवे.'

'राज्यक्रीडा महोत्सवही सरकारी, तेथील कुस्त्या मातीवरच्या का ?'

'ह्या सर्वच कुस्त्या मॅटवरच्या होतील तेव्हा गादीवरच्या कुस्तीत अधिक चांगले पहिलवान होतील हे खरे, पण मॅटचा प्रश्न येतो. राज्य क्रीडा महोत्सवाचे पहिलवान गट तालुका जिल्हा पातळीवरून येतात. ह्या ठिकाणी मॅट उपलब्ध असल्याशिवाय त्यांना राज्यस्पर्धेत एकदम मॅटवर खेळण्यास कसे सांगणार ?'

'मॅटचा खर्च काय !'

'बऱ्यापैकी मॅटला तीन ते चार हजार. आणि आता सातारा येथे जे खास कोचिंग चालू होईल त्यासाठी होणाऱ्या रंजच्या मॅटला पंधरा ते वीस हजार.'

'ह्या कॅंपसाठी जे बहुश्रा निवडले जातील आणि ज्यांच्याबद्दल महाराष्ट्राने येत्या काही वर्षात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आशा करण्यास हरकत नाही अशी काही नावे आपण सांगू शकाल काय ?'

'जरूर. साताराचे साहेबराव जाधव, बलभीम भोसले, सांगलीचा संभाजी पवार, कोल्हापूरचा महंमद हनीफचा धाकटा भाऊ रसूल हनीफ काका दह्यारी.'

'एकंदरीत महाराष्ट्राच्या कुस्तीगीरांचे गादीवरच्या कुस्तीतले भवितव्य तुम्हाला उज्वल वाटले.'

हो निश्चितच !

— डॉ. नरेंद्र दाभोळकर

---

## नलगे मल्लीनाथी

परदेशातील खेळाच्या स्पर्धांसाठी संघ पाठविले जातात तेव्हा त्यांच्याबरोबर व्यवस्थापक म्हणून त्याच त्याच व्यक्ती जातात. त्यांची चौकशी करण्याचे ऑल इंडिया कौन्सिल ऑल स्पोर्टस्ने ठरविले आहे, असे त्याचे अध्यक्ष जे. बी. मल्लाराध्य यांनी नव्या दिल्लीत पत्रकारांना सांगितले. (२७ ऑगस्ट) या कामासाठी लागणारे तज्ञ खेळाडू आणि व्यवस्थापक देशात मुळीच कमी नाहीत.

ते पुढे म्हणाले, खेळासाठी दिलेल्या पैशाचा गैरवाजवी वाटा व्यवस्थापनावर खर्च पडतो. साहजिकच खेळाडू आणि खेळाची साधने यांच्यासाठी पुरेसा पैसा मिळत नाही. आंतरराष्ट्रीय स्पर्धात हिंदचा क्रमांक खाली आहे त्याचे हे प्रमुख कारण आहे.

---

काँग्रेस विरोधी आघाडी असे आपल्या आघाडीस नंबुद्रीपाद जे स्वरूप देतात ते हास्यास्पद आहे. डाव्या कम्युनिटांच्या नेतृत्वाखालील 'लोकशाही जनआघाडी'मध्ये संयुक्त समाजवादी आणि के. टी. पी व के. एम्. पी. हे दोन राज्यपातळीवरील पक्ष आहेत. म्हणजे या आघाडीची खरी ताकद डावे कम्युनिस्टच आहेत. नंबुद्रीपाद निर्विवाद बहुमताच्या वल्गना करत असले, तरी आपल्या आघाडीच्या खऱ्या सामर्थ्याची त्यांना पूर्ण कल्पना आहे.

## तडजोडीचे राजकारण

त्यामुळेच निवडणुकीतील यशाची शक्यता वाढवण्यासाठी संघटना काँग्रेसशी त्यांनी 'छुपी तडजोड' चालवली आहे. संघटना काँग्रेसची आघाडी आणि डाव्या कम्युनिस्टांची आघाडी यामध्ये काही फरक राहिला नसून सोयीप्रमाणे सरळ तडजोडी करण्यात आल्या आहेत. या संदर्भात काही उदाहरणे देण्यासारखी आहेत. अनेक मतदार संघांमध्ये त्यांनी एकत्र येऊन तडजोड म्हणून 'कॉमन उमेदवार' निवडला आहे. उत्तर कन्नोरमधून निवडणूक लढवणारे संघटना काँग्रेसचे उमेदवार एन्. के कुमारन् हेच डाव्या कम्युनिस्टांच्या अँन्टी काँग्रेस फ्रंटचे उमेदवार आहेत. या मतदार संघातून निवडणूक लढवणाऱ्या प्रभावी डाव्या कम्युनिस्ट उमेदवाराला 'बसवण्यात' आले आहे. कालिकत शहरामध्येही कालिकत-१ या मतदार संघातून संघटना काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवणारे के. एम्. मेनन यांनाही असेच 'कॉमन कँडीडेट' म्हणून निश्चित करण्यात आले आहे. कोचीन किनाऱ्यालगतच्या मातानचेरी मतदार संघातून डाव्या कम्युनिस्टांनी आपला उमेदवार मागे घेतला असून संघटना काँग्रेसचे श्री. हर्शल यांना पाठिंबा दिला आहे. तनुर, कुट्टीपारुम, व मल्लापारुम मतदारसंघात या दोन्ही आघाड्यांनी संयुक्तपणे अपक्ष उमेदवारांचा पाठपुरावा केला आहे. त्यामुळे अच्युत मेनन मंत्रिमंडळातील माजी गृहमंत्री सी. एच्. महमद कोया यांना तनूर मतदार संघामधील आपली निवडणूक काहीशी जड जाईल. मुस्लिम लीगच्या तिकीटावर उजव्या कम्युनिटांच्या आघाडीमार्फत कोया ही निवडणूक लढवत आहेत. अल्हेपी मतदार संघातून टी. व्ही. थॉमस, (उजवे कम्यु.) निवडणूक लढवत असून स्थानिक नगरपालिकेचे अध्यक्ष त्यांच्या विरोधी उभे ठाकले आहेत. संघटना काँग्रेसच्या या उमेदवाराला डावे कम्युनिस्ट व केरळ काँग्रेस यांचा पाठिंबा आहे. नंबुद्रीपाद मुख्यमंत्री असताना अखेच्या दिवसापर्यंत त्यांचे चिटणीस म्हणून काम करणारे टी. के. नायर तेलीचेरी मतदार संघातून उभे आहेत. वर नमूद केलेल्या तडजोडीच्या बदल्यात श्री. नायर यांना संघटना काँग्रेस व केरळकाँग्रेसने पाठिंबा जाहीर केला आहे.

## अवघड परिस्थिती

डावे कम्युनिस्ट, संघटना काँग्रेस आणि त्यांची मित्रमंडळी यांची ही चुंबाचुंबी हा पडद्यामागील प्रकार असल्याने काही ठिकाणी मोठी कठीण परिस्थिती आढळते. उदाहरणार्थ कोट्टाटकाटा मतदार संघातून केरळ कांग्रेसचे सरचिटणीस बाळकृष्ण पिले, माजी मुख्यमंत्री अच्युत मेनन यांच्याविरुद्ध उभे आहेत. मेनन यांच्याविरुद्ध श्री. पिले याना उघड पाठिंबा देणे नंबुद्रीपाद कंपनीला जड वाटते. म्हणून त्यांनी स्वतंत्र उमेदवार सॅंप चेरीयन यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या सॅन चेरीयन साहेबांचा गेल्या निवडणुकीत साफ धुव्वा झाला होता. केवळ ४०० मते मिळवून त्यानी आपल्या डिपॉझिटची रक्कम सरकारी तिजोरीमध्य भरली होती. केरळ काँग्रेसबरोबर अथवा श्री. अच्युत मेनन यांच्याबरोबर झुंज घेण्याची डाव्यांना जर एवढी खुमखुमी होती तर त्यांनी गेल्या निवडणुकीमध्ये १८,००० मते मिळवलेल्या आपल्या उमेदवाराला पुन्हा उभे करायचे होते. पण निवडणूक जिकणे, अथवा केरळ काँग्रेसला विरोध करणे हे उद्दिष्ट नसल्याने मामुली अपक्ष उमेदवाराला पाठिंबा देऊन 'इमेज' कायम टिकवण्याचा खटाटोप डाव्या कम्युनिस्टांना करावा लागला.

## स्वतःसाठी धावपळ

स्वतःची सीट कायम टिकविण्यासाठीही नंबुद्रीपादसाहेबाना धावपळ करावी लागत आहे. पालघट जिल्ह्यातील पाटम्बी मतदारसंघातून नंबुद्रीपाद कायम निवडणूक लढवत आले आहेत. उजव्या कम्युनिस्टांच्या आघाडीमार्फत इ. पी. गोपालन ही निवडणूक लढवत आहेत. निवडणूक जड जाईल असे वाटले म्हणून अधिक सुरक्षित अशा मालमपुझा मतदार संघातून निवडणूक लढवण्याची त्यांची इच्छा होती. तथापि पक्षाच्या यशावर त्याचा विपरीत परिणाम होईल, अशी अन्य नेत्यांना भिती वाटल्याने त्यांनी नंबुद्रीपाद यांना मतदारसंघ बदलू दिला नाही. कम्युनिस्टांचा सहवासही टाळू पाहणारे जनसधीय. त्यांनी नंबुद्रीपादांचे यश सुकर व्हावे म्हणून आपल्या उमेदवाराला टप्पल मारली त्यांची ताकद उपेक्षणीय असली तरी आपण निमित्त नको असे त्यांना वाटले असावे.

स्वतंत्र जिल्हा देऊनही लीगवाल्यांची मैत्री टिकू न शकल्याने डावे कम्युनिस्ट अतिशय नाराज झाले आहेत. मुस्लिम लीगवर त्यांच्या ताब्यातील प्रादेशिक वृत्तपत्रातुन ते कठोर हल्ले चढवत आहेत. लीगचे प्रमुख बी. भनगळ यांचा नामानिशी उल्लेख करून त्यांचे हात चोरट्या व्यापारात गुंतल्याची बोंब डाव्या कम्युनिस्ट वृत्तपत्रांनी केली. परिणामी पोलिसांनी भनगळ कुटुंबियांपैकी काहीना तुरुंग दाखवला, आणि कालिकत येथील त्यांच्या कार्यालयाची झडती घेतली. ज्या वृत्तपत्राने ही बातमी दिली त्याविरुद्ध भनगळ यांनी आता दावा दाखल केला आहे.

ख्रिश्चन मुलींची युरोपातील निर्यात, त्यामागील पैशाची उलाढाल, आणि अरब देशातून मुसलमान मुलींची निर्यात, यांचाही निवडणुकीच्या दृष्टीने फायदा उठवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## फसवे राजकारण

प्रत्येक राजकीय पक्ष बाहेरून काहीही सांगत असला, आणि तत्त्वनिष्ठेच्या कितीही गप्पा मारत असला, तरी केरळमधील निवडणुकीतून दिसून येणारी ही किळसवाणी तडजोड या फसव्या आणि सत्ताप्रिय राजकारणाचाच एक भाग आहे हे नाकारता येणार नाही. हे राजकारण खेळणाऱ्या मंडळींनाही याची कल्पना आहे. डाव्या कम्युनिस्टांनी निवडणूक जाहीरनामा काढला नाही, अथवा कोणताही निश्चित कार्यक्रम जनतेसमोर ठेवलेला नाही, त्यामागेही हे फसवे राजकारण आहे. नंबुद्रिपाद एका जाहीर प्रचार सभेमध्ये बोलताना सरळ म्हणाले, कोणत्याही निश्चित कार्यक्रमाची जरूरच नाही. जनतेला सर्व प्रमुख पक्ष आणि विविध प्रश्नांबाबतचा त्यांचा दृष्टिकोन याची चांगली कल्पना आहे. डाव्या कम्युनिस्टांचे केवळ ७३ उमेदवार निवडणूक लढवत असले, तरी आपल्याला निर्विवाद बहुमत मिळेल असा त्यांचा दावा आहे. अर्थात बहुमताची ही स्वप्ने सर्व पक्षांनी पाहावी हे स्वभाविक आहे.

केरळमधील जनता सुशिक्षित. देशाच्या कोणत्याही भागात आढळणार नाही इतके साक्षरतेचे प्रमाण देशाच्या या भागात आहे. या निवडणुकीच्या निकालाचे अर्थ १९७२ ची निवडणुक डोळ्यासमोर ठेऊन काढण्यात येणार आहेत. किंबहुना येथील विजयाचा प्रचारासारखा वापर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीची ही पार्श्वभूमी, आणि केरळमधील पक्षोपक्षांच्या राजकीय तडजोडी, यातून केरळच्या जनतेला मार्ग काढायचा आहे.

केरळ काँग्रेस फुटल्याने संघटना काँग्रेसची ताकद कमी झाली आहे. उजव्या कम्युनिस्टांची आघाडी त्या मानाने मजबूत आहे. मुस्लिम लीग, सत्ताधारी काँग्रेस, आणि काही स्थानिक पक्ष, यांच्या या आघाडीस निर्विवाद बहुमत मिळाले नाही तरी बऱ्यापैकी जागा मिळतील. डाव्यांच्या आघाडीसंबंधी ते स्वतःच साशंक आहेत. म्हणून अखेरच्या घटकेला त्यांना सिंडिकेटशी तडजोड स्वीकारावी लागली.

निवडणूक काहीच निश्चित निर्णय देऊ न शकल्यास राष्ट्रपती फतवा काढण्यासाठी तयार आहेतच !

—शरद कृष्णन्

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




" बजावून ठेवतो ! आम्हाला लोकशाही मार्ग सोडायला लावू नका ! "